REGISTERD NO7, 1874

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० ६ माहे सप्तंबर सन १८७४ इ० अंक३६

## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

### गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयाच्या आहेत. हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो, लावतांनां आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटी प्रमाणें पातळ करून स्नान केल्या नंतर लावावें. किंमत ६ आणे.

हें औषध गजकरणाशिवाय खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

### जाहिरात.

शिवलीलामृत अध्याय ११ व
व्यंकटेशस्तोत्र

असें एकत्र पुस्तक कोणी भाविक गृहस्थानीं आमचे छापखान्यांत टाइपावर छापविलें त्याच्या थोड्यां प्रती विकावयाच्या आहेत. किंमत ४ आणे, डाक हाशील०१

## नोटिसा.

नोटिस — रामदत्त किसनदयाळ मयत रामदत्त वारीस पुत्र किसनदयाळ अज्ञान पाळण करणार नेवजी मारवाडी ण दुकान आकोट यास नोटिस देणार बलदेवदास बिरदीचंद मारवाडी दुकान आकोट याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमची दुकान मौजे मुंडगाव तालुके आकोट येथील माझे बापाचे नावे चालत आसोन त्याची वहिवाट आमचेकडून माझा चुलता लक्ष्मणदास हा संवत १९१९ परियंत करीत होता तो मयत सदर्हू सालीं झाल्यावर आह्मी देशांत असले कारणानी ती दुकान व त्यांतील सामान अजमास किमंत रुपये ५००० चे तुह्मी आपले ताब्यतां घेऊन बळकाऊन बसले. दुकानांतील बह्या नेल्या त्या प्रमाणें कांहीं आसाम्याकडून वसूल आलेला तुह्मीच घेतला, आह्मी देशांत असते वेळेसच तुह्मास दुकान व सामान सर्व आमचे कबज्यांत द्यावें ह्मणोन मागितले असतां देण्याचें कबूल केलें, आतां बेमानीच्या गोष्टी करिता, दुकान व सामान आमचें आह्मांस देत नाहीं सबब ही नोटिस दिली आहे तर ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत दुकान व त्यांतील सामान अगर त्याची किंमत अजमास रुपये ५००० व दुकानचें भाडें तुह्मी दरसाल ७५ रुपये प्रमाणें सेवाराम जमनादास याजला दिली होती त्या प्रमाणे अकरा वर्षांचा आकार ८२५ पैकी वसूल संवत १९२३ सालीं आह्मास देशांत रुपये २०० दिले ते वजा जातां बाकी ६२५ हें व सामानाच्या किमती मिळोन ५६२५ रु. वर लिहिल्या मुदतींत दुकानासुद्धां द्यावें पुढें तुह्मी ठेवाल तर सालीना रुपये १५० प्रमाणें घेतले जाऊन दुकान फुटली तुटली तर त्याची नुकसान तुमचे पासून घेतली जाईलं लिहिल्या मुदतीं प्रमाणें आह्मास न द्याल तर आह्मी तुह्मावर दिवाणींत दावा करून सर्व खर्चासुद्धां रुपये व दुकान कबज्यांत घेण्याची तजवीज केली जाईल कळावें तारिख ३१ माहे अगष्ट सन १८७४ इसवी.

(सही) बलदेवदास बिरदीचंद सहु
दस्तुर खुद.

---

नोटिस — रामदत्त किसनदयाळ मयत रामदत वारीस पुत्र किसनदयाळ अज्ञान पाळण करणार नेवजी मारवाडीन दुकान आकोट यास नोटिस देणार बलदेवदास बिरदीचंद साहु दुकान आकोट याजकडून नोटिसीचा जबाब देण्यांत येतो की तुह्मी तारिख २३ आगष्ट सन १८७४ इसवीचे वर्तमानपत्रांत आह्मावर नोटिस छापिली, त्यांत पहिले कलमांत असें लिहिलें आहे कीं आकोट येथिल दुकानांत ०१० आण्याचा हिस्सा आमचा व ०६ आण्याचा तुमचा होता सबब दुकानची वहिवाट देवघेव बद्दल तुमचे हातानींच झाली त्या शराकतींत नफा नुकसान काय झालें तें वहीस आढाबा उतरला नाहीं तो १५ दिवसांत उतरून द्यावा व आपले नावे ३५० रुपये लिहिले ते द्यावे असे मुदती प्रमाणें न होईल तर रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल ह्मणोन वगैरे मजकुराची नोटिस दिली. त्यांत सर्व आपला खोटेपणा आहे विच्यार करून दिली नाहीं जसे येखादे आसामीस आपण धमकी दिल्यानीं त्याजला भीति उत्पन्न होऊन जसें सांगितलें त्या प्रमाणें तो कबूल कारितो तसे आह्मास लेखून खोटी नोटिस दिली हे फार गैर केलें आहे. सदर्हू दुकानची वाहिवाट मुळींच आह्मी केली नाहीं, तुह्मी केली फक्त लिहिण्याचें काम मजकडे होतें सदर्हु दुकानांत नफ्या या बद्दल अजमास रुपये १२०० निघतील त्यांत आमचे हिशावर ४५० आले त्या प्रमाणें आमचे नावे २९२ पडले आहेत बाकी १५८ आमचे हिशाबद्दल राहिलेले व आमचा सामान कापड व मुदी जडावाची वगैरे बद्दल अजमास किंमत १५० चा ऐवज तुमचेकडेस आहे तो अगर त्याचे किंमती सुद्धांएकंदर रकम ३०८रु. नोटिसपावल्यापासून १५ दिवसांत द्यावे सदर्हू मुदतींत न द्याल तर रीति प्रमाणें दिवाणींत दावा करून सर्व खर्चासुद्धां रकम वसुलात आणण्याची तजवीज केली जाईल. तुमचे रुपये आमचे कडे एक पैसाही नसून; आसाम्यांनीं आह्मास वसूल न द्यावा ह्मणून आपलें पत्र दुकानदारास आलें त्याजवरून आह्मास कोणत्याही आसामीनीं वसूल दिला नाहीं कळावें तारिख ३१ आगष्ट सन १८७४ इसवी.

(सही) बलदेवदास बिरदिचंद दुकान
आकोट दस्तुर खुद.

---

नोटिस—विश्वनाथ बाळकृष्ण लांडगे रहाणार अकोट यांस खालीं सही करणार रामदत्त किसनदयाल साहू दुकान अकोट याजकडून देण्यांत येते कीं, तुह्मी आमचे अकोट दुकानीं वहिवाटदार असून मारू ज्येष्ठ शुध्ध १२ संवत् १९३१ रोजीं घरीं बसला. प्रथम तुह्मास १२५ रुपये साल होतें ते २०० रुपये साल जेष्ट शुध्ध १५ रोजीं करून पुन्हा तुह्मास कामावर रुजू केलें नंतर तुह्मी दुकानचे वहींत आह्मास न कळतां मागील संवत १९२९।३० सालचा जमाखर्च २०० रुपये प्रमाणें केला असें हल्लीं कळलें आहे. तर तुह्मास ह्या जमाखर्चाप्रमाणें पैसा मिळणार नाहीं.

आतां पुन्हा तुह्मी आमची नोकरी सोडून घरीं बसला आणि तुमचे कारकीर्दींतील जमाखर्च वगैरे तुह्मी रीतीप्रमाणें करण्याचा तसा केला नसोन कित्येक कुळांकडील वसूलही जमा केला नाहीं असें कित्येक कुळाकडे आह्मी मागणें करीत असतां तुह्माजवळ वसूल दिल्याचे ते ह्मणतात त्यावरून मालूम होत आहे.

आमचे दुकानांतील एक सोन्याचे वेढें अजमासे १॥। तोळे वजनाचे तुमचे हातांत तुह्मी घातलें होतें. तें तुह्मी परत दिलें नाहीं. ते व तुमचे हातचे जमाखर्चाप्रमाणें कूळवार देणें घेणें आहे तें असे तुह्मी नोटिस पोचल्यापासून १५ दिवसांचे आंत रुजू करून द्यावें व वेढें आणून द्यावें. याप्रमाणें न कराल तर तुह्मावर दिवाणींत ह्या नोटिशीचे खर्चासह फिर्याद केली जाईल. तारीख २ सेप्टेंबर सन १८७४ इसवी.

(सही) रामदत्तजी किसनदयाळ
दुकान अकोट दस्तुर खुद.

---

नोटिस—बेशमी देवीदीन वल्लद सोभाराम कलाल वस्ती कसबे तेल्हारे तालुके अकोट यांस राजाराम वल्लद हिरालाल कलाल रहाणार मौजे पाथर्डी व शिवप्रसाद वल्लद हिरालाल रहाणार कसबे अडगाव तालुके मजकूर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, कसबे तेल्हारे एथील कलाली भट्टीचा मक्ता सन १२८४ फसली सालचा सदर मक्तेदारापासून तुह्मी आपले नावे तपये २००० दोन हजारास एक सालाकरितां केला. त्यांत आपण आह्मास शराकतदार ठेविले ते दरएक रुपयांत पांच आणे चार पै राजारामाचे, पांच आणे चार पै शिवप्रसादचे व बाकी राहिलेले पांच आणे चार पै ते तुह्मी आपले खुद जातीचे ठेविले. ह्याप्रमाणें ठराव होऊन पेशगीचे रुपये भरण्याकरितां आह्मा उभयतांपासून रुपये ३४६ दरेक इसमी घेतले व त्याच्या रशिदाही पृथक पृथक आपण दिल्याच आहेत. तेव्हां पेशगीचे रुपये जातां तुह्माकडे साडे बारा १२॥ रुपये शिवाय पडले आहेत. त्याशिवाय दुकानांत आमचा दोघा इसमांचा सामान अजमास १५० दीड शे रुपयांचा आहे त्या सामानाचा तपशील खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१ देग तांब्याची
१ घागर तांब्याची
५ लाकडी पीप
१ डबी लाकडाची
७ दारू विकण्याचीं मापें.
२ पितळेचे ताट
१ दऊत
५ लोटे पितळेचे
३ बहुगुणे पितळेचें
१ चाडी तांब्याची
२ पिंपें लोखंडी
२ वाट्या पितळेच्या
१ दराती. १ तकिया
१ सांडसी लोखंडाची
१ पोहोरा लोखंडाचा
१ चारपायी. १ तराजू
१ चाळणी २ टोपलीं
५ सिसे दारू विक्रीचे
२ लिमनेट बाटल्या
१ दोर तागाचा. १ सुपडा

असें असून सदर्हू मक्त्याची वहिवाट आह्मी व तुह्मी मिळून तारीख १ एप्रिल सन १८७४ पासून तारिख ३ जून सन मजकूर पावेतों केली. त्यांत तुह्मास नफा दिसल्या कारणानें तारीख ४ जून सन मजकूर रोजीं सदर्हू वहिवाट करण्यास आपण हरकत करून आह्मास दुकानांतून बाहेर काढून दिलें व वर लिहिलेला सामानही दिला नाहीं. पुन्हा तारीख ७ जुलई रोजीं आह्मी तुह्मापाशी आलो कीं, आह्मास वहिवाट करूं द्यावी. तर तुह्मी पोलिस अमलदाराकडे फिर्याद गेल्यावर त्यांनीं आह्मास बोलावून समज दिली कीं तकाशिमी बद्दल तंटा बखेडा न करितां नुकसान होत असल्यास रीतीप्रमाणें तजवीज करावी. त्यावरून आह्मी आपले घरीं तटस्थ बसलो. नंतर एक वेळ टपा-

लमार्गे आपणास नोटिस राजिष्टर करून पाठविली त्याचाही जबाब आपण दिलाच नाहीं. आतां अकबारपत्रद्वारें कळवितो कीं, जितके दिवस तुह्मी आम्ही मिळून वहिवाट केली. त्याचा हिशेब कागदांतच आहे. व तोही तुमचेच पाशीं आहे. त्यावरून नफा किंवा नुकसान आमचे वहिवाटींत व समक्ष कागदपत्र लिहिलेलें आहेत. तो हिशेब पाहून समजेल परंतु ज्या दिवसापासून आह्मास वहिवाटींतून आपण दूर केलें तेव्हांपासून अखेर सालपावेतों नऊ महिने सत्तावीस दिवस भरणें राहिले त्यापैकीं तुह्मी तीन महिने नऊ दिवस ह्मणजे तारिख १२ सेप्टेंबर पावेतों तुमचे हिशाबदल तुह्मी वहिवाट करून घ्यावी. पुढें सहा महिने अठरा दिवस आमचे वहिवाटीस द्यावे आणि वर लिहिलेला सामान आमचा आहे त्याच सामानानें आपण अद्याप वहिवाट करीत आहा त्याचें भाडें दरमहा १० रुपयेप्रमाणें तुह्मास द्यावें लागेल, करितां ही नोटिस पावल्यापासून चार दिवसांचें आंत सदर्हूबद्दल उलगडा करावा नाहीं तर सरकारमार्फत तुह्मावर पेशगीचे रुपये, सामानाचे रुपये, नफ्याबद्दलचे व नोटिशीचे खर्चासुध्धां सर्व मिळून एकंदर एक हजार रुपयांची फिर्याद केली जाईल व ते तुह्मास द्यावे लागतील. याजकरितां आपसांत उलगडा केल्यानें ठीक पडेल, कळावे तारिख २९ माहे आगष्ट सन १८७४ इसवी.

( सही ) राजाराम वलद हिरालाल कलाल दस्तुर खुद्द.
शिवप्रसाद वलद हिरालाल कलाल दस्तुर खुद्द.

---

नोटिस — ठाकुरदास खिमराज मारवाडी वहिवाटदार लक्ष्मणदासजी मारवाडी साहू दुकान आलेगाव प्रगणे पातूर जिल्हा आकोला यांस नोटिस देणार बापू वलद लक्ष्मण पाटील वस्ती मोजे मजकूर तुह्मास आह्मी या नोटिसीनें असें कळवितो कीं तुह्मी खातेबाकी बरून आमच्याकडे २७९ रुपये येणें आहे असे नोटिसीनें कळवितां परंतु पूर्वीचे देव्याघेण्याबद्दल तुमच्याकडे आमचा १०० रुपयांचा दस्तऐवज आहे व गावांतील संभावित च्यार पंचाच्या देखत असें ठरविलें कीं महिन्यास दोन रुपये प्रमाणें ७ वर्षें तीन महिने पर्यंत द्यावे किंवा आजामितीस रोख १०० शंभर रुपये द्यावे त्याप्रमाणें आह्मी ८० रुपये नगदी दिले बाकी २० रुपये देणें आहे तर तुह्मी आपले राहते घराच्या पूर्वेस आमची जागा आहे त्या जागेंत वहिवाट न करितां तुह्मी आपला दरवाजा पूर्वीप्रमाणें पश्चिमेच बाजूस लावावा ह्मणजे आह्मी आपली जागा तायांत घेऊं नंतर तुमचे २० रुपये देऊन टाकूं व तुह्मास आह्मी पूर्वी रुईचे आखें एक दिलें होते त्याबद्दल तुह्मी आह्मास खामगावाहून रुपये देण्याविषयीं सांगितलें परंतु आह्मी ते रुपये घेतले नाहींत तर ते ४० रुपये खामगावचे दुकानांत रुजू करून द्यावे नाहीं तर तुह्मास रोख नगदी द्यावे लागतील कळावें तारीख २ माहे सप्तंबर सन १८७४ इसवी.

( सही )बापू वलद लक्ष्मण पाटिल निशाणी खुद्द हातची मोहर असे.

---

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ११ शके १७९६

## पिकापाण्याचा आहवाल.

कापसाचे गठ्ठे दाबण्याचे कित्येक लोकांचे कारखाने आहेत. त्यांपैकीं मोफ्युसिल कंपनी नावाची मुंबईस एक मंडळी आहे तिचे पुष्कळ ठिकाणीं कारखाने आहेत असें दिसतें. तिच्या म्यानेजराकडून गुजराथ, नागपुर व वऱ्हाड प्रांतांतील पिकापाण्याची ताजी खबर प्रसिध्ध झाली आहे तीं आम्ही आपले वाचकांकरितां येथें लिहितो. खालीं लिहिलेल्या नऊही ठिकाणीं मी० कंपनीचे कारखाने आहेत असें दिसतें:—

उमरावती. तारिख १ सेप्टेंबर — या आठवड्यांत हवा स्वच्छ आहे. ओल जाऊन आतां प्रत्येक वस्तू कोरडी झाली. पाऊस पाहिजे. पिकें चांगलीं आहेत. व तीं चांगल्या जोमानें वाढत आहेत.

खामगाव. तारिख १ सेप्टेंबर—गेल्या आठवड्यांतही कपाशीच्या पिकानें आपला देखावा चांगला दाखविला; तथापि असें दिसतें कीं, हवा फार शुष्क झाली आहे. व ती कपाशीला करपवीत आहे, ह्मणून इतक्यांत एक दोन पाऊस चांगले पडतील तर कपाशी चांगली सुधारेल. तीन आठवडे झाले पाऊस नाहीं, आणि आतां कपाशी फुलाला आली आहे सबब या आठवड्यांतही पाऊस पडणार नाहीं तर पिकें बिघडण्याचें भय आहे. आजपर्यंत येथें १८ इंच पाऊस पडला.

शेगाव. तारीख १ सेप्टेंबर — गेल्या आठवड्यांत हवा शानदार होती. कपाशीचीं शेतें दोन फुटांहून अधिक उंच होत चाललीं आहेत, या वर्षीचें पीक मोठ्या उफाड्याचें व उमेदीचें येईल असें दिसतें. बनीचे पिकास फुलारा आला.

मूर्तिजापुर. तारिख १ सेप्टेंबर — या आठवड्यांत हवा चांगली आहे व पिकें चांगल्या स्थितींत आहेत. तरी तीं परिपक्वदशेस येण्यास पावसाची जरूर आहे.

भडोच. तारिख १ सेप्टेंबर — गेल्या आठवड्यांत हवा चांगली होती. कांहीं ठिकाणीं कांहीं रात्रीं थोडथोडा पाऊस पडला कपाशीचीं पिकें उत्तम दशेंत आहेत. कपाशीचा भाव जुना २०९ व नवा मार्चाचे कराराचा २१८ पासून २२० रुपयांचा आहे.

अमदाबाद. तारीख १ सेप्टेंबर— येथें पाऊस पाहिजे आहे. व आभाळावरून तो लवकर पडण्याचें चिन्ह दिसत आहे. व पाऊस पडला ह्मणजे लहान पिकास चांगला तजेला येईल,

सुरत — पिकें चांगल्या स्थितींत आहेत,

हिंगणघाट. तारीख ३१ आगष्ट—हवा चांगली आहे. आणि कांहीं ठिकाणें खेरीज करून कपाशीचें पीक चांगल्या धजावांत आहे.

वर्धा. तारीख ३१ आगष्ट— या आठवड्यांत हवा जशी पाहिजे तशी उत्तम होती. लवकर लागवड झालेली कपाशी फुलाऱ्यास आली आहे.

यामप्रमाणें पिकापाण्याचा आहवाल आहे व त्यावरून गुजराथ, नागपुर व वऱ्हाड या तिन्ही प्रांतांत पावसाचा बोभाट दिसतो.

---

## शिंप्याची शिलायी.

कलकत्याच्या स्मालकाजकोर्टांत एका दाव्याचा नुकताच फैसल झाला तो असा:—

एका महिन्यांतल्या तूट मितीच्या पगाराबदल एका शिंप्यानें आपल्या धन्यावर दावा केला होता. त्यांत धन्यानें असा जबाब दिला कीं आगष्ट महिन्याच्या आरंभाला ६ दिवस मात्र शिंपी कामावर आला होता त्यापुढें त्याचा तो होऊन गैरहजर राहिला व कामावरच आला नाहीं यामुळें त्यानें त्या सहा दिवसांचा आपला पगार बुडवून घेतला. जडजानीं ठराव केला कीं शिंपी हा त्याच्या सर्व वेळाकारितां घरच्या इतर नोकराप्रमाणें नोकर, नव्हता, आणि त्याची मेहनत त्याच्या मास्तराच्या इच्छेवर नव्हती आणि पुराव्यावरून असें सिध्ध झालें आहे कीं हा शिंपी या गृहस्थांच्या तैनातींत असतांही दुसऱ्या लोकांचीं कामें आणून शिवीत असे. यास्तव याच्या पगाराचा पैसा याचे झालेल्या कामाचें मोल पाहून दिला पाहिजे. मुंबईच्या हायकोर्टांत एक ठराव झालेलाही त्यांनीं आपल्या फैसल्यात दाखल्यास घेतला होता. त्यांत मुंबईच्या चीफजष्टिसानीं असें ह्मटलें आहे की "शिंपी जरी अठवड्याच्या किंवा महिन्याच्या ठरावानें ठेविलेला असला तरी तो कामाच्या मुदती पुरताच नोकर होय. घराच्या कामाकारितां सुतार जसा महिने माल ठेवितात किंवा इंग्लंडांत शिवणकरणी जशा आठवड्याच्या किंवा महिन्याच्या बोलीनें ठेवितात आणि काम झालें ह्मणजे त्याचा तितक्या दिवसांचा हिशेब चुकवून देतात तसाच प्रकार शिंप्याचा समजला पाहिजे असें आमचें पूर्णमत आहे. ह्मणून आह्मी ह्मणतो कीं शिंपी हा घरगुता चाकर नव्हे आणि आमचे स्वतांचें मत आणखी असें आहे कीं शिंपी हा मुळींच चाकर नव्हे.

---

## इंग्रजी राज्यकारभारांत व्यापार.

( अरुणोदयांतून )

वऱ्हाड प्रांताच्या कमिशनराकडून एक चमत्कारिक सर्क्युलर सुटलें असून त्याबद्दल' इंग्रजींत, गेल्या ने. ओ. पत्रांत त्याच्या बातमीदारानें थोडा मजकूर लिहिला असून त्याबद्दल सर्वांनीं विचार करणें अगदी अवश्य आहे. हें सरकिलर बरेंच मोठें ह्मणजे सुमारे दहा कालमांचें असून तें सर्व पाहाण्याची संधी आह्मास नाहीं, पण त्याविषयीं त्या पत्रांत जी थोडीशी चर्चा केली आहे त्यावरून सरकिलराचा उद्देश असा दिसतो कीं, वऱ्हाड प्रांतांत जडी नावाचा खानदेशी कापूस पिकविण्याची जी रीत हल्लीं सुरू आहे ती बंद करून सर्व शेती लोकांनीं त्या कापसाची लागवड न करतां बनी नावाच्या कापसाची लागवड करावी. जडी कापूस वाईट असून बनी चांगला असेल तर शेतकरी लोकांनीं जडी कापसाची लागवड न करतां बनी कापसाची लागवड करावी अशाविषयीं सरकारानें कांहीं सामोपचाराचे उपाय करणें वाईट नाहीं हें खरें, पण हल्लींचें सरकिलर तसें नसून तें जुलमी, अन्यायी व अपमलबी असें आहे असें यांतील लेखावरून होतें. त्या सरकिलरांत पुढें लिहिलें आहे कीं, या सरकिलराचा अमल बजावण्याचें काम सर्व डेपुटी कमिशनरांस दिल्हें असून जे शेतकरी लोक या सरकिलराप्रमाणें वागणार नाहींत त्यांस शिक्षा करण्याचा अधिकारही सर्व डेपुटी कमिशनरांस दिला आहे. ज्या जिल्ह्यांत जें धान्य पिकत नाहीं त्या जिल्ह्यांत तें पिकविण्याकरतां आमच्या इकडचे कित्येक कलेक्टर लोक जसे उद्योग करतात तसे उद्योग करण्याचा अधिकार सर्व डे. कमिशनरांस दिला असता व ते त्याप्रमाणें खऱ्या मनानें वागते तर, हें सरकिलर, कदाचित, फार चांगलेंही झालें असतें; ह्मणजे शेती लोकांस थोडी लालुच दाखवून त्या नव्या धान्याची थोड थोडी लागवड करविण्याची रीत सुरू होती तर चांगलें झालें असतें, पण तेथें तसा प्रकार नसून जे शेती लोक कमिशनराच्या हुकुमाप्रमाणें या नव्या कापसाची लागवड करणार नाहींत त्यांस "शिक्षा" होईल असें ठरविलें आहे. येथें आह्मी आपल्या सर्व वाचकांस व विशेषेंकरून कायदेपंडित व वऱ्हाडचे सरकारी कामदार यांस असा प्रश्न करतों कीं, शेतकरी लोकांवर अशा प्रकारची सक्ती करण्यास कमिशनरास कांहीं अधिकार आहे काय? आह्मास वाटतें कीं, असें करण्यास कमिशनरास किंवा दुसऱ्या कोणासही अधिकार नाहीं. कोणी आपल्या जमिनींत काय पिकवावें किंवा कोणी काय खावें हें ठरवून प्रजेच्या हक्कास अडथळा करण्याचें सरकारचें काम नसून, प्रजेच्या हक्कास अडथळा करणारास शासन करणें हें मात्र सरकारचें काम आहे. हिंदुस्थानांतून मांचेस्टर येथें जो कापूस जातो त्यांत भेळ वगैरे होऊं नये ह्मणून ही युक्ती आहे असें कित्येक ह्मणतात व यावरून हिंदुस्थानचा राज्यकारभार करणाऱ्या इंग्रज लोकांस, त्यांचे देशबंधु जे मांचेस्टरचे व्यापारी त्यांची किती काळजी आहे हें चांगल्या रीतीनें दिसून येतें. तसेंच त्या फायद्याकरतां इकडील राज्यकारभार करणारे लोक आपल्या प्रजे-

स कसे वागवितात हेंही उघड होत असल्यामुळें ही गोष्ट ऐकून, निदान कित्येक इंग्रजी लोकांस तरी लाज वाटणें अवश्य आहे. आतां हा शिक्षेचा हुकूम कमिशनरानें मोघम ठेवला नाहीं ही एक त्याणें मेहेरबानीच केली असें समजलें पाहिजे. त्याणे आपल्या सरकिलरांत शिक्षा स्पष्ट करण्याकरतां असें ठरविलें आहे कीं, जे शेती लोक या सरकिलराप्रमाणें अंमल करणार नाहींत त्यांस पन्नास रुपये पर्यंत दंड करावा! हा दंड कोणत्या कायद्याच्या कोणत्या कलमाप्रमाणें आहे हें कोणी सांगूं शकेल काय? आह्मी आपल्या समजुती करतां सर्वांस असें कळवितों, जो कोणी या दंडास कायद्याचा आधार दाखवून देईल त्याचे फार फार आभार मानले जातील. ही दंडाची रकम वसूल करण्याच्या बाबतींत ते आपल्या सरकिलरांत असें लिहितात कीं, या सरकिलराप्रमाणें केलेल्या दंडाचा वसूल, जमिनीचा धारा वसूल करण्याच्या रीतीप्रमाणें करावा; ह्मणजे ज्यास दंड केला असेल तो दंडाची रकम न देईल तर त्याची मालमत्ता जप्त करून विकून वसूल करावी!! या सरकिलराची आमच्यापुढें असलेली ही माहिती बरोबर असेल तर, वरील ठरावावरून सरकिलर सोडणाऱ्या कमिशनराच्या प्रगल्भ ज्ञानाची तारीफच केली पाहिजे!! कारण त्यांच्या या लेखांत मखीच तशी आहे. हे नेटिव लोक हो, आह्मी जे पांच, हजार कोसांवरून तुमचा राज्यकारभार करण्याकरतां येतों ते फक्त पगारासाठींच येत नसून, त्यांत आमच्या देशाचें व लोकांचें अनेक तऱ्हेनें कल्याण करावें ह्मणूनच येतों. याजकरतां आमचा तो हेतु शेवटास नेण्याकरतां जीं जीं कृत्यें करणें आह्मास भाग पडेल तीं आह्मी करूं व त्यांस तुह्मी अनुकूळ झालें पाहिजे. आणि जर प्रतिकूळ व्हाल तर कायद्याचा किंवा शास्त्राचा आधार न पाहातां आह्मी तुह्मास शासन करूं असें हें सरकिलर सोडणाऱ्या कमिशनराचें मत आहे असें होतें. हिंदुस्थानांतील नेटिव लोकांनीं आळस टाकून उद्योगास लागावें व व्यापार धंदे करून देश सधन करण्यास लागावें असें ह्मणणाऱ्या लोकांनीं वरील गोष्टीकडे लक्ष्य देऊन नेटिव लोकांच्या व्यापार धंद्याच्या हक्कास इंग्रज लोक कशा अडचणी आणतात हें ठरवावें; ह्मणजे आपल्या उपदेशापासून कितीसा फायदा होण्याची आशा आहे हें त्यांस समजेल, असो, आज आह्मी याविषयीं कांहीं जास्त न लिहितां इतकेंच ह्मणतों की, हें सरकिलर कायम राहाण्यासारखें आहे कीं काय याचा हैदराबादच्या कमिशनरांनींच विचार करावा.

## वऱ्हाड.

पावसावाचून फारच हरकत आहे. सगळा आगस्ट महिना पावसावाचून गेला, या आठवड्यांत पाऊस न पडेल तर पिकें डबघाईस येतील ह्मणतात याजकरितां परमेश्वर कृपा करील तर फार चांगलें होईल.

---

अज्ञात लिहिण्यास संतोष वाटतो कीं, रा० रा० माधवराव हरि सहस्त्रबुध्धे यांची येथून बदली होणार होती ती रहित झाली. व मागील आठवड्यांत लिहिल्याप्रमाणें त्यांस जुडिशियल कमिशनरचे क्लार्क नेमिलें व ते त्या आफिसांत जाऊन काम पाहूं लागले. अकोल्याचे डिपुटी कमिशनर आफिसांत कांहीं कारणांकरितां अदलाबदल झालीच पाहिजे असें कमिशनर साहेबांस दिसून आलें व रा० रा० विष्णु सखाराम बापट यांस उमरावतीहून इतक्या लवकर पुन्हा बदलणें प्रशस्त दिसलें नाहीं. सबब त्यांस तेथेंच ठेवून रा० रा० भास्कर सखाराम जयवंत जु० कमिशनरचे क्लार्क आफ धि कोर्ट यांस अकोला डिपुटी कमिशनरचे क्लार्क आफ धि कोर्ट नेमिलें आहे. व आमचे ऐकण्यांत असेंही आलें आहे कीं, भास्करराव यांस सरकारानें असेंही कळविलें आहे कीं, हुजुरांतून तुमची नेमणूक जिल्ह्यांत झाली याजबदल तुह्मी वैषम्य मानूं नये. तुमची सिनियारिटी आह्मास मान्य आहे. व प्रसंग येतांच तुह्माला मोठी जागा दिली जाईल. याप्रमाणें सरकारानें केलें असेल तर तें भास्कररावाचे योग्यतेस अनुरूपच आहे व त्याप्रमाणें लवकर घडो इतकेंच आम्ही इच्छितो.

---

सरकारी कामदार लोकांच्या लोअर व हायर स्टयांडर्डच्या परीक्षा वर्षास होत असतात त्या सालमजकुरीं उमरावतीस अक्टोबर महिन्याचे १९वे तारखेस होणार असें समजलें आहे.

---

असें ऐकण्यांत आलें आहे कीं सरकारी कचेऱ्यातून उमेद्वार लोक आहेत ते सर्वे काढून टाकावे असा ठराव होत आहे. या ठरावास कारण हिवरखेडच्या पाटिलकी संबंधी कागदपत्र चोरीस गेले तो संबंध येथील एका असिस्टंट कचेरींतील उमेद्वार नागो तुकाराम याजकडेस येऊन त्याजला काढून टाकिलें हें होय असें ह्मणतात. येकाचें कृत्य शंभराला कसें भोवतें किंवा येकाचाही अपराध नसतां बहुतांवर आकाशची कुऱ्हाड कशी कोसळते हें या उदाहरणावरून चांगलें लक्ष्यांत येतें.

---

रा० रा० सखाराम दत्तात्रय जळगावचे तहशिलदार येथें आले होते व इकडूनच ते एक महिन्याच्या रजेवर कोकणांत गेले.

---

जानकी नावाची कोणी स्त्री गेल्या आठवड्यांत आपले घराबाहेर येऊन उभी राहिलेली असतां पोलिसानें तिला पकडून रस्त्याचे बाजूला परसाकडेस बसल्याचा तिजवर आरोप आणिला असें ह्मणतात व तिची चौकशी रा० गंगाराम बापूजी येथील नायब तहशिलदार यांनीं केली. जानकीला १० रुपये दंड व तिची आई तिच्याजवळ उभी होती तिला २ रुपये दंड याप्रमाणें १२ रुपये दंड केला असें समजतें. या गोष्टीचें खरें स्वरूप इतकेंच असेल तर या दंडाबदल सर्वांस आश्चर्य वाटल्यावाचून राहाणार नाहीं. जानकीचे घरीं पायखाना आहे ह्मणतात आणि कदाचित तसें असूनही ती बाहेर परसाकडेस बसली असेल अशी कल्पना केली तर त्याकरितां बारा रुपये दंड ह्मणजे मोठा जुलूम होय. बहूतवेळां म्युनिसिप्यालिटीकडून असे अपराधी तहशिलदाराकडे पाठविलेले आहेत व त्यांनां अल्प स्वल्प ह्मणजे आठआणे, रुपया, असे दंड झालेले आमचे ऐकण्यांत आले आहेत पण अशा कामाकरितां असा जबरदस्त दंड आह्मी कधीं ऐकला नव्हता. अस्तु. लोकांची कल्पना हा कांहीं न्याय नव्हे. न्यायाधीश न्यायासनावर बसला असतां त्याच्या मुखांतून बरीं वाईट जीं शद्बमौक्तिकें निघतात तो न्याय होय. व तो कायदेशीर होय. ह्मणून अपिलाला मार्ग नसल्यास तोच शिरसावंद्य करून लोकांनीं स्वस्थ वसावें हेंच अवश्य होय.

---

श्री राजेश्वर देवस्थानाच्या व्यवस्थापक मंडळीची गोकुळअष्टमीचे दिवशीं त्याच देवालयांत सभा भरली होती तींत यादी पैकीं १०० राहून अधिक रुपये वसूल झाला आहे असें समजलें बाकीचा वसूल नित्य चालू आहे. लोकलफंडाकडून १०० रुपयांची मदत मिळाली. म्युनिसिपल कमिटीकडून तितकीच मिळेल अशी उमेद आहे. पडलेली इमारत बांधण्याची सुरुवात लवकरच होणार. शेट गंगाधर जोरावरमल प्रभृति साहू लोकांकडील देवाचें येणें मागून घेण्याकरितां ४ गृहस्थांची एक स्पेशियल कमिटी नेमिली आहे. या व इतर चाललेल्या प्रकारावरून पहातां हें देवाचें काम सर्व मंडळी मोठ्या उमेदीनें करीत आहे असें दिसून येतें. व हाच त्यांचा मनोत्साह या गोष्टींत व अशा प्रकारच्या दुसऱ्या लौकिक व स्तुत्य गोष्टींत अखंड राहो असें आम्ही इच्छितो.

---

मेजर जे. जी. बेल जुडिशियल कमिशनर झाल्यामुळें तारीख १० एप्रिल पासून पुढें लिहिल्याप्रमाणें नेमणुका झाल्या असें या आठवड्याच्या हिंदुस्थान सरकारच्या ग्याझेटमध्यें छापून प्रसिद्ध झालें आहे.

क्या० आर. एच हडल्स्टन आफिशियेटिंग सेकंडक्लास डिपुटी कमिशनर हे फर्स्टक्लास आफिशियेटिंग डिपुटी कमिशनर झाले.

मेजर जे. टी. बुशबी थर्डक्लास डिपुटी कमिशनर हे आफिशीयेटींग सेकंडक्लास डिपुटी कमिशनर झाले.

क्या० के. जे. मेकंजी फर्स्टक्लास असिस्टंट कमिशनर हे आफिशियेटिंग थर्डक्लास डिपुटी कमिशनर झाले.

क्या० ए फ्यारर सेकंडक्लास असिस्टंट कमिशनर हे आफिशियेटिंग फर्स्टक्लास असिस्टंट कमिशनर झाले.

मि० ए. एलियट थर्डक्लास असिस्टंट कमिशनर हे आफिशियेटिंग सेकंडक्लास असिस्टंट कमिशनर झाले.

---

इलिचपुरास हैद्राबाद कांटिंजंटची ६ वी पायदळ पलटण आहे तींतील दोघा जमादारांनीं दोन शिपायांपासून उसनवार पैसे घेतले होते त्यांच्या चौकशीकरितां तेथें कोर्ट मार्शल भरलें होतें. त्यांत ठराव झाला तो:— एका जमादारानें ७९ रुपये घेतले हे ते त्याचा ४ महिने पर्यंत पगार, अलविन्स, व ऱ्यांक वगैरे सस्पिंड करावें अशी शिक्षा झाली. व दुसऱ्यानें २०० रुपये घेतले होते त्याला बरतर्फ करण्याची शिक्षा झाली होती; पण कमांडर इन चीफ साहेबांनीं ती शिक्षा फिरवून त्याला पुन्हा कामावर रुजू केलें आणि असें ठरविलें कीं, रकम उसनवार घेतल्याची त्यावर शाबिदी नाहीं.

---

उमरावतीस वकाललोकांची सभा भरण्याचा संकेत झाल्याप्रमाणें गेल्या बुधवरीं रा० रामचंद्र भगवंत वकील यांचे घराशेजारीं सभा भरली होती. अध्यक्ष स्थानीं रा० गणेश यशवंत वकील हे होते. सभेचा उपक्रम कसा करावा वगैरे विषयीं भाषणें होऊन लवकरच सभा आटपली.

---

डा० आबट साहेब स्यानिटरी कमिशनर यांस वऱ्हाडांतील म्युनिसिप्यालिट्यांचे एक्सआफिशिओ मेंबर नेमिलें.

---

राजेश्वराच्या देवळापासून सडकेपर्यंतचा रस्ता मधील नाली व गटार यांसुद्धा म्युनिसिपालिटीनें बांधून देण्याचें कबूल केलें असें समजतें.

---

उमरावती शहराच्या सब रोजिस्ट्रारचें काम आजपर्यंत तहशिलदाराकडे होतें तेथें हल्लीं १०० रुपये पगाराचा स्वतंत्र सब रेजिस्टर करण्याचें ठरलें व ती जागा रजिस्टर जनरलचे आफिसांतील ४५ रुपयांचे क्लार्क रा० जयरामपंत यांस दिली असें समजतें.

---

ट्रेनिंग कालेजाची प्रवेश परिक्षा अक्टोबरच्या २६ वे तारखेस जिल्ह्या जिल्ह्याचे डिपुटि इन्स्पेक्टराकडे होईल अशी जाहिरात प्रसिद्ध झाली आहे.

---

वऱ्हाडांत शेतकी कशी असावी तिजविषयीं सविस्तर माहितीचें कोणी उत्तम मराठी पुस्तक लिहील व ते शालोपयोगी होईल तर त्यास २०० रुपये बक्षीस देण्याचा रेसिडेंट साहेबांनीं ठराव केला आहे. हें पुस्तक नोवेंबरच्या पहिल्या तारखेच्या आंत डायरेक्टर साहेबाकडे पाठविलें पाहिजे.

## वर्तमानसार

असाम प्रांताकडे गवरनर जनरल साहेब गेले होते ते परत आले. सिलहीत प्रांत असामाला जोडण्याचा जाहिरनामा लवकरच प्रसिद्ध होईल असें समजतें.

म्युनिसिप्यालिटीकडील नोकररांस पेनशन मिळण्याचा ठराव व्हावा अशाविषयीं मुंबईस विच्यार चालू आहे.

मि० रंगराव भिमाजी यास रत्नागिरीस व मि० रामचंद्र बापुजी यांस कुलाब्यास हुजूर डिपुटि कलेक्टर नेमिलें.

हिंदुस्थान सरकारानें असा रूल ठरविला आहे कीं सहा महिन्याहून अधिक मुदतीच्या सर्व नेमणुका कायम नौकरीच्या समजाव्या. व त्या जाग्यावर असणारे नोकरांस त्यांचे कुटुंबाचे माणसा बद्दल मार्गाचा खर्च त्यांस मिळावा; परंतु सहा महिन्याहून कमी मुदतीची नेमणूक ही तूर्त सारखी समजावी व त्या नौकरास कुटुंबा बद्दलचा मार्गाचा खर्च मिळणार नाहीं.

बाहेर गावचे साक्षीदारांस भत्याबद्दल तिकिटें पाठवीत असत त्याबद्दल आतां पक्षकाराचे खर्चानें "मनीआर्डर" (हुंडी) करावी असा सरकारचा ठराव झाला.

मि० ह्यावलाक साहेब रे० कमिशनर यांनीं सान्याचे बाबतींत चौकशी करून रयतेस प्रतिकूळ असा सरकारास रपोट केल्याचें कळतें. ज्ञा. च.

हैदराबाद स्टेट रेलवेचे सुरवातीचा समारंभ येत्या नवंबर महिन्यांत होणार आहे. सदरहू समारंभाकरितां मुंबई, मद्रास व बंगलोर वगैरे ठिकाणचे पुष्कळ लोक येणार असल्यामुळें स्पेशल ट्रेनी निघणार आहेत.

श्रीमंत गायकवाड यांनीं बडोद्याचे रेसिडेंट करनल फेर यांचे मार्फत मुंबईचे गवरनर यांजकडून खालीं लिहिलेले लोक मागविले आहेत. रा० ब० महादेव गोविंद रानडे पुण्याचे सबार्डिनेट जज्ज, रावबहादुर नाना मोरोजी थर्ड माजिस्ट्रेट मुंबई, मि० कृष्णाजी लक्ष्मण मुंबई स्मालकाज कोडताचे अकिंटग ४ थे जज्ज, व मि० शंभुप्रसाद लक्ष्मीलाल मोरवी संस्थानचे जाइंट आडमिनिस्ट्रेटर.

नारळी पौर्णिमेस मुंबईत कापाच्या मैदानावर सदरहू सणाच्या संबंधानें कुस्त्या झाल्या त्यांत एका परदेशास खालीं पाडला असतां त्याचें अर्धे अंग निर्जीव झाल्यामुळें त्यास इस्पितळांत नेलें. तेथें तो ता० २८ माहे मजकूररोजीं वारला. यानें मरणाच्या अगोदर असें सांगितलें कीं पाडणाराकडे कांहीं अपराध नाहीं.

पेट्रोलम जातीचा ग्यास उत्पन करणारे यंत्रापासून सदरहु ग्यास उत्पन करून तारिख २६ रोजीं किन्सरोड नावाच्या रस्त्यावर त्या ग्यासाचे दिवे लावून पाहिले. या ग्यासाचे दिव्याची जोत कोळशाचे ग्यासापेक्षा किंचित पिवळी असून उजेड त्यापेक्षां जास्त पडतो व पेट्रोलम ग्यास किंचित मंद जळतो.

नंदिदुर्ग एथें एका मनुष्यानें आपले बापास व दुसरे आप्तवर्गास जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्यावरून त्यास जन्मपर्यंत काळे पाण्याची शिक्षा झाली.

मदुरा एथें कांहीं शिला लेख सांपडले आहेत त्यांत असें लिहिलें आहे कीं, जा दिवशीं जैन धर्मानुयायी लोकांचा मोड झाला त्यादिवशीं वादांत जिंकलेले ८,००० बुध धर्मानुयायी लोक एकेदिवशीं सुळी देऊन मारले.

बंगाल्यांत एका गृहस्थाची आई मेली त्यावेळीं तिचें वय ११३ वर्षांचे होतें.

विलायतेस लंडन शहरांत टाइम्स नावाचे पत्र निघतें त्यास मागच्या वर्षी एकंदर १८,००,००० रुपये फायदा झाला. पैकीं खर्चवेच वजा जातां मि० वाल्टर याचे हिशास ७,००,००० रुपये आले. वाल्टर साहेबाखेरीज या पत्राचे आणखी भागीदार आहेत. ने. ओ.

## हिंदुलोकांची राजकीय योग्यता.

[ मागील अंकावरून पुढें चालू ]

याप्रमाणें सार्वजानिक समूहाचीं कामें आपले लोकांकडून होतात हें मनात आणिलें ह्मणजे स्वतंत्रपणें राजकीय कामें करण्याची आपणास योग्यता आली आहे असें दिसतें खरें, पण तो बाह्यदेखावा आहे ह्मणजे बेगडाची जशी चमक तसा हा प्रकार आहे. ह्मणून आपण आतां त्याचें अंतरंगपाहू.

म्युनिसिपालिट्यांत, लोकलफंड कमिट्यांत, व देवस्थान कमिट्यांत आपले लोक पंच आहेत मात्र, परंतु त्यांची निवड मोठी विच्यारपूर्वक झाली आहे काय? नाहीं. बरें ते सर्व पंच प्रजेच्या संमतानें तरी निवडिले आहेत काय? नाहीं. ते सर्व विद्वान त्या व कामास योग्य असे आहेत काय? नाहीं. ते सर्व निर्भीड व निरभिमानी आहेत काय? नाहींत. ते सर्व निष्पक्षपाती आहेत काय? नाहींत. ते सर्व सत्त्यास चहाणारे आहेत काय? नाहींत. ते निर्लोभ आहेत काय? नाहींत. ते सर्व त्या कामीं आस्थापूर्वक झटतात काय? नाहींत. त्यांत चांगल्यांची संख्या वाइटाच्या पुष्कळ पटीनें कमी असेल. मग इतक्या सर्व साहित्यास सरकारचेंही एकच पण जबरदस्त साहित्य त्यांकरितां आहे. तें कोणतें तें ऐका. अखेर ठरावाचा अधिकार आमच्या लोकांकडे आहे काय? नाहीं. मग अशा म्युनिसिपल कमिट्या किंवा इतर कमिट्या चालीविण्यानें राजकीय अथवा सार्वजनिक कामें स्वतंत्रपणें चालविण्याची योग्यता आह्मांस कितपत आली ह्मणावी याचें अनुमान आपणच करावें. आपल्या कानावर अशी एकही कमिटी नाहीं कीं तिचें काम बिन बोभाट चाललें आहे. मुंबई, पुणें, सातारा, सोलापूर, नगर, वऱ्हाड, खानदेश वगैरे सर्व ठिकाणच्या कमिट्यांविषयीं कांहींनाकांहीं बोभाट ऐकूं येतात व देवस्थान कमिट्यांचा तर याहून ताप आहे कारण त्या करतील ती पूर्व दिशा. त्यांच्यांत सुशिक्षित लोक पंच नाहींत व त्यांच्या कामांत सरकार हात घालीत नाहीं. व ते लोक इतर कमिट्यांप्रमाणें मुदतीनें बदलत नाहींत. त्यांनीं राजिनामा द्यावा किंवा मरावें तीच काय ती त्यांची सुटका! बरें अशा प्रकारानें येकादी जागा रिकामी झाली तर त्याच कामिटींतले लोक शिफारस करतील त्याला ती द्यावयाची असा प्रकार आहे.

याविषयीं पर्वती संस्थानचें ढळढळीत उदाहरण सर्वांचे डोळ्यापुढें आहे. व तशीच स्थिति आळंदी, जेजुरी, त्रिंबकेश्वर, कोपरगाव, सज्जनगड वगैरे संस्थानचे ठिकाणीं आहे. हे देवस्थानचे पंच सरकारचे खजिन्यांतून दरसाल गोण्याच्या गोण्या भरून रुपये नेतात व ते स्वैरपणें खर्चितात त्यांतील एक पैशाचाही कोणाला हिशेब दाखवीत नाहींत. ह्मणून त्यांत काय अंधळें गारूड असेल तें ईश्वरास ठाऊक! असो अशी अन्यायाचे पायावर उभारलेली इमारत दीर्घकालमर्याद टिकणार नाहीं. ती कधीं तरी ढासळेल व तींतिल काळेंबेरें लोकांचे नजरेस येईल. अहाहा! कायहें! जुनें हिंदुलोक ह्मटले ह्मणजे त्यांचा धर्माभिमान मोठा, व माळा, टिळे, गोमुख्या हे त्यांचे ईश्वरनिष्ठेचे ढळढळीत जाहीरनामे होत. असे असतां ईश्वराचे कारणीं लागावयाचे पैशाचा देखील ते कितीएक प्रसंगीं अभिलाष करितात हे पाहिलें ह्मणजे त्यांची योग्यता मोठी विस्मयकारक दिसून येते.

याचप्रमाणें सेशनकोर्टाकरितां जुरर व असेसर नेमिलेले असतात त्यांच्या यादी चांगल्या निवडणुकीनें झाल्या नसतात ह्मणून त्यांच्या कामांतही बहूत प्रसंगीं न्यून आढळतें आणि तेणेंकरून खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें होतें. न्यायाधिशास काय त्यांतील सर्व गोष्टींवरून आरोपी अपराधी आहे असें वाटत असलें तरी जुरीनें तो निर्दोषी ह्मटला ह्मणजे न्यायाधिशास सोडून देणें भाग पडतें तसेंच असेसराच्या कामांतही दोघा असेसरांनां अपराधी ह्मटलें व न्यायाधिशास तो निरपराधी वाटला तर तो त्यास सोडून देतो किंवा असेसरानीं निर्दोषी ह्मटले व न्यायाधिशाला तो अपराधी वाटला तर तो त्यांस शिक्षा देतो पण अशानें नेटिव लोकांच्या अभिप्रायाची मातब्बरी किती राहिली याचा विचार करावा. न्यायाधिशास कित्येक प्रसंगीं असे अक्षरशत्रु असेसर भेटतात कीं त्यांशीं उरस्फोड करितां करितां त्याला त्रास येतो. कित्येक असेसरांनां एका न्यायाधिशानें परेड फिरावयास लाविलें व बाकावर उभें केलें अशाही गोष्ठी पाहण्यांत आल्या आहेत. चौकशी चालत असतां पंख्याचे गारव्यानें सुखाऊन कित्येक असेसर झोंपी गेल्याचीही उदाहरणें कानावर आहेत. सारांश अशा निवडणुकापासून योग्यता वाढावयाची ती उलटी कमी होत जाते.

जेथें सेशनकोर्टाचीं कामें चालतात ते गाव जिल्ह्याचे असतात तेथें असेसर व इतर कमिट्यांचे पंचही चांगली निवड केली असतां निर्दोष मिळण्याचा संभव आहे, अगदीच मिळणार नाहींत असा हल्लींचा काळ नाहीं. तरी हें खरें आहे कीं थोडे मिळतील. मिळेनात. चिंता नाहीं. गबाळ पुष्कळ मिळण्यापेक्षां चांगले थोडे मिळाले तर बरें. कारण पुष्कळ वाईटाच्या मिश्रणानें थोड्या चांगल्याची धुळधाणी होते सबब अशा कामीं आजवर अयोग्य प्रकारच्या ज्या निवडणुका झाल्या आहेत त्याचा दोष सरकाराकडे आहे. तो सरकारानें काढून टाकिला पाहिजे व विद्वान आणी प्रमाणीक लोक अशा कामीं नेमिले पाहिजेत ह्मणजे ते कामें चांगलीं करतील व हिंदुलोकांस तशा प्रकारची राजकीय अथवा सार्वजनिक कामें स्वतंत्रपणें करण्याची चांगली योग्यता आहे हें सर्वांचे दृष्टीस ते आणून देतील. मग त्यांच्या उदाहरणानें व विद्यावर्धनानें तालुक्याच्या गावांतूनही चांगले मनुष्य कालांतरानें मिळूं लागतील.

या कमिट्यांच्या कामांत कोठें कोठें असा प्रकार पहाण्यांत आला आहे कीं, बहुत नेटिव मेंबरांचें मत विरूध्ध असतांही थोड्या युरोपियन लोकांनीं हिकमतीनें आपले मताकडे अध्यक्षास घेतलें व सरकारानें ही त्यांची गोष्ट अखेर पर्यंत मंजूर केली असें होणें हें पक्षपाताचें व नेटिवांच्या योग्यतेस बट्टा आणणारें आहे. सबब हा दोष युरोपियन मेंबरांचा व सरकारचा आहे, तो त्यांनीं काढून टाकिला पाहिजे व ते न काढतील आणि तसें वारंवार घडेल तर अशीं अप्रतिष्ठेचीं कामें नेटिवांनीं सोडून दिलीं पाहिजेत. व वरिष्ठ सरकाराकडे त्याची दाद लाविली पाहिजे. रास्त गोष्ट ही आहे कीं, ज्या बाजूला बहुमत त्या बाजूला अखेर ठराव असावा.

या म्युनिसिप्यालिटीच्या व लोकलफंड कमिटीच्या अध्यक्षाच्या जागा सर्वकाळ युरोपियन मुख्याधिकाऱ्याकडेसच असतात तें बरोबर नाहीं. तेणेंकरून कधीं कधीं वाईट होतें. अध्यक्षाकडे दुसरा जो मोठा अधिकार असतो त्याच्या वजनानें त्याचे खालचे दरजाचे कित्येक भिडस्त सरकारी कामदार व इतर पंच त्याचे मताशीं मिळूनच, आपलीं मतें राखितात तेणेंकरून निस्पृह पंचाचे बाजूस मतसंख्या कमी होऊन पक्षपाताचा ठराव होतो. तसें न व्हावें याजकरितां व नेटिवांस तशीं कामें करितां येतात किंवा नाहीं हें पहाण्याकरितां अध्यक्षाचे जागेचाही हक्क कांहीं कालमर्यादेनें नेटिवांस देत जावा ही दुरुस्ती सरकारानें केली असतां नेटिवांच्या स्वतंत्रपणें काम करण्याच्या योग्यतेंत विशेष गुण होईल

तसाच दोष घालविण्यास आणखी एक उपाय दिसतो तो असा—कमिट्यांत मेंबर व कोर्टांत असेसर जुरर ह्मणून निवडले गेलेले लोकांत जे साधारण लिहिणारे वाचणारे आहेत व जे प्रतिष्ठितांत मोडतात ह्मणून, किंवा कांहीं भीडभाड ह्मणून, अथवा हांजी हाजी करणारे ह्मणुन, किंवा फायदा करून देणारे ह्मणून ज्यानां तसे नेमिलें आहे त्यांणीं कांहीं गोष्टी जरूर ध्यानांत ठेविल्या पाहिजेत. त्या ह्या की, हें सार्वजनिक काम आहे. हें आपण मोठ्या काळजीनें करावें. यांत भिडेभाडेनें कोणाची तरफदारी करूं नये. लोभानें आपला मतलब साधूं नये. द्वेषबुध्धीनें कोणाचें नुकसान करूं नये. व निश्चलमनानें सर्व प्रसंगीं प्रामाणिकपणा आणि निस्पृहता राखून ती डगमगूं देऊं नये. इतकें केलें ह्मणजे मग त्यांचे अंगीं विद्वत्ता थोडी असली तरी तितकी पुरे होईल. ते बी. ए. अगर एम. एच असले पाहिजेत असें कांहीं कारण नाहीं. सबब इतकी सुधारणा झाली तर तिच्या योगानें राजकीय अथवा सार्वजनिक कामें स्वतंत्रपणें करण्याची निर्दोष योग्यता आपले लोकांत पुष्कळअंशीं येईल यांत संशय नाहीं.

[ पुढें चालू. ]

हें पत्र अकोले एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

REGISTERD NO 7, 1874

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० १३ माहे सप्तंबर सन १८७४ इ० अंक २०

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ॰४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १॰८ |
| " अखेर | २ |

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ॰१॰६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ॰१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ॰४ |
| " दुसरे खेपेस | ॰२ |

## वसूल.

| | रु० |
|---|---|
| रा. रा. बापूराव कृष्ण वकील मेहेकर | २७ |
| ,, ,, वामन गणेश रहातेकर स्कूलमास्तर | ६॰८ |
| ,, ,, विठ्ठल कृष्णनाथ अकोट | ६॰८ |
| ,, ,, कृष्णाजी दिनकर सहस्त्रबुद्धे | १५ |
| मि० नूरखान ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सि पाल | ६॰८ |
| ,, करीमखान पो० इं० | ६॰८ |
| शेट केवळराम चतुर्भूज साहू | ५॰१० |
| संगमनेर लायब्ररी | ३ |
| नेटिव लायब्ररी परतवाडा | ४ |
| रा० काळू वल्लद मानशिंग पाटील पाथर्डी | ६॰८ |
| शेट केशवराम रामजस साहू खामगाव | ७॰८ |
| ,, रामविलास पोखरमल | १०॰१२ |
| मि० शिवराम अंबादास चीफ कान्स्टेबल वाशिम | ६॰८ |
| ,, भोलाशिंग चीफ बाळापूर | ८॰८ |
| श्री० रा० आपासाहेब पटवर्धन जमखिंडीकर | ६॰१० |
| रा० रा० यशवंतराव वल्लद दर्याजीराव देशमुख बोर्डी | ६॰८ |
| ,, व्यंकटराव देशमुख वडनेर भोलजी | ६॰८ |
| ,, भगवंत राजाराम रजि० कारकून दर्यापूर | १८ |
| ,, बाळाजी कोंडेश्वर देशपांडे दाभे | ६॰८ |
| मे० डेविस साहेब अ० क० | १८॰५॰८ |
| ,, हीथसाहेब पो० सु० | ३॰४ |
| रा० कृष्णाजी पाटिल पुनोतीकर | ५ |
| ,, लक्ष्मण जनार्दन मास्तर मुळावे | ६ |
| मि० साहेबखान असिस्टंट मास्तर पातूर | ५ |
| रा. रा. जयवंत बाजीराव दे० | ९ |
| ,, ,, रंगराव विठ्ठल जहागिरदार | ५ |
| ,, ,, राजेश्वर अंबादास वाशिम | २४॰१२ |
| ,, ,, व्यंकटेश गोपाळ देशपांडे चिखली | ६॰८ |
| ,, दिनकर बापूजी मास्तर दहीहंडा | २० |
| ,, ,, विष्णू सखाराम बापट क्लार्क आफ धि कोर्टे | १०॰१॰६ |
| ,, गोपाळ गंगाधर स्कू.मा. | २३॰१२ |
| मि० दुनियासिंव्ह पो. इंस्पेक्टर | ६॰८ |
| ,, महमद इस्मायल मास्तर येवले | ४॰२ |
| रा० गोविंद हरबाजी कुळकर्णी | १९॰१॰३ |
| रा. रा. बजाबा रामचंद्र डेपुटी इन्स्पेक्टर | ६॰८ |
| ,, दत्तात्रय श्रीनिवास बुलढाणें | १० |
| ,, दामोदर नारायण ठोंबरे खामगाव | ८॰६ |
| वर्धा नेटिव लायब्ररी | ६॰८ |
| मि० नरसय्या ची. का. तेल्हारे | १७॰४ |
| ,, धर्माजीराव प्रताप ची. का. | २० |
| ,, बमनजी उकडजी आणि कंपनी | ६ |
| मे० रेसिडेंटसाहेब हैद्राबाद | २९॰४ |
| मे० ताजुदीन साहेब असि० क. | ३॰१२ |

## नोटिसा.

नोटिस—अमृतराव वल्लद नारायण देशमूख अज्ञान पाळणकरणार मणकर्णी काबाई रहाणार तेल्हारे यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचा भ्रतार नारायण देशमुख आमचा बंधु मरण पावला. आपले अविभक्त मिळकतीची अद्यापपर्यंत वाटणी झाली नाहीं परंतु काहीं स्थावर मिळकत माझे वाहीवाटींत आहे. बरोबर हिसा करून घ्यावा तर तुमचा मुलगा अज्ञान व तुह्मी स्त्रीजाती असल्यामुळें वाटा करून घेतला नाहीं.

हल्लीं तुमचा चिरंजीव अमृतराव कांहीं सज्ञानदशेत अला असोन त्याचे मतें तुह्मी अविभक्त जिनगी, पैकी काही मालाची विक्री केली सबब या नोटिसिनें असे कळविले जाते की समाइक जिनगीचा वाटा झाल्यावाचून तुह्मास त्या मालाची विक्री कर्ण्याचा अधिकार नस्तां विक्री केली ती कायदेशीर झाली नाहीं. व पुढें अणखी कराल तर होणार नाहीं. यासाटीं या नोटिसिचे तारखेपासून १५ दिवसाचे अंत हिशाप्रमाणें वाटा करूनद्यावा. न दिल्यास योग्य कोर्टांत दावा करून या नोटिशीचे खर्चासुद्धा घेतले जाईल कळावे तारिख ८ माहे सत्पंबर सन १८७४ इ.

( सही )कृष्णाजी फतेसिंगजी देशमुख
दस्तुर खुद्द.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### पोलिस खात्यांतील हरीप्रसादाचा प्रसाद.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस. :—

वि. वि. खालील मजकूर कृपा करून प्रसिद्ध करावा.

इंग्लिश सरकारच्या राज्यांत प्रजेस सर्वे प्रकारचे सुख आहे, प्रजेस सुख होण्यासाठीं व तंटे, बखेडे, चोरी, मारामारी, खून, वगैरे न व्हावे ह्मणून सरकारानीं अनेक प्रकारचीं खातीं उत्पन्न करून सर्वत्र स्वस्थता ठेविली आहे. यामुळें सर्व लोक सुखी आहेत.

तैमुरलंग वगैरे बादशहाच्या वेळेस सुष्ट लोकांचा यत्किंचितही कष्ट न करितां अनेक तऱ्हेनें छळ करून शेवटीं त्या बादशहाच्या मनास द्रव न होतां तो दुष्ट आपल्या प्रजेस खष्ट खष्ट शिक्षा देऊन शेवटीं त्यांचा प्राण सुद्धां घेई व यांत त्याला कांहींच वाटत नसे. तेव्हां अशा समयास प्रजेची काय व्यवस्था होत असेल याचा विचार वाचकांकडेसच करण्याचें सोंपवितों.

वरील स्थितीचा व राज्याच्या व्यवस्थेचा इतिहास वाचतांच आंगावर शहारे उत्पन्न होतात, तेव्हां हल्लींच्या राज्यांत प्रजा सुखी आहे असें मानण्यास बिलकुल हरकत नाहीं.

असा जरी इंग्लिश राज्यांत बंदोबस्त आहे तरी ह्या आमच्या दुर्दैवी आणि हतभाग्य पिंपळनेरास आज सुमारें ४।५ महिने झाले तो बंदोबस्त जाऊन शुद्ध मोठें बंड मातलें आहे.

ह्या राज्यांत अशा प्रकारचा बंदोबस्त असून बंड करणार कोण? अशा प्रकारची शंका वाचकांच्या मनांत सहज उत्पन्न होईल. त्यास येथें बंदोबस्ताकरितां नेमिलेल्या पोलिसखात्यांतील शिपाया पैकीं, हरीप्रसाद या नांवाचा मोठा दांडगा शिपायी आणि त्यांस कांहीं छचोर मंडळी मिळून हें बंड मातलें आहें. या बंडामुळें गांवांतील लोकांवर कोणत्या प्रसंगी कसा प्रसंग येईल हें सांगवत नाहीं. यामुळें सर्व लोक त्या हरीस चळचळा भितात.

वरील मंडळी रात्रीस हातांत सोटे घेऊन रात्रीस जो भेटेल त्यास बिनधोक ठोकून ठोकून शरणागत आला कीं त्यास सोडतात.

तारीख २६ आगष्ट सन १८७४ इसवी रात्रौ सुमारें १२ बाजल्यावर वरील हरी यानें आपल्या यमदरबाराच्या पोशाखानिशी एका गरीब बिचाऱ्या कुणबी गड्यास तो रात्रीचा लघुशंकेस बाहेर आला असतां खूप ठोकून त्यास सोडविणाऱ्यासही बरेंच मारिलें.

पुन्हा तारीख २९ मिनहू रोजीं हरीनें चावडीवर जो दंगा केला तो अवर्णनीय आहे. तो हातांत तरवार घेऊन कोणाचा तरी खून करावा ह्या हेतूनें धांवला परंतु त्याचा तो बेत सिद्धीस न जातां एक रात्र त्यास तुरुंगांत रहावें लागलें.

वरील शिक्षेनें लोकांस त्या रात्रीं जो आनंद झाला त्याचा विरस दुसऱ्या दिवशीं पहाटेसच त्यास माजिस्ट्रेट साहेबानीं सोडून दिल्यामुळें होऊन पिंपळनेरवासी जनांस मोठाच दरारा बसला.

पत्रकर्ते महाराज वरील कैदी सुटण्यासारखा नसतां व त्याच्या या अघाटित कृत्यास सर्व गाव साक्षी असतां सुटला गेला, तेव्हां वरिष्ट अधिकाऱ्यास त्याचें कृत्य बरें वाटतें ना ? अधिकाऱ्याकडून त्यास अशा प्रकारच्या कृत्यांत बहादारी मिळाल्यामुळें तो आतां कशा प्रकारचा वागूं लागेल याचें अनुमान आपणच करून त्यांच्याही वरिष्ठाचे कानावर घालून पिंपळनेरस्थ जनास काळजींतून मुक्त कराल ही आशा आहे.

आपण आह्मा सारख्यांचीं दुःखें सरकारच्या कानावर घालण्याचा धंदा पत्करल्यामुळें ह्या दोन ओळी आपल्याकडे पाठविल्या आहेत, तरी याचा अव्हेर न व्हावा. येतो आतां लोभ आहेच ही विंनती.

मित्ती श्रावण वद्य ७ बुधवार शके १७९६ मुक्काम पिंपळनेर जिल्हा खानदेश.

आपला
पिंपळनेर वासी
क.

### वऱ्हाडांतल्या शाळाखात्यांतील योग्य वर्गावर्गी!

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस :—

साष्टांग नमस्कार वि. वि. आपला व माझा परिचय मुळींच नाहीं, परंतु आपण सत्यप्रिय आहां, ह्मणून आपली आख्या ऐकून आपलेकडे धाव घेतली आहे, तरी पुढील चार ओळींचे आपण योग्य विचारपूर्वक मनन करून त्या आपले मतासह छापण्याची मेहेरबानगी करावी.

एडिटर महाराज या वऱ्हाडांत शाळा खातें स्थापन होण्यास सरासरी १०।११ वर्षे झालीं. प्रथमारंभीं मोठ मोठ्या भपक्या दाखवून बिचारे मास्तर लोकांस रत्नागिरी पुणें, सोलापूर, वगैरे दूरदूरचे स्थळांहून आणले आणि आतां अर्ध्या अडांत सोडून मध्येंच दोर कापावा, तसें चालविलें आहे. नुकतेच सन १८७१ त ग्रेडेशन झालें, त्यावेळीं मास्तर लोकांवर जो कहर गुजरला तो सांगवत नाहीं. त्या ग्रेडेशन रूपी असिलतेचे घावानें लोक अर्ध मेले झाले, ते असें—पूर्वीं अडगांवची शाळा फार वाईट स्थितींत होती, ह्मणून ती सुधारण्या करितां वानखेडचे मास्तर सारख्याच पगारावर तेथें नेलें, त्यानीं ती शाळा अतिशय झटून व लोकांसी सख्य ठेवून इतकी चांगली जमवली कीं, त्या शाळेंत पूर्वीं २०।२५ मुलें होतीं ती त्यानीं १००-केलीं. व लोअरक्लास होतें, तें मिडलक्लास करण्याचा बेत आणला, व ग्रेडेशन मध्यें ती शाळा मिडलक्लास केली, व पूर्वींच्या मास्तरास एकंदर ३५ साचे ३० व

र प्रमोशन करून लोअर क्लासस्कुलावर नेमलें, व अडगावास ९० चा नवा मास्तर आणिला. कां पत्रकर्ते महाराज बिचाऱ्याचे ९० तर एकीकडे राहिले परंतु उलटें ३० वर घातले याचेंच नांव प्रमोशन? अशा रीतीनें कोणत्या तरी मास्तरांस शाळा सुधारण्याविषयी उत्तेजन येईल काय? याचा आपणच विचार करावा. बरें असो, ती जखम जेमतेम शांतवनरूपी मलमाच्या पट्या लावून बरी होत आली न आली, तों दुसरी महा प्रलयकारी शक्ती सन १८७५ च्या फेब्रुवारींत सोड ण्याकरितां तयारी चाललीच आहे. जसें एकादी मोठी नदी ह्मणा अगर जलधि ह्मणा, कोसा दीड कोसावर असतांनां अगोदरच त्याच्या तिरावर गार वारा येऊन अंगास शेवतो, अगर येकादे प्राण्याची प्राणोत्क्रमणाची अवधी येऊन ठेपण्यापूर्वी च त्याजवर प्रेतचिन्हें दिसूं लागतात. तद्वत् भावी ग्रेडेशन शक्तीचा धक्का सहा सहा महिने अगाऊ येऊन बसला, याचे योगानें प्रेतगतींत, येकादे क्षुद्र प्राण्यास जसें भाल्यानें अगर बरचीनें डंवचावें तद्वत् मास्तरलोकांची दशा झाली आहे. अहो एडिटर महाराज, हा दोष शाळाखात्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांवर नाहीं. ह्मटलें आहे "परदुःखेन दुःखिता विरलः" असो फार पाल्हाळ कशास पाहिजे, आपल्यानें जर बिच्याऱ्या गरीब मास्तर लोकांचे दुःखाचा उपसंहार करवला, तर बरेंच झालें, नाहीं तर महान् भगवद्भक्त व सकलानुभवी तुकाराम महाराज यांचें वचन आहे कीं, "आलिया भोगासी असावें सादर ॥ देवावरी भार घालूं नये" ते अहर्निशीं चित्तीं वागऊन मन पर्वताप्रमाणें कठीण करून, ग्रेडेशनरूपी वज्राचे प्रहार सहन करण्यास सिद्ध व्हावें. असो. प्रस्तुतच्या विषयाकडे वळूं. हल्लीं नोकरी ह्मणजे अतिशय दुर्मिळ झाली आहे. नोकरी लागून आपला प्रपंच धड गतीनें व्हावा, ह्मणून बाल्यावस्थेपासून तरुणावस्थेची पूर्ण दशा प्राप्त होईपर्यंत, कदर्युप्रमाणें विद्या धन संपादन करण्यांत काळ घालवावा, शरिरानें अनेक प्रकारचे कष्ट सोसावे आणि दैवानुसार युनिव्हर्सिटीमध्यें एम. ए., एल. एल.बी सारख्या परिक्षा पास व्हाव्या, इतकें होऊन तरी योग्यतेनुरूप जागा मिळत असतील, तर नाहीं हो महाराज, "मनसा चिंतयेत् कार्यं, दैवो अन्यत्र चिंतयेत्." याप्रमाणें अवस्था होऊन जाते. कशी ह्मणाल तर उमरावती जिल्ह्याचे डे. ए. इन्स्पेक्टर वारल्यावर या खात्यांत जी वर्गावर्गी झाली तिजवरून माझी तर अशी खात्री होते कीं, "पळस कोंकणांत गेला तरी पानें तीनच." नार्मलस्कुलांतील प्रिन्सिपालची जागा उमरावती हायस्कुलांतील मि० नूरखान यांस दिली. हे मराठी भाषेचे मोठे मर्मज्ञ असतील नाहीं बरें, अहो हें असो; परंतु मोठें नवल वाटण्यास दुसरें कारण हें कीं, उमरावती हाय स्कुलांतून खान यांचे जागेवर लखनौहून एक अतिशय विद्वान आणिले आहेत. काय हो, वऱ्हाडांत अगर मुंबई इलाक्यांत विद्वानांचा अगदी लोपच झाला काय हो! आतां आमचे लोकांनीं लखनौ येथें तरी विद्याभ्यासाकरितां जावें ह्मणजे आमचे डायरेक्टर साहेब प्रसन्न होऊन तेथून आमचे लोकांस नोकरीवर बोलावतील असें वाटतें असो जास्त काय लिहूं. पत्रविस्ताराची माफी असावी, लोभ करावा ही विनंती.

मास्तरलोकांची अवस्था
पाहून दुःखित झालेला
एक मुंजा.

# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुध्द ३ शके १७९६

मास्तर लोकांची अवस्था पाहून दुःखित झालेला एक मुंजा या सहीचें पत्र आलेलें वरचे बाजूवर छापिलें आहे त्यांतील बहुतेक मतें आह्मास संमत नाहींत. प्रथम तो ह्मणतो कीं, मेठमेठाल्या भपक्या दाखवून मास्तर लोकांस लांबलांबून इकडे आणिलें व अडांत सोडून अर्ध्यावर दोर कापावा तसें आतां त्यांस केलें. ही गोष्ट खोटी आहे असें आम्ही ह्मणतो. मास्तर लोकांनां भपक्या कोणत्या दिल्या? व त्या कोणी दिल्या ? दहा अकरा वर्षांमागें डायरेक्टर साहेबांची नेमणूकसुध्धां झाली नव्हती व त्यावेळीं जे मास्तर लोक इकडे आले त्यांस पुढें पेनशनें मिळणार नाहींत असें सुद्धां कळविलें होतें. असें असतां त्यांनां भपक्या दिल्या असें कसें ह्मणावें ? तहशिलदारी मुनसफी देखील तुह्माला देऊं असें कोणी ह्मटलें होतें कीं काय? नाहीं. असें बिलकुल नाहीं. चांगले मनुष्य मिळावे ह्मणून पगार मात्र अघळ पघळ कबूल केले होते व त्याप्रमाणें ते त्यांस दिले व पुढें पेनशनासही त्यांच्या नोकऱ्या रुजू केल्या हे त्यांवर वास्तविकरीत्या उपकार केले ह्मणावयाचें.

दुसरें, अडांत सोडून अर्ध्यावर दोर कापला ही गोष्ट खोटी आहे. जे हुशार लोक इकडे आले त्यांतील बहुतांचे पगार व भरवसे कायम राहिलेले आहेत व कित्येकांस बढत्याही मिळालेल्या आहेत. आतां एवढें मात्र झालें आहे कीं हुशाराबरोबर गाबाळही कित्येक लोक नव्या भरताडांत आले व त्यांची निवड करून त्यांस टाळण्याचा तो प्रसंग नव्हता ह्मणून डोळ्यावर कातडें ओढून त्या लोकांस जागा देऊन ठेवून घेतलें व सुधारतील ह्मणून ५।७ वर्षें निभाऊन घेऊन वाटही पाहिली परंतु ते भपकीवालेच! शहाण्याचीं सोंगें घेऊन आलेले! त्यांचें खरें स्वरूप बाहेर पडलें तेव्हां त्यांचे योग्यतेप्रमाणें कमी पगारावरच त्यांस घालणें उक्त दिसलें. तरी या गोष्टीला अर्ध्या अडांत दोर कापण्याची उपमा मुळींच लागू होत नाहीं.

तिसरें, कित्येक वर्षें कामें चालल्याच्या अनुभवावरून ग्रेडेशन करणें अवश्य झालें व गावाच्या योग्यतेप्रमाणें गावाला शाळा ठेवणें अवश्य झालें तरी त्यांत चांगल्याच्या गुणाची बूज झाली नाहीं असें नाहीं. कित्येकांस प्रमोशनेंही मिळालीं आहेत. कित्येकांस त्यांचा पहिला पगार कायम राखणें अवश्य होतें पण जागाच नसल्यामुळें कांहीं कमी पगाराच्या जागा त्यांस देणें भाग झालें. यांतही अडांत दोर कापणें किंवा भपकी देऊन फसविणें झालें नाहीं असें आह्मी ह्मणतो.

आतां पुढील फेब्रुवारी महिन्यांत ६ मिडलक्लास स्कुलें कमी करण्याचा विद्याखात्याचा निश्चय झाला आहे तर ती गोष्ट सहा महिने पूर्वी प्रसिद्ध केली आहे व त्यासंबंधानें जे लोक काढावयाचे आहेत त्यांस दुसरी नोकरी पाहण्याकरितां पुष्कळ फुरसद दिली आहे. व ज्या शाळा कमी केल्या त्यांतीलच लोक काढिताहेत असें नाहीं. वर्गावर्गी करीत करीत निकृष्ट प्रतीचे लोक काढणार आहेत असें समजतें तर ही योजना दूषणार्ह आहे असें आह्मांस वाटत नाहीं.

आतां कैलासवासी चिमणाजी राजाराम यांच्या वर्गावर्गींत मि० नूरखान यांस ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सिपालची जागा मिळाली आहे त्यास अनुलक्षून तो पत्र लिहिणारा मुंजा असें ह्मणतो कीं, "हे मराठी भाषेचे मोठे मर्मज्ञ असतील नाहीं बरें?" आम्ही या लिहिणारास खात्रीनें सांगतो की नूरखान हे मुसलमान लोकांतच काय पण बहुत हिंदु लोकांतही वरचढ असे मराठी भाषेचे मर्मज्ञ आहेत. व आजच्या स्थितीला साऱ्या वऱ्हाडांत नूरखानापेक्षां अधिक तर काय पण यांच्या बरोबरीचा तरी हें काम चालविण्यास लायक मनुष्य डायरेक्टर साहेबांस आढळेल असें आह्मास वाटत नाहीं. मराठी, इंग्रजी, हिंदुस्थानी आणि फारशी या चार भाषा नूरखान यांस चांगल्या अवगत आहेत. नुसते मराठीचे मर्मज्ञ एकादे पंडीत आणून या जागेवर बसविले असते तर त्यांचा काहीं उपयोग झाला नसता असें आह्मांस खचीत वाटतें. फार तर काय पण पूर्वींच्या नेमणुकीहून हल्लींची नेमणूक अधिक चांगली झाली असेंही आह्मी स्पष्ट ह्मणतो. सबब मुंजानें नूरखान यांस दिलेला दोष सर्वथैव व्यर्थ आहे असें आमचें मत आहे.

शेवटची गोष्ट, लखनौहून एक दोन मुसलमान गृहस्थ विद्याखात्यांत आणिलेले आहेत त्यांच्या येण्यानें या मुंजास वाईट वाटूं लागलें आहे कीं आह्मी नेटिव लोक लखनौस गेलो तर आह्मांस डायरेक्टर साहेब नोकरीकरितां बोलावितील. पण या ह्मणण्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. मुंबई इलाख्याकडून सुमार हजारभर लोक आले असतील. व लखनौकडून आलेल्यांत जर मि० जहरूदीन यांसारखे सुशील सद्गृहस्थ आहेत तर तसे पुष्कळ लोक इकडे यावे असें आह्मी मनापासून इच्छितों. व लखनौची मुसलमानी भाषा दुसरीकडच्या भाषेपेक्षां उत्तम आहे ही गोष्ट खोटी नाहीं. सबब या संबंधानेंही पत्र लिहिणारानें डायरेक्टर साहेबास दिलेला दोष रास्त नाहीं असें आह्मांस वाटतें.

## पाऊस.

गेल्या आठवड्यांत पावसाविषयीं जी फार काळजी होती ती या आठवड्यांत ईश्वरानें दूर केली. सोमवारपासून पावसाचें लक्षण सुरू झालें. त्याप्रमाणें त्या दिवशीं दोन प्रहरीं थोडा पाऊस पडला, मंगळवारींही थोडा पडला, व गुरुवारीं उत्तर रात्रीं व आज पहाटे फारच चांगला पाऊसपडला तेणेंकरून सर्व लोकांस संतोष झाला. भोवतालींही पाऊस चांगला पडल्याची खबर आली आहे. व अजूनही पडण्याचीं चिन्हें आहेत.

परजन्याचें सूत्र केवळ ईश्वराचे हातीं आहे त्याच्या इच्छेस येईल तेथें तो वृष्टी करितो व त्याची इच्छा नाहीं तेथें तो करित नाहीं. गेल्याच आठवड्यांत खानदेशांतील धुळें व नागपुराकडील भंडारा एथील परजन्याच्या आलेल्या खबरा परस्पर कशा भिन्न आहेत त्या पहाव्या.

धुळें तारीख ४ सप्तंबर सन १८७४ एक महिन्यापासून पर्जन्य नाहीं. दिवसा ढगें आणि रात्रीं स्वच्छ चांदणें या प्रमाणें क्रम सुरू आहे. एकंदर उघाडींत ४० सेंट पर्जन्य पडला. पाण्यावाचून पिकें आणि शेतकरी लोक हवालदील आहेत याप्रमाणें जिल्हाभर हाका हांक आहे. नशिराबाद जळगांव वगैरे ठिकाणीं पिकें उन्हानें जळण्याचे बेतांत आलीं आहेत. सत्वर पर्जन्य पडेल तर शांतता होईल.

भंडारा, तारीख १ माहे सप्तंबर १८७४ इसवी यंदा मेघराज साल गुदस्तची त्यांजकडे राहिलेली शिल्लक दामदुपटीनें पुरी करून देत आहेत. आतां लोक त्यांस हात जोडून विनंती करीत आहेत, कीं, आपण या सर्व चराचर सृष्टीचें जीवन आहां हें खरें; परंतु सध्या महिना दीडमहिना दर्शन न दिल्यास चालेल, कारण की, आजपर्यंत आह्मांवर वृष्टीरूपें कृपादृष्टि केली, तिच्या योगानें आह्मी आनंदाब्धींत यथेच्छ क्रीडा करीत आहों. यास्तव सध्या ज्या प्रदेशीं लोक आपल्याकरितां तृषित असतील, तिकडे जाण्याचा बेत करावा.

यावरून हे केवळ ईश्वर इच्छेचे खेळ आहेत. व सुबत्ता आणि दुस्काळ हे त्याचेच परिणाम आहेत. तरी इतकें खरें कीं ईश्वर दयाळू आहे ह्मणून आर्त जनांनीं निष्ठापूर्वक त्याची प्रार्थना करीत जावी ह्मणजे तो फलप्राप्ती बहुशा देत जाईल.

## तहशिलदार लोकांस भत्ता कां मिळू नये?

ज्या कामदारांस त्यांचे तालुक्यांत, जिल्ह्यांत किंवा त्यांचे हुकमतीचे हद्दींत काम करण्याकारितां फिरावें लागतें त्या कामगारांस पगाराखेरीज वाटखर्चीप्रीत्यर्थ सरकार खर्च देत असतें. गावगन्ना फिरतानां पुष्कळ त्रास असतात व वेळेस मिळतील तसे जिन्नस घेणें भाग पडतें. ह्मणून सर

कार भत्ता देतात, हे योग्यच आहे. सरदार लोकांस तंत्रकरितांही भत्ता ज्यास्त मिळत असतो. याप्रमाणें कामदाराच्या सोयी केल्या आहेत. परंतु तहसिलदार लोकांस याप्रमाणें कां भत्ता मिळत नाहीं कोण जाणें. वास्तविकरीत्या पाहिलें असतां तहसिलदार लोकांस तालुक्यांतून दुसरे सरदारांपेक्षां ज्यास्त फिरावें लागतें. व सर्वोपरी परिश्रम त्यानांच ज्यास्त असतात. तालुक्यांत कोणतेंही प्रकारची सुधारणा होणें किंवा कांहीं करणें झाल्यास तहसिलदारांच्या श्रमावांचून कधींही होत नाहीं. हमेषा त्यांना खेडे गांवांतील अडाणी रयतेबराबर उरसफोड करावी लागते, व सर्व गोष्टी त्यांनां समजावून सांगाव्या लागतात याशिवाय देवीखात्यांतील व शाळाखात्यांतील वगैरे लोकांस त्यांनां लागेल तशी मदत द्यावी लागते. कोणी सरदार आले गेले त्यांचीही सरबराई करावी लागते. याप्रमाणें तहसिलदाराकडे श्रमाचें सर्व अष्टाधिकार असतांही त्यांनां वरकडाप्रमाणें सरकार भत्ता देत नाहीं हें आश्चर्य आहे. अ० कमिशनरचे स्वारींत असलेले कारकुनास अगर शिपायास सुद्धां भत्ता मिळतो. डे० ए० इन्स्पेक्टर लोकांसही, भत्ता मिळतो. इंजिनियर खात्यांत व याप्रमाणें बहुतेक खात्यांतील फिरणारे कामदारांस भत्ता मिळावा आणि ज्यांनां रात्रंदिवस धावाधाव करावी लागते त्यांनां मात्र भत्ता मिळूं नये हें न्यायापासून बरेंच दूर आहे, असें साधारण पांच वर्षांचें मूल देखील कबूल करील.

आतां सरकारानीं असा जर विचार केला असेल कीं, तहसिलदारास मोठमोठे पगार आहेत व तालुक्यांतून तेच सर्व सत्तात्मक अधिकारी आहेत त्या अर्थी त्यांनां तालुक्यांत फिरतांनां कोणचीच अडचण पडत नसेल.

पण असा समज बहुशा नसेल व असल्यास तो चुकीचा झटला पाहिजे, अस्तू, सारांश सर्वांपेक्षां तहसिलदारांवर कामाचा बोजा जास्त असतो, व त्या मानानें त्यांची मेहेनतही असते. सबब ते तालुक्यांत फिरतात तेव्हां त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला ( भत्ता ) मिळणें रास्त आहे व या संबंधानें आमचे मे० कमिशनर साहेब व मे० रेसिडेंट साहेब कांहीं योग्य विचार करतील अशी इच्छा आहे. आतां विचाराकरितां हा प्रश्न हातांत घेणें झणजे सरकारास थोडेंसें जड वाटेलच, कारण कीं, या योगानें सरकारचा खर्च थोडा बहुत वाढेल याजकरितां ही पुष्कळ विचारावर गोष्ट पडेल, तत्रापि विचारा अंतीं तहसिलदारांनां भत्ता देणें रास्त आहे असें सरकारास वाटल्या वांचून रहाणार नाहीं.

प्र. सिं.

## वऱ्हाड.

असें ऐकण्यांत आलें आहे कीं रा० रा० आत्माराम भिकाजी एकस्ट्रा आसिस्टंट कमिशनर यांनीं आणखी ४ महिन्यांची रजा मागीतली आहे. व त्यांचे रजेंत रा. रा. भास्कर सखाराम अकोला डिपुटी कमिशनरचे क्लार्क आफ धि कोर्ट यांस आफिशियेटिंग एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर करणार.

निजामसरकारास बडोद्याचे सावकार गोपाळराव मैराळ नऊ कोटि रुपये कर्ज देणार असें वर्तमान आहे त्याहून दुसरें आणखी असें वर्तमान आहे कीं विलायतेंत एक युरोपियन सावकार १० कोटि रुपये कर्ज देण्यास तयार आहे. याप्रमाणें कर्ज मिळण्याची तयारी झाली आतां वऱ्हाड प्रांत परत मिळण्याची मात्र तजवीज राहिली आहे!

मिडलक्लास स्कुलांपैकीं खालीं लिहिलेल्या सहा ठिकाणचीं स्कुलें लोअरक्लास करण्याचा ठराव झाला आहे व तो पुढील फेब्रुवारीच्या पहिल्या तारखेस अमलांत येणार.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मुळावें. | १ | उमरखेड. |
| १ | सिंधखेड. | १ | वाभळी. |
| १ | हिवरखेड. | १ | दिगरस. |
| ३ | | ३ | |

६

या शाळा हल्लीं पन्नास रुपये पगाराच्या हेडमास्तराच्या आहेत त्यापुढें तीस रुपयांच्या होतील. व त्यांस हल्लीं वीस व दाहा रुपये पगाराचे असे दोन दोन असिस्टंट आहेत त्यांपैकी विसाचे असिस्टंट पुढें कमी होणार. व त्यांच्या हुशारीच्या धोरणानें त्यांच्या बदल्या होऊन अखेरीस कांहीं लोकांस फेब्रुवारींत काढणार आहेत व त्याजबदल त्यांस नोटिसाही मिळाल्या असें कळतें.

उमरावतीच्या हायस्कूलचे हेडमास्तर मि० म्याकिंटाश साहेब विलायतेस रजेवर आहेत ते लवकरच परत येणार असें वर्तमान आहे. हें खरें असेल तर उमरावतीच्या विद्यार्थ्यांनां पुन्हा काळजी आली!

अडगावचे एकस्ट्रा असिस्टंट कोर्टीला काम तोलत नाहीं सबब जळगाव तालुक्याकडील सुमार पावणेदोनशें, गाव त्यांचेकडे आहेत ते दुसरे कोणते कोर्टाकडे द्यावे असा विच्यार घाटत आहे.

एथील स्माल काज कोर्टांतून त्याच्या नाजर मारफत रविवारीं आठवडे बाजारांत जप्त झालेल्या मालाची विक्री होत असते त्या संबंधीं कांहीं गडबड आमचे कानावर आली आहे. तिजविषयीं अधिक खुलासा काढून लवकरच तो आह्मी आपले वाचकांस कळवू.

मेहकराहून पत्र आल्यावरून समजतें कीं तिकडे मघा नक्षत्रापासून पाऊस नाहीं. पण आतां पडला असावा असें वाटतें.

अडगावचे एकस्ट्रा असिष्टंट कमिशनर रा० रा० पुरुषोत्तम नारायण भट सहा दिवसांची रजा घेऊन येथें आले आहेत.

मि० दस्तुर बहिमनजी जामासजी असिस्टंट कमिशनर यांनीं आजारीपणाकरितां दोन महिन्यांची रजा घेतली व काल रोजीं ते पुण्याकडे आपले घरीं गेले. त्यांस लिवर कंप्लेन झणजे काळजाचे दुःखण्याची विकृती झाली आहे.

बुलदाण्याकडील पोलिसांपैकीं करीमखान व शिवरामसिंग कैदेंत आहेत ते हैदराबादेस अपील करण्याचे तजविजींत आहेत. व जमेल तेथपर्यंत बारिष्टरही पाठवावा असा त्यांचा आणि त्यांच्या साठीं झटणाऱ्या मंडळीचा हेतु आहे असें कळतें. आह्मास वाटतें कीं "बुडत्याचे पाय खोलांत" त्याप्रमाणें हा विच्यार आहे. भयंकर गुन्ह्याचे स्वरूपाला अनुरूप अशी शिक्षा झाली आहे ती आतां टळणें मुष्किल दिसतें. व पोलिसाच्या अनिवारपणाचा सर्वत्र बोभाटा झाला आहे. त्याअर्थी वरिष्ठ सरकार पोलिसास दहशत बसेल असेंच आपलें वर्तन ठेवील हें न्याय्य दिसतें, सबब असेल नसेल तें गोळाकरून व पाठीमागे राहिलेल्या बायावापड्यांनां बुचाडून रकम जमवून बारिष्टराच्या घरांत घालावी किंवा त्यांच्या पोषणार्थ राहूं द्यावी याचा विच्यार ज्यांचा त्यांनीं करावा हें योग्य आहे.

इतक्यांतच आह्मांस कळलें कीं काठेवाडांतील अशाच प्रकारच्या कृत्याबद्दल तेथील पोलिस सुपरिंटेंडेंट यांस १८ महिने कैदेची शिक्षा झाली व ५०० रुपये दंड झाला. ठीक!

अडगावचे पोलिस चावडींत तेल्हाऱ्याचे चीफकानस्टेबल व अकोटचे इन्स्पेक्टर समक्ष असतां ब्याहारीलाल नावाच्या कोर्टाकडील शिपायावर महमद कासम नावाच्या जागल्यानें गोळी भरलेली बंदुक सोडिली तेणेंकरून तो अतिशय घायाळ झाला आहे व वाचेल असा भरवसा नाहीं अशाबद्दल एक तपशिलवार पत्र आतांच आह्मांस आलें आहे तें आह्मी पुढील अंकीं घेऊ. ही गोष्ट पोलिसाविरुद्ध आहे सबब हिची चौकशी पोलिसमार्फत न होतां माजिस्त्रेटमार्फत व्हावी असें लोक इच्छिताहेत व आह्मीही डिपुटी कमिशनर साहेबानां तसा हुकूम द्यावा अशी शिफारस करितों.

## वर्तमानसार

विलायती व्यापाऱ्यांनीं इकडील सूत व कापड काढणाऱ्या कारखानदारांवर दोहोंकडून चाल केली आहे. येथें येऊन त्यांनीं कारखाने घालण्याची सुरुवात केली हा एक प्रकार व दुसरा प्रकार विलायती मालावरची जकात माफ करण्याचा उद्योग असा दोहोंकडून कचाटींत घालण्याचा प्रयत्न केला आहे. यांच्या खटपटीवरून विलायती मालाची तारीफ दुरुस्त करण्याचें आश्वासन हिंदुस्थान सरकारानें दिलें आहे या दुहेरी खटपटीपासून येथील कारखानदारांचा कसा निभाव होईल तो पहावा.

खिस्ती मिशनरी साधूचें कृत्य—हिंदुस्थानांत लष्करी खात्याकडील कोणी कर्नेल याची बायको वय वर्षे ३९ची पांच मुलांची आई ही एका पंचवीस वर्षाच्या वयाचा फ्रांचचे मिशनरी या साधुबावाचा हात धरून पांच मुलें मागें टाकून विलायतेहून अमेरिकेंस निघून गेली त्या बाईने या बावास एडिंबरो येथें आपल्या मुलास शिकविण्याकरितां गुरूजी ठेविलें होतें. पुढें त्या बाईचा व बावाचा दाट स्नेह जमून ते उठून चालते झाले.

१८५७ सालच्या बंडापैकीं अबदुल रसुफ नांवाच्या एका मनुष्यास, मागच्या सोमवारीं बडोद्यास पकडून मुंबईस आणला असून तो हल्लीं गिरगांव पोलीस चौकींत आहे. हा मनुष्य दिल्लीचा राहणार असून १८५७ च्या बंडांत प्रमुख होता व डाक्तर फ्रेजर व क्यापटन डग्लास या उभयतांस त्याप्रसंगीं यानेंच मारलें, असा याजवर आरोप आहे. हा मनुष्य बडोदे सरकारांत बरेंच दिवस पैलवानगिरीची नौकरी करीत होता. या कैदीस थोडे दिवसांतच चौकशी करितां एथून दिल्लीस पाठविलें जाईल असें समजतें.

श्रीमंत गायकवाड सरकारांनीं, न्याय, जमाबंदी, व पोलीस वगैरे तमाम खातीं नवीन करण्याचा झपाटा चालविला आहे. असें समजतें.

मद्रास इलाक्यांत निगापटण शहरापासून अजमासें पांच सहा कोसांवर कांहीं मुलांनीं आपल्यापैकीं एका मुलानें एक किडा मारल्यावरून त्याजवर थट्टेनें खुनाचा आरोप आणिला. मुलें इतकेंच करून उगीं राहिलीं नाहींत. तर त्याणीं आपल्यांतच सेशन भरवून आरोपित मुलाची चौकशी करून त्याजवर खुनाचा चार्ज ठेवला व फांशीची शिक्षा सांगितली व त्याणीं तेथल्या तेथेंच त्या गरीब बिचारे मुलास दोरानें टांगलें. हीं मुलें हल्लीं पोलीस चौकींत आहेत असें सौथ इंडिया टाइम्स वरून समजतें.

विलायतेस कुपर्स हिल कालेजमध्यें इंजिनियरिंगची परिक्षा पसार झालेले अजमासें ५० उमेदवार हिंदुस्थानास पब्लिक वर्कस खात्यांत नौकरी करण्याकरितां येत्या सप्टेंबर किंवा अक्टोबर महिन्यांत येणार आहेत. यांस सेकंड ग्रेड असिस्टंट इंजिनियरच्या जागा देऊन प्रत्येकास दरमहा ४५० रुपये प्रमाणें प्रथम पगार देणार. हिंदुस्थानांतील इंजिनियरिंग कालेजांत पसार झालेल्या उमेदवारांची काय वाट?

ज्या जागीं हल्लीं मद्रास शहर वसलें आहे त्या जागां युगांतरीं समुद्र होता असा मि० फूट या नावाचे एका भूरचनाशास्त्रवेत्यानें सिद्धांत केला आहे.

अमेरिकेंत युनायटेड स्टेट्स मध्ये सुशिक्षित लोक व त्यांच्या स्त्रियांत औषधाचे मिषानें अफूचा इतका खप होत चालला आहे कीं, हल्लीं दरसाल २५,००,००० रुपयांची अफू बाहेरून त्या देशांत जाऊं लागली आहे. अजमासें ३० वर्षांपूर्वी वर सांगितलेल्या रकमेच्या दशांशाचीही अफू जात नसे.    ने. ओ

बडोदें—मि० दादाभाई नवरोजी यांस श्री० मल्हारराव गायकवाड यांनीं दिवाण नेमून हिंदुस्थान सरकारासलिहिलें ती नेमणूक त्यांनीं मंजूर केली असें संतोषपूर्वक गायकवाड सरकारास कळविलें आहे. आतां दादाभाईस दिवाणगिरीचीं वस्त्रें देण्याचा समारंभ लवकरच होईल—येका पत्रांत असें लिहिलें आहे कीं नाना साहेब खानविलकर बडोद्याचे माजी दिवाण हे बडोद्यासच आहेत. व ते कोठें बाहेर निघाले तर त्यांचे लवाजम्यास स्वार वगैरे बरेच असतात—गायकवाडांनीं इंग्रज सरकारांतून रा० रा० माधवराव गोविंद, नाना मोरोजी, कृष्णाजी लक्ष्मण, व शंभुप्रसाद लक्ष्मीलाल यांस आपले दरबारीं मागितलें आहे त्यापैकीं नाना मोरोजी याविषयीं असें वर्तमान निघालें आहे कीं ते बडोदे दरबारांत कसलीही नोकरी पतकरण्यास खुशी नाहींत—सदरील चार गृहस्थाशिवाय मि० पेस्तमजी जहांगिर एलीयनेशन खात्याचे सेटलमेंट आफिसर यांचेंही नाव निघालें आहे व त्यांस १५०० रुपये पगार देऊं असें कबूल केलें आहे.

सर रिचर्ड मिल के. सी. एस. आय. म्हैसुरचे चीफ कमिशनर दोन वर्षांचे रजेवर विलायतेस जाणार व सर डोंग्लास फारसीथ के. सी. एस आय हे त्यांचें काम पहातील असें समजतें.

मि० रंगराव भिकाजी यांस रत्नागिरीस व मि० रामचंद्र बापूजी यांस कुलाब्यास हुजूर डिपुटी कलेक्टर नेमिलें.

रा० सा० व्यंकटराव संतापा यांस कानड्याचे दप्तरदार सखाराम शामजी पंत मरण पावले त्यांच्या जागेवर नेमिलें.

गेल्या महिन्याचे ३१ वे तारेखेस सकाळचे ५ वाजतां दिल्लीस धरणी कंपाचे कित्येक धक्के बसले,

जानेवारी पासून जुलई अखेर सात महिन्यांत हिंदुस्थानांतून विलायतेस चहा १,०५,६,३,००० पौंड गेला असें समजतें गुदस्त सालीं याच सात महिन्यत १,०८,७७,००० पौंड गेला होता.

रशिया व चीन यांजमध्यें लढाई होण्याचा संभव आहे अशी जर्मन वर्तमानपत्रांत बोलवा आहे.

हिंदुस्थानांतील सर्व जनावरांची खानेसुमारी करण्याविषयीं हिंदुस्थान सरकारानें इतर सरकाचे अभिप्राय मागविले आहेत.

मद्रासेंत कांहीं चमत्कारिक लोक आहेत ते आजारी असतां औषधोपचार वगैरे करीत नाहींत; कारण तसें केल्यानें ईश्वरावर भरंवसा नाहीं असें होतें असें ते ह्मणतात.

अमेरिकेंत सेंट लुइस ह्मणून एक जबरदस्त पूल बांधलेला आहे, त्यास दोन कोटि रुपयांवर खर्च झाला या पुलाचें काम पांच वर्षे चाललें होतें. या पुलाच्या तीन कमानी अनुक्रमें ५१६, ५२० व ५१५ फूट रुंदीच्या आहेत या पुलावरून रेलवेचा रस्ता व साधारण गाड्यांचा रस्ता आहे. हे रस्ते साडे पंधराशें फूट लांब आहेत असें समजतें. इं. प्र.

## हिंदुलोकांची राजकीय योग्यता.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

तेहां या व अशा इतर गोष्टींवरून अनुमान पाहिलें तर इतकें निघतें कीं सरकारानें निवडणुका चांगल्या केल्या व आमच्या लोकांनीं हुशारीनें आणि विश्वासानें कामें केलीं तर आमची स्वतंत्रपणें कामें करण्याची चालू स्थितीपुरती योग्यता उत्तमावस्थेस जाईल. चालू स्थितीपुरती ह्मणण्यांतला भाव हा कीं प्रजासंबंधानें कामें करणारे आपण व राजसंबंधानें वर नजर ठेवणारें इंग्लिश सरकार या दोहोंच्या मेळानें ह्मणजे मिश्रसत्तात्मक राज्याच्या प्रकारानें आपले कारभार चालत गेले असतां आपली स्थिति दिवसानुदिवस अधिक उत्तमावस्थेस जाईल. परंतु साऱ्या राष्ट्राकरितां केवळ प्रजासत्ताक राज्याच्या दृष्टीनें पाहिलें असतां इतर सुधारल्या राष्ट्राप्रमाणें आपणास योग्यता येण्यास कालांतर पाहिजे. आलिकडे २५।३० वर्षांत विद्या बरीच वाढली आहे, जिल्ह्याचे गावांतून व तालुक्यांतूनही बरेच लोक शिकलेले व शिकण्याच्या मार्गास लागलेले आढळतात. तरी एवढ्यानें आपल्या या मोठ्या विस्तीर्ण राष्ट्राचा निर्वाह होणार नाहीं. विद्येचें पाऊल अजून पुष्कळ पुढें गेलें पाहिजे, कलाकौशल्याविषयीं हजारो ग्रंथ झाले पाहिजेत, बाफेचीं यंत्रें जिल्ह्या जिल्ह्यांतून झालीं पाहिजेत, उत्तमतऱ्हेचें यंत्रावरील कापड, लोखंडी सामान, कांचेचें सामान, मातीचें सामान, वगैरे सुबक रीतीनें करण्याचे शेकडो कारखाने आपले देशांत झाले पाहिजेत. शेतकरी कुळंब्याचे हातांत पुस्तक पाहिजे. पाणी आणणाऱ्या मोलकरणीचे डोकीवर घागर व हातांत ग्रंथ पाहिजे. कांबळी विकणारा धनगर व बलूते मागणारा महार यांचे हातांतून वर्तमानपत्रें पाहिजेत- शिंप्याजवळ शिवण्याचें शास्त्र पाहिजे. माळ्याजवळ बागेच्याचें शास्त्र पाहिजे. तेल्याजवळ तैलविजासंबंधी शास्त्र पाहिजे. व त्यांचीं त्यांत उत्तम प्रकारची गति झालेली पाहिजे. तशीच विद्येबरोबर नीति लोकांमध्यें आली पाहिजे. कोरडी विद्या व कोरडें ज्ञान कांहीं उपयोगी नाहीं. नीतिचें श्रेष्ठत्व विद्यादि सर्व गुणांहून फार अधिक आहे. कोणी चांगला नीतिमान असून अविद्वान असला तर चालेल पण कोणी विद्वान असून अनीतिमान असेल तर तो कोणाला खपणार नाहीं. तो देशाला एक काटा होय, त्याजपासून देशाचें कांहीं चांगलें होणार नाहीं. देशाची योग्यता त्याच्या नीतिसंपन्नतेवरून करावी लागते ह्मणून आपणास व मुलाबाळांस नीति लागण्याविषयीं आपण फार काळजी बाळगली पाहिजे. जुने लोकांत हुशार कारकून व कामदार आढळतात परंतु त्यांतील बहूतजण खोटसाळपणा व लाचलुचपत इत्यादि दुर्नीतीनें आंतून बाहेरून माखलेले असतात तेव्हां अशांची हुशारी काय कामाची! ह्मणून हें मुख्य आहे कीं आपणाला योग्यता येण्याला आपले अंगीं सोज्वल नीति आली पाहिजे. आजच्या काळीं पाहिलें तर चांगले विद्वान, विचारवान नयसंपन्न व सत्शील असे हजार मनुष्यांत व शंभर दोनशे विद्वानांतही दहा वीस मिळाले तर मिळतील. तेव्हां अशा अगदी थोड्या ह्मणजे साऱ्या राष्ट्रांत केवळ हजारांनीं मोजावयाच्या विद्वान व नीतिमान लोकांचे बळावर हिंदुस्थानांतील १८ कोटि प्रजेच्या राज्यकारभाराची स्वतंत्र निभावणी आजचे कालास होऊं शकेल कीं काय? शकणार नाहीं. व याविषयीं सुज्ञांस कांहीं संशय नाहीं; पण कित्येक लोक ह्मणतात कीं, आतां आमचे हिंदूलोक चांगले शहाणे व सर्व कामांत प्रवीण असे झाले आहेत. त्यांमध्यें कामाच्या योग्यतेविषयीं कोणतीही उणीव नाहीं व ते राज्यकारभारही आपला आपण स्वतंत्रपणें करितील. पण ही गोष्ट आजचे कालास घडून येण्याजोगी दिसत नाहीं. व त्याच्या खुलाशाकरितां घटकाभर आपण एक कल्पना करूं. ती अशी:—

इंग्रजलोकांनीं हिंदुस्थानचें राज्य दयाळुपणानें आपणास परत दिलें व सर्व कारभार आटपून ते स्वदेशीं चालते झाले. आणि काशीपासून रामेश्वरापर्यंत हा अफाट देश आपले सत्तेंत आला. मग आपण आतां त्याचें काय करणार? आगगाड्या व त्यांचे रेल त्यांनीं काढून नेले, पुढें आपण आतां नव्या गाड्या करणार किंवा भाड्याच्या घोड्यांनीं कारभार करणार? गाड्या करणार असाल तर तुह्मांतून त्या कोण करणार, त्यांनां विपुल सामान लागतें तें कोठें आहे? व १०० कोटि रुपये भांडवल लगेल तें कोण देणार? दरसाल साडे चार कोटि रुपये व्याज आगगाड्यांप्रीत्यर्थ इंग्लिश सरकार भरतें हें आपणास माहित आहेच. बरें हें असो. सर्वांचे आरंभीं गवरनर जनरलची नेमणूक व्हावयाची ती जागा आपण कोणास द्याल? एक ह्मणेल मला द्या, दुसरा ह्मणेल मी लायक आहे, तिसरा कोणी आपलाच हक्क सांगेल. तसेंच आणखी तीन गवरनर, तीन हाय कोर्टाचे चीफ जडज, सुमार २५ दुसरे जडज, तितकेच किंवा त्यांहून अधिक कौंसलदार व जिल्ह्याजिल्ह्याचे शेकडो मुख्य अधिकारी यांचे नेमणुकांचे कामीं आपसांत भांडणें होऊन यादवी माजेल किंवा काय स्थिति होईल याची कल्पना करवत नाहीं. बरें हेंही असो. हिंदुस्थान आपले स्वाधीन झाल्यावर सर्वांचे अगोदर बंदोबस्ताकरितां आपणास सुशिक्षित सैन्य पाहिजे. तें आपणास तयार करतां येईल काय? आपल्या साऱ्या हिंदुस्थानचे कमांडर इन चीफ आपण कोणाला करणार? आपण पडला सुशिक्षित विद्वान त्यामुळें शिपायिगिरी आपणास माहित नाहीं व विद्या व्यसनामुळें आपण इतके बळकट आहा कीं, कोणी फूं केलें तर तीन हात मागें सरता! तेव्हां आपला बंदोबस्त होणार कसा? बरें परचक्र निवारणार्थ समुद्रांत आरमाराची फौज पाहिजे ती विद्या आपणास ठाऊक आहे काय? नाहीं. तेव्हां आपलें होणार कसें? बरें अशा कामाला आपणामध्यें मुख्यत्वें ऐक्य पाहिजे. तें आपणामध्यें आहे काय? नाहीं. माझा उत्कर्ष माझ्या शेजाऱ्याला सहन होत नाहीं. रामाजी पंताची तारीफ झाली तर तिमाजीपंत नाक मुरडतो. कोणी सभा लायब्ररी वगैरे काढिली तर टर उडविण्यास दुसरे तयारच. गावांत दहा पाच चांगले असले तर पंचवीस त्याचे वाइटावर आहेतच. कोणी करांनीं गांजून सरकारास अर्ज करावा कीं आह्मावरील बोजा कमी करावा तर दुसरे विघ्नसंतोषी गृहस्थ दुसरा अर्ज करण्यास तयारच कीं आह्मावर कराचा बोजा बिलकूल नाहीं. आह्मी फार खुश आहों. बरें फार काय सांगावें १८५७ सालीं एकलक्ष फौज एकत्र झाली होती ती किती दिवस टिकली? व तिचा काय परिणाम झाला? नाश. त्याचें कारण काय? आपणाध्यें ऐक्य नाहीं हें. तेव्हां जर आपणामध्यें ऐक्य नाहीं, उत्तम विद्या नाहीं, सोज्वल नीति नाहीं, व लढायांचें मार्मिकज्ञान नाहीं तर आपण स्वतंत्रता इच्छिता कसची? व ती आपणास मिळणार कसची? आपण दहा वीस हजार किंवा पन्नास हजार विद्वान आज तयार झालेले असला तरी ते वढ्यांच्या विद्येनें आणि नीतीनें होणार काय? बाकी सवाकोटि साडेनव्याणव लक्ष प्रजा अजून अक्षरशत्रुत्वांत आहे तिची वाट काय? सदाचरण, प्रामाणिकपणा, आणि विश्वास या काय वस्तु आहेत व त्या पॆरिपाळण्याचें विशेष अगत्य आहे कीं काय? हें अजून कोट्यावधीस कळत नाहीं एवढेच नव्हे शिकलेल्या हजारोंस कळतें पण त्यांतील शेकडोंस वळत नाहीं. अशी आमच्या देशाची स्थिति आहे ह्मणून कल्पना केल्याप्रमाणें आजच इंग्लिश लोक देश सोडून जाऊ लागले तर त्यांची प्रार्थना करून थोडे दिवस तरी राहा व आह्मास आपणासारखे तरबेज करून मग जा असें ह्मणून त्यांस थोपवावें लागेल; नाहींपेक्षां चालू स्थितीप्रमाणें सुरळीत-राज्यव्यवस्था राहणार नाहीं असें दिसतें.

सारांश साऱ्या हिंदुस्थान देशाची स्थिति मनांत आणिली असतां असें वाटतें कीं राजकीय अथवा सार्वजनिक कामें स्वतंत्रपणें करावयास जितकी पूर्ण योग्यता आपणास पाहिजे आहे तितकी आजचे कालास आपणांत आली नाहीं. तरी चालू क्रमावरून ती येण्याचे मार्गास लागली आहे व सुचविल्या सुधारणांप्रमाणें जसें जसें घडत जाईल तशी तशी ती योग्यता फार त्वरित आपणामध्यें येऊन वास करील. हल्लीं आपणावर राज्य करणारे सार्वभौम इंग्लिश लोक पूर्वीं केवळ पशुतुल्य स्थितींत होते. पण विद्येनें आणि पराक्रमानें त्यांच्या स्थितींत उत्तम पालट झाला. त्यावरून आपला विच्यार पाहतां आपण तर आजच त्यांच्या त्या पूर्व स्थितिपेक्षां पुष्कळ पुढें आलेलो आहों ह्मणून ईश्वरकृपेनें लवकरच त्यांचे योग्यतेस येऊं अशी आशा आहे व ती सफळ होण्याकरितां आपण त्या कृपाळू ईश्वराची प्रार्थना करावी.

खंडेराव बाळाजी फडके.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

RECISTERD NO 7,1874

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० २० माहे सप्तंबर सन १८७४ इ० अंक ३८

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीचे नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

स्वल्प, स्वल्प, स्वल्प!!!

सर्व श्रीमान, देश सुधारणेच्छु आणि सद्गृहस्थ यांस कळविण्यांत येतें कीं, आह्मी गेल्या एप्रिल महिन्यापासून कोल्हापुरास "सुज्ञानामृत" या नावाचे उपयुक्त विषयांचें मासिक पुस्तक काढण्याची सुरुवात केली आहे. यांत रसायन शास्त्र; वैद्य शास्त्र, ज्योतिष शास्त्र, पाक शास्त्र; शेतकी संबंधी माहिती; करवीर क्षेत्राचें वर्णन, मनोरंजक कल्पित कथा, नाटक, उपयुक्त विषयावरील निबंध आणि अत्युपयोगी, अनुभवशीर आणि चमत्कारीक संग्रह असे दहा विषय प्रत्येक अंकीं येतात. शिवाय कविता, पुस्तक परीक्षा, रूपकें, कोड्या इत्यादिकांचा समवेश अवकाशानुसार होत असतो. वर्गणीदार होउं इच्छिणाऱ्यांनीं आह्मांकडे २।= ( सालीना अगाऊ वर्गणी ) रोकड पाठविली असतां त्याजकडे पुस्तक सुरू करूं. सुज्ञ लोकांनीं ही संधी दवडूं नये.

नारायण रघुनाथ मंत्री
व्यवस्थापक, सुज्ञानामृत कोल्हापूर

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

बाळापुर—ता० १४ सेप्तेंबर १८७४.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. खालीं लिहिलेल्या दोन ओळी आपल्याकडे पाठविल्या आहेत. त्यांस प्रसिद्ध करून आमच्यावर उपकार कराल अशी पूर्ण आशा आहे.

ज्या दिवसापासून इंग्रजलोकांचा पाय वऱ्हाडांत पडला त्या दिवसांपासून सुधारणा जिकडे तिकडे होत चालली आहे. गावोगाव शाळा स्थापित होऊन लोकांवर विद्यावृष्टी होत आहे आणि आतां लौकरच असें दिसतें कीं विद्यावृष्टीपासून फळें उत्पन्न होतील. ज्याप्रमाणें गावोगाव शाळा स्थापन झाल्या त्याप्रमाणें बाळापूर पेठ येथेंही शाळा स्थापन झाली. शाळा स्थापन होऊन सुमोरे ८ वर्षे झालीं. शाळेला कोणतीच इमारत चांगली न सापडल्यामुळें आमचे दयाळू सरकारानें एक नवीन शाळा बांधली आहे. ती गावापासून बरीच दूर आहे. दूर असल्या कारणानें लहान लहान मुलांनां किती त्रास सोसावा लागत असेल हें त्यांनांच माहित असेल. उन्हाळ्यांत उन्हांत येतां येतां तहानेनें व्याकूळ होतात आणि पावसाळ्यांत तर ओलें होऊन खड खड दांत वाजतात. बरें इतकेंही असून शाळा मोठी असावी तर तसेंही कांहीं नाहीं जीं बिचारीं लहान मुलें त्यांनां योग्यतेनुरूप बाहेर ह्मणजे पडवींत बसावें लागतें. काय हा त्यांच्या भोंवती त्रास? उन्हांत येऊन तहान लागली कीं तसेंच बसतात. कारण येथें पाण्याची कांहींच सोय नाहीं. फारच तृषाक्रांत झाले ह्मणजे चालले नदीवर. नदीमाता कशी काय आहे हें माहितच असेल. तिला तर दरसाल २।३ बळी पाहिजेत. आणखी तशांत जवळच भुइपेंडाचां डोहो आहे. तेथें, एखाद्याची आहुती न व्हावी ह्मणून देवास प्रार्थना आहे. आतां कदाचित कोणी मास्तर लोकांस दूषण देतील कीं त्यांनां तुह्मी सुटी कां देतां? तर त्यांनीं मुलांनां तसेंच बसू द्यावे कीं काय? कादाचित बसूं देतील परंतु लहान मुलें लौकरच शाळा उघडण्याच्या पूर्वीं जमतात. आणि खुशाल नदीवर जातात. ही गोष्ट उन्हाळ्याची झाली. आतां पावसाळ्याविषयीं तर लहान मुलांनां पूर पहाण्याची फारच हौस असते. शाळेंत लौकर आले कीं चालले तिकडे. हा त्यांचा दोष आहे असें नाहीं कारण कीं बाल्यपण. अशा बहुतेक अडचणीमुळें शाळा अति सुखदायक झाली असें ह्मणतां येत नाहीं. इतक्यावरून कोणाला वाटेल कीं आतां इतका खर्च करून शाळा बांधली ती आतां पाडावी आणि दुसऱ्या ठिकाणीं करावी काय? तर तसें नाहीं. हल्लीं पेठेंत बालाजीच्या देवळापुढें दवाखाना बांधण्याकारितां जी जागा घेतली आहे तेथें दवाखान्याबद्दल शाळा बांधावी आणि हल्लीं जी इमारत बांधून तयार झाली आहे तेथें दवाखाना आणावा ह्मणजे शहरांतील आणि पेठेंतील सिक लोकांनां समान अंतर वाटेल. नाहीं तर शहरांतील लोक पक्षपात केला ह्मणतील आणि अशानें मुलांचीं दुःखें ही कमी होतील ह्मणून सरकारास विनंती आहे कीं गावच्या गावांत बालाजीचे देवळापुढें शाळा बांधण्या विषयीं सरकारानें काना डोळा करूं नये. एडिटर महाराज आपण आपल्या पत्रांत स्थळ दिल्यास होणें आहे नाहीं तर आमच्या हाकेला ऐकतो कोण? असो थोडक्यांत लिहून पाठविलेला मजकूर येत्या जगमान्य पत्रांत छापून प्रसिद्ध करावा. येणेंकरून जे अज्ञ वऱ्हाडी त्यांनां थोडीशी उमेद येत जाईल. कळावे तारीख १४ माहे सेप्तेंबर सन १८७४ इसवी. मुक्काम बाळापूर पेठ प्रांत पश्चिम वऱ्हाड.

एक बाळापूरकर
क्ष

---

रा, रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

अडगावाहून तारिख १० माहे सेप्तेंबर

वि० वि० आपणाकडेस महत्वाच्या व अन्यायानें घडलेल्या कृत्याबद्दल मजकूर कळविला आहे तो येत्या अंकांत छापून प्रसिद्ध करावा.

आजरोजीं दिवसा बारा वाजतां अगर त्या नंतर दहा पंध्रा मिनिटाचे अंतरानें कसबे अडगाव येथें पोलिस चावडींत अकोट एथील पोलिस इन्स्पेक्टर व तेल्हारे एथील चीफ कानस्टेबल यांचे समोर ब्याहारिलाल शिपाई कोर्ट अडगाव एथील याजवर महमद कासम जागल्या यानें गोळी भरलेली बंदुक सोडली ती गोळी त्याचे छातीवर लागल्यामुळें ब्याहारीलाल हा घायाळ झाला आहे व त्या कृत्यानें तो वाचेल असा बिलकूल भरवसा नाहीं.

ब्याहारीलाल याजला गोळी लागल्याची बातमी समजली त्यापूर्वींच चार पाच बंदुकीचे आवाज कानानें ऐकिले होते. ब्याहारीलाल जखमी झाल्याची-बातमी समजतांच पोलिसचावडींत जाऊन तपास केल्यावर समजलें की पोलिसइन्स्पेक्टर व चिफकानस्टेबल तेल्हारे यांचे समोर बंदुकीचे आवाज झाले व ज्या जागेवर बंदुकीचे आवाज झाले त्याजागीं बंदुकीच्या गोळ्याच्या खुणा चावडीसमोर छोटू भुसारी याचे घराचे भिंतीस लागलेल्या आह्मी दृष्टीनें पाहिल्या आहेत व तपासाअंतींही समजले आहे. ब्याहारिलाल सिपाई याजला महमद कासम यानें समजून उमजून किंवा द्वेष बुध्धीनें गोळी मारिली असें कोणी ह्मणत नाहीं परंतु पोलिस ष्टेशन गावांत भरबाजारांत असून अशा ठिकाणीं पोलिसइन्स्पेक्टर व चिफकानस्टेबल याचे समोर बंदुकीचे गोळी भरून आवाज व्हावे हें अगदी गैर असोन ज्या अर्थी हें कृत्य त्यांचे समोर झालें त्या अर्थी तें होतांनां त्यांस मानवत होतें किंवा त्यांनीं तें करण्याचा हुकूम केला होता व त्यांचे हुकूमावरूनच हा ताखालचे लोकांनीं आवाज केले असावे असें अनुमान करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. गावांत दंगा धोका नसतां जे पोलिसलोक रयतेंचे प्राणाचे संरक्षण करणारे त्या पोलिस लोकांकडून अशी गाफली व सुस्ती होणें व त्यापासोन रयतेचे जिवास धोका बसणें किती अन्यायाचें आहे. हें सहज लक्षांत येईल ह्या कृत्याची चौकशी माजिस्त्रेट स्वतः जातीनें येऊन करतील तर मात्र खरा प्रकार काय आहे तो कळून येईल. जर पोलिसच चौकशी करतील तर खरा प्रकार येकीकडेस राहून पोलिसास पुष्टीकरण येऊन त्यांनां कदाचित अविच्याराचें कृत्य करण्यास उत्तेजन येईल. घायाळ झालेला मनुष्य तरुण असून त्याचे गुदस्त सालींच लग्न झालें आहे व लागलेली गोळी त्याचे छातींत उजवे बाजूस अद्याप तशीच आहे निघाली नाहीं, परमेश्वरानें त्याला दीर्घायु करावे असें ईच्छितो. कळावें ही विनंती

रयतेचें दुःख पाहाणारा
क्ष.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि० वि० खालीं लिहिलेला मजकूर येत्या अंकांत छापून प्रसिद्ध कराल अशी आशा धरून हें पत्र आपणाकडे पाठविलें आहे.

देऊळगाव राजा येथील पोलिस स्टेशनावर नवीन आलेले चीफ कान्स्टेबल रा० गोविंद व्यंकटेश हे स्वभावानें उत्तम असून आपलें काम चांगले रीतीनें बजावित आहेत. यांस येथें येऊन सुमार दोन महिने होतील इतक्या काळांत कोणताही गुन्हा विशेष झाला नाहीं कारण मशारनिल्हेचा बंदोबस्त चांगला असोन रात्रीं स्वतः गस्त घालण्यास जात असतात. आणि सर्वांशी स्नेह ठेवून आहेत. खामगाव येथील वकिलाचा आगगाडींतून चोरीस गेलेला माल येथें पकडला गेला. या कामांत गोविंदराव यांणीं बरेच परिश्रम केले त्याजबद्दल त्यांस कांहीं इनाम मिळण्याचें असून मिळालें नाहीं. नुसती शिफारस मात्र वरिष्ठांकडून मिळाली. अशीच यांची हुशारी दिवसे दिवस वरिष्ठांचे नजरेस येऊन लौकरच बढतीचे जागेवर जातील अशी आशा आहे.

येथील पोस्ट आफिसांत आजपर्यंत कामाचा फार घोटाळा होता तो रा० माधव केशव पोस्ट मास्तर येथें आल्यापासून सुधारला व हल्लीं त्यांणीं आपलें काम चांगले रीतीनें चालविलें आहे. हे पूर्वीं मोगलाई इलाक्यांत परळी येथें होते. माजी पोष्ट मास्तराचे वेळेस गावांतील व परगावांतील लोकांस पत्रें वक्तशीर मिळत नसत ती अडचण हल्लींचे नवीन आलेले माधवरावजीनीं दूर केली यामुळें या कामांत हल्लीं लोकांस सुख झालें असावें असें वाटतें.

एथील स्कुलांतील विद्याभ्यासाचें काम फार उत्तम रीतीनें चाललें आहे. सर्व मास्तर लोक वेळच्यावेळेंस शाळेंत येऊन मुलांकडून अभ्यास चांगला करवितात. एथील सेकंड असिस्टंट मास्तर गंगाधर रावजी सोहोनी याची बदली पिंपळगाव राजास २० रुपयांवर झाली. हें एजुकेशनल इन्स्पेक्टर यांनीं फार चांगलें केलें. कारण हे गावांतील लबाड लोकांस सामील राहून त्यांजकडून माजी हेड मास्तर

यांजवर पाहिजे तसे अर्ज करवीत असत व स्वतःही वरिष्ठांस पाहिजे त्या रीतीनें लिहित असत, शाळेंत क्लास शिकविण्याकडे यांचें लक्ष्य कमी असून स्वतःचे अभ्यासाकडे विशेष असे. आणि मार्जी हेड मास्तराशी नेहेमीं तक्रार करीत असत. आतां ते गेल्याचे योगानें शाळा चांगली सुधारेल यांत संशय नाहीं. कारण नवीन आलेले हेड मास्तरांनीं मुलांकडून चांगली मेहेनत चालविली आहे यावरून ही शाळा लौकरच उत्तम दशेस आल्यावाचून रहाणार नाहीं.

एथील बालाजीचे यात्रेच्या कामाची सुरुवात श्रावण शुध्द ९ पासून सुरूं असते ती साल मजकुरीं अद्यापही सुरूं झाल्याचें दिसत नाहीं; परंतु संस्थानचे कारभारी आतां लौकरच सुरूं करतील असें वाटतें.

तारीख १० माहे सेप्टेंबर रोजीं पोळ्याचा सण चांगला झाला. चीफ कान्स्टेबल यांणीं बंदोबस्त चांगला ठेविला होता. व त्याच रात्रीं समार बारा वाजल्यावर परजन्यवृष्टी चांगली झाली. असा परजन्य या सवा महिन्यांत पडला नाहीं असें ह्मणतात. आपण मला हमेश पत्रांत जागा द्याल तर मी नवीन विशेष मजकूर कळवीत जाईन कळावें. तारीख ११ माहे सेप्टेंबर सन १८७४ इसवी.

एक देऊळगावकर.

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुध्द १० शके १७९६

## नेटिवाचा अपराध केल्या बद्दल युरोपियनास शिक्षा.

मि० मियर्स या नावाचे बंगाल्याकडे एक निळीचा व्यापार करणारे श्रीमान गृहस्थ आहेत त्यांनीं एका नेटिवाला कांहीं कारण नसतां मारलें ह्मणून त्यानें फौजदारींत मियर्स साहेबावर फिर्याद केली. पण कांहीं शाबिदी झाली नाहीं. वास्तविकच आहे युरोपियनाच्या विरुद्ध नेटिवाची फिर्याद सिद्ध होणें ह्मणजे मोठें दिव्यच समजलें पाहिजे. पण ईश्वराचे मनांत ही गोष्ट घडवावी असें आलें व तेणेंकरून नेटिवास यश मिळालें. ह्मणजे असें झालें कीं ह्या नेटिवावर मियर्स साहेबानीं दांत ठेऊन दुसऱ्यानें त्याला गाठला व पहिल्या पेक्षां खुप मारलें. पुढें त्यानें पुन्हा यांवर फिर्याद केली तेव्हां न्यायाधिशानीं काळ्या गोऱ्याचा भेद मनांत न ठेवितां निष्पक्ष पातानें चौकशी केली तींत मियर्स साहेबावर अपराध शाबीद झाला व त्याबद्दल त्यांस दोन महिने कैदेची शिक्षा झाली. युरोपियनास शिक्षा व ती नेटिवाच्या बाबदींत, मग काय विच्यारता? बंगाल्याकडील बहुतेक युरोपियन खवळून गेले व यांनीं मियर्स साहेबाची बाजू धरून नेटिवांस बहुत दूषणें लाविलीं व शेवटीं पुन्हा असा प्रसंग आल्यास नेटिवाचे बाबदींत युरोपियनास शिक्षा होऊ नये अशा विषयीं विलायत सरकारास अर्ज करण्याचीही तयारी झाली ते असो. पण हायकोर्टांतील दोन जडज मियर्स साहेबाचा मुकदमा पहात असतां यांचें भिन्न मत पडलें व त्या करितां चीफ जष्टिस त्यांस सामिल होऊन तो मुकदमा तपासला गेला व त्यांत शिक्षा कायम झाली. तिजवर लेफ्टिनेंट गवरनरकडे अपील झालें होतें पण त्यांनीं ही सर्व कागदपत्र पाहून दिलेली शिक्षा मंजूर केली. व मियर्स साहेब जेलामध्यें राहून कैदी लोकांचे कपडे वापरून मजुर काम करीत होत्साते सुखरूप आहेत. ज्या ज्या युरोपियन न्यायाधिशाकडे हा मुकद्दमा चालला त्यांनीं त्यांनीं आपलें कर्तव्यकर्म उत्तम रीतीनें बजाविलें याजबद्दल त्यांची स्तुती केल्या वाचून आमच्यानें रहावत नाहीं.

नीळ विकणारे साहेब लोक असे शेकडो लोकांस मारितात व जुलूम जबरदस्तीनें त्यांपासून कामें घेतात याविषयींचा बोभाट बहुत वर्षांपासून आहे पण त्याविषयीं कधीं चांगलीशी दाद लागली नाहीं. याविषयीं नीळदर्पण नावाचा एक मराठी ग्रंथ रा. रा. मोरो विठ्ठल वाळवेकर इंदुप्रकाशचे सब एडिटर यांनीं लिहिला आहे तो ज्यांनीं वाचला नसेल त्यांनां या प्रसंगीं वाचण्याची आह्मी शिफारस करितों. त्या पुस्तकांत निळीचा धंदा करणाऱ्या युरोपियन लोकांचीं यमसदृश क्रूरकर्में यथास्थित वर्णिलीं आहेत.

ईश्वर करो आणि या मियर्स साहेबाच्या मुकद्दम्याच्या दहशतीनें तरी युरोपियन लोक नेटिवांस कमी मार देवोत असें आह्मी इच्छितों.

## बडोद्याकडील पांडू.

बडोद्याचे श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांच्या नूतन झालेल्या विवाहास आड येणारा हा पांडु आमचे बहुतेक वाचकांस ठाऊक असेल. यानें सुरतेच्या माजिस्त्रेटाकडे फिर्याद केलेली आहे कीं, माझी लग्नाची बायको लक्ष्मी इनें मी जिवंत असतां श्री० मल्हारराव गायकवाड यांशीं लग्न लाविलें. त्यावरून गायकवाड सरकाराला ही गोष्ट विच्यारण्यांत आली तेव्हां त्यांणीं लक्ष्मीचे बापाला बोलावून त्याची जबानी घेऊन ती सुरतेस पाठऊन दिली. तींत त्यांच्या श्वशुरानीं स्पष्ट लिहून दिलें आहे कीं, मी आपली मुलगी महाराजास दिली. ही कुमारिका होती तिचें पांडूशीं मुळींच लग्न झालेलें नव्हतें. पांडू हा लबाड मनुष्य तोतया आहे त्यावरून पांडूला आपले लग्नाचा पुरावा करण्याविषयीं हुकूम झाला तेव्हां नगर जिल्ह्यांतील राहुरी तालुक्यांतल्या देवळाली गांवचा तो रहाणार असल्यामुळें तिकडील लोकांचे साक्षी पुरावे त्यानें दिले त्यावरून नगरास कमिशन नेमून त्या साक्षीदारांच्या जबान्या घेतल्या व त्यांपैकीं कांहीं साक्षीदार सुरतेसही नेले पण त्यावरून श्री० मल्हारराव यांनीं ज्या स्त्रीशीं लग्न केलें ती याची पूर्वीची बायको होती असें शाबिद झालें नाहीं असें वाटतें. त्यावरून अधिक पुरावा त्यास विचारितां त्यानें तो वऱ्हाडांत आहे असें सांगितलें व त्याकरितां कमिशन घेऊन गेल्या आठवड्यांत तो पांडू अकोल्यास आला आहे.

त्याचें ह्मणणें असें आहे कीं सुमार आठ वर्षें झालीं मी वऱ्हाडांत एक ब्रह्मचारी बुवा बरोबर आलों होतों व पुढें काशीस गेलों त्यावेळीं माझी बायको लक्ष्मी ही पिंजर येथें रहाणाऱ्या एका गृहस्थानें मजपासून काढून नेली त्याबद्दल मी अकोल्याचे डिपुटी कमिशनर साहेबाकडे फिर्याद केली आहे व त्याबद्दल काम चाललेलें आहे. ते कागदपत्र काढिले असतां व मी सांगतो त्या लोकांच्या साक्षी घेतल्या असतां पुरावा होईल. त्यावरून त्या फिर्यादी संबंधी कागदपत्र रिकार्डांत पाहण्याचा हुकूम झालेला आहे. प्रथम चार दिवस ५।६ कारकुन रिकार्ड पाहण्यांत गढून गेले होते व त्यापुढें कांहीं कारकून आज पर्यंत दप्तरें चाळीत आहेत पण पांडूच्या फिर्यादीच्या प्रकरणाचा लवलेशसुद्धा अजून सापडला नाहीं असें ह्मणतात. साक्षीकरितां जे लोक आले त्यांतून कोणी असें ह्मणतात कीं पांडू हा पिंजर मुक्कामीं गुरें राखित होता व त्याजवळ सुमार ४०।४५ वर्षांच्या वयाची एक स्त्री होती. व ज्यावर त्यानें तिजबद्दल कांगाळी आणिली होती तो सुमार ६० वर्षांचे वयाचा भला गृहस्थ होता. व त्याचे जाब जबाबही त्यावेळीं कांहीं झालेले नाहींत असें ऐकण्यांत येतें.

आतां ही गोष्ट खरी असेल तर चाळीस वर्षांच्या वयाची जी बायको आठ वर्षांपूर्वीं पांडूपासून फरारी झाली होती ती अलबत्ता पन्नास वर्षांची तरी आतां असावी, तिचे केश रुपेरी झाले असावे, व दंतही कांहीं भग्न झाले असावे. तेव्हां इतकी रूप यौवनसंपन्ना ह्मणजे तारुण्यानें मुसमुसणारी, व खुबसुरत रतीची केवळ प्रतिमाच असें पांडूचें स्त्रीरत्न श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांस अभिलाष करण्यास अतिशय मोहक खरें ! अस्तु.

पांडू ज्या गावचा रहाणार, जेथें त्याचें लग्न झालें, व जेथें त्याचे च्यार सोयरे व इष्टमित्र रहातात तेथें देखील त्याची लग्नाची बायको लक्ष्मी इच्याशीच श्री० मल्हारराव यांचे लग्न झालें हें शाबीद झालें नाहीं तर तें अकोल्याच्या अशा प्रकारच्या पुराव्यावरून कसें शाबीद होईल तें आह्मांस कळत नाहीं. तथापि तो विच्यार पुढचा आहे सबब प्रस्तुत त्याविषयीं आह्मी अधिक कांहीं लिहित नाहीं.

या पांडुरंग मूर्तीस आह्मी प्रत्यक्ष पाहिलें व त्याचे आमचे थोडें भाषणही झालें त्यावरून त्याची अक्कल हा अकटोविकट व्यूह रचील असें आह्मांस तिलमात्रही वाटत नाहीं. त्यास कोणी जबर प्रेषक असावेत व त्यांच्या सल्ल्यानें तो या खटपटींत पडला असावा अशी आमची कल्पना आहे. आणि असें असेल तर विचारा नादान मनुष्य व्यर्थ अटाहासांत पडला !

हा मनुष्य श्रीमान नाहीं एवढेंच नाहीं पण याच्या निर्वाहाविषयींही याला पंचाईत आहे. याला पोटखर्च व आगगाडीचाही खर्च परभारा मिळत आहे असें ऐकतों. व याच्या बरोबर सुरतेहून एक पोलिसचा शिपाई आलेला आहे, व तो आपल्या बरोबर पोलिसच्या रिझोरांत त्याला ठेवित असतो. व एथील पोलिस अधिकारीच त्या पांडूला बरोबर घेऊन डिपुटी कमिशनर आफिसांत तपासास जात असतात व काम फार गुप्त चालतें असें ह्मणतात. तेव्हां ही फिर्याद चालविण्याचें स्वरूप कसें असावें व कोणीकडच्या जोराचें असावें याविषयींचा विचार करण्याचें काम गूढ दिसतें. सरकारांत दाद मागावयास आलेला कोणी मनुष्य गरीब असेल तर नादारींत त्याचें काम चालण्यास सरकार परमाणगी देतें पण कोणाचा घरजावयाप्रमाणें सर्व खर्च चालवून त्याची फिर्याद सरकार मनास आणितें हें आह्मास ठाऊक नाहीं. ह्मणून कदाचित् हा खर्च सरकारचा नसून दुसऱ्या कोणा परोपकारी गृहस्थाचा असेल अशी आम्ही कल्पना करितों. तथापि पाडूबरोबर सरकारचा शिपायी कशासाठीं आहे ? व तो त्या शिपायाच्या पहाऱ्यांत कां असतो याचें कारण आह्मास कळत नाहीं. असो. या राजकीय गोष्टी आहेत म्हणून त्याविषयीं आम्ही फारशी वाटाघाट करणें कदाचित् योग्य होणार नाहीं ह्मणून हा विषय पुरा करितों.

बडोद्याकडे श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांजवर ज्या शेकडो फिर्यादी तिकडील रेसिडेंट साहेबानीं घेतल्या त्यांत कित्येक कदाचित अशाच फुगवाफुगवीच्या नसतील काय?

## परशुराम पंत तात्या गोडबोले.

हे गृहस्थ या महिन्याच्या ४ थे तारखेस पुण्यास मरण पावले हें आमचे वाचकांस कळविण्यास आह्मांस फार वाईट वाटतें. ज्या ठिकाणीं मराठी भाषेची व्याप्ती आहे तेथील सर्व लोकांस हे गृहस्थ माहित नसतील असें नाहीं. प्राकृत कवितांचें नवनीत ह्मणून शाळा खात्यांत जें पुस्तक आहे तें प्रथम यांनीं काढिलें. वृत्तदर्पण ह्मणून छंद शास्त्राचें पुस्तक यांनीं लिहिलें व कित्येक संस्कृत नाटकांची प्राकृत भाषांतरें यांनीं केलीं आहेत. मुंबईस माधव चंद्रोबा यांनीं मोरोपंत, वामन, तुकाराम वगैरे प्राकृत कवींचे बहुत ग्रंथ प्रसिद्ध केले त्यांस [illegible] मदत परशुरामपंत तात्याची होती, असें महाराष्ट्र भाषेचें मुकुटरत्न हरवलें ह्मणून बहुत लोकांस दुःख झाल्यावाचून रहाणार नाहीं तरी आह्मांस एवढें वाटतें कीं, परशुरामपंताचें शरीर या दुनियेंतून नाहींसें झालें तरी कीर्ती बहुतकालमर्याद नाहींशी होणार नाहीं. अस्तु परशुरामपंत तात्या यांचा स्वभाव फार साधा व सर्वोपरि निरुपद्रवी होता. ते क्याडीसाहेबाजवळ पंडित होते व तीच ती एक चाकरी त्यांनीं मरणकालपर्यंत केली. त्यांचें वय ७५ वर्षांचें होतें. त्यांस

तीन पुत्र व एक कुटुंब आहे. वडीलकुटुंब नुकतेंच वारलें. वडील मुलगा चांगला कर्ता आहे व तो त्यांचे मागें त्यांचें नाव चालवील असें ह्मणतात. हें एक दुःखांत सुख आहे.

## हिंदु टिफिन सप्लाइंग कंपनी

या नावाची मुंबईस एक नवीन कंपनी झाली आहे. हिचा उद्देश असा आहे कीं किल्ल्यामध्यें जे हिंदु क्लार्क लोक सरकारी सावकारी वगैरे कचेऱ्यांतून नोकर आहेत त्यांचीं घरें फार लांब असल्या मुळें मधले वेळीं त्यांस फराळाला मिळण्याची अडचण पडते ती दूर करावी. या टिफिणीला दर रोज अडीच आणे पडतील. त्यांत पावशेर पिठाचा चुरम्याचा मसालेदार लाडू किंवा पुऱ्या यां पैकीं जें पाहिजे असेल तें मिळेल. व त्या बरोबर पाव रत्तल उत्तम प्रतीचे शिजविलेले मांसाचा एक पेला मिळेल. बारमाही वर्गणीदार होतील त्यांचे आफिसांतून त्यांना एक दोन वाजण्याचे सुमारास टिफिन पोचविली जाईल. मांसाहारी नसतील त्यास ब्राह्मणाकडून तयार केलेला चुरमा किंवा पुऱ्या दुप्पट पाठविल्या जातील. वर्गणीदार नसून कोणी टिफिन घेण्यास येतील तर त्यांस आपलीं भांडीं घेऊन यावें लागेल. इत्यादि प्रकारचे नियम आहेत.

या कंपनीचे आनररी म्यानेजर नानाभाई विश्वनाथ या नावाचे परभू गृहस्थ आहेत. त्यांस भेटणें अथवा निरोप कळविणें असल्यास क्राफर्ड मार्केट, काळबा देवीचे रस्त्यावर पहिली कोळ भाटवडी, फणसवाडीचे नाकें, अथवा किल्ल्यांत फार्बस रस्त्यावर डेविड सासुन यांचे घरासमोर टिफिण घर केलें आहे तेथें यांची गाठ पडेल असें जाहिर केलें आहे.

ही कंपनी अगदी नव्या तऱ्हेची आहे. व ही परभु लोकांनीं उत्पन्न केली आहे. हिचें काम कसें चालतें तें पाहिलें पाहिजे. धर्मसंबंधानें कित्येक लोक या कृत्यास नावें ठेवतील पण सुधारणेंतला हा एक प्रकार आहे. व तो बाताबेतानें चालविला असतां त्यापासून पुष्कळांची सोय निघेल यांत संशय नाहीं.

## वऱ्हाड.

या आठवड्यांत पाऊस पडला नाहीं पण हवा थंड आणि रमणीय आहे.

अकोल्याचे डिपुटी कमिशनर आफिसांत एका प्रकरणाची गढून चौकशी चालली आहे त्याविषयीं एडिटोरियलमध्यें "बडोद्याकडील पांडू" या सदराखालीं मजकूर लिहिला आहे तो पहावा.

सरकारी कचेऱ्यांतून उमेदवार लोक आहेत त्यांवर मोठी संक्रांत आली आहे. रिविन्यु कमिशनर साहेबानीं ठराव केला आहे कीं सरकार नोकरी शिवाय जे लोक कचेऱ्यांत कामें करीत असतील त्यांस काढून टाकावें. या हुकुमानें वऱ्हाडांतील सुमार तीन च्यारशें लोकांचें अन्न उठेल असें दिसतें. ह्मणून त्या लोकांस हा हुकूम मोठा सक्तीचा आहे यांत संशय नाहीं. कांहीं उमेद्वार रिकाम्या उठाठेवी व वाईट कामें करणारे असतील तरी त्यांत चांगलेही बहुत असतील. आणि आज वीस वर्षें पर्यंत कचेऱ्यांतून त्यांचें संगोपन झालेलें असतां आज त्यांस एकदम अंगवस्त्रें झटकून उठून जा ह्मटलें तर तें त्यांस परम दुःख कारक होईल यांत संशय नाहीं. आह्माला वाटतें कीं हा उमेद्वारांचा वर्ग केवळ भारभूत नाहीं व त्यांचें सरकारावर ओझेंही नाहीं; आणि दुसरें, अडाणी रयतेच्या आणि सरकारच्या दरम्यान ते छोटेखानी वकीलच आहेत. ह्मणजे थोडे पैसे घेऊन अर्ज लिहून देणें माहिती सांगणें, वगैरे कामें त्यांकडून होत असतात ह्मणून त्यांस एकदम नुक्का लावावा हें आह्मास प्रशस्त दिसत नाहीं.

यवतमाळ येथें लोअर क्लास स्कूल आहे तें ७५ रुपये पगाराचें मिडल क्लास स्कूल होणार आहे.

अकोल्याचे हाय स्कुलांतील असिस्टंट मास्तर मि० जहरुदीन यास वऱ्हाडांतील हिंदुस्थानी शाळांवर डिपुटी इन्स्पेक्टर नेमिलें. व अक्टोबर महिन्यापासून ते त्या कामावर जातील.व तेव्हांपासून ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सिपाल मि० नूरखां व हिंदुस्थानी मास्तर मि० महमद इस्मायल हाय स्कुलांत दोन दोन तास हिंदुस्थानी शिकविण्यास जात जावे असा हुकूम झाला आहे.

कसबे वाडेगाव तालुके बाळापूर येथें सदू कुणबी व रामा माळी यांचा कांही तंटा झाला. पुढें पोलिसानें सदूचे घरीं जाऊन त्यास चावडीवर बोलावल्यामुळें तो दोहो हातांत दोन नागव्या तरवारी घेऊन बाहेर पडला आणि पोलिस शिपाई व बायका पुरुष जे वाटेंत कोणी सापडले त्यांस तोडीत सुटला त्या योगें एक न्हावी ठार मेला व बारा इसम जखमी झाले. पुढें कैदी आपण होऊन पोलिसाचे स्वाधीन झाला. त्याचें ह्मणणें आहे कीं पोलिसा बरोबर माझा प्रतिवादी तरवार घेऊन आला होता ह्मणून मीं असें केलें.

## जाहिराती.

होम डिपार्टमेंट
फोर्ट उइलियम ता० १४ आगष्ट १८७४.

नंबर २१५९

हिंदुस्थानांतील खानगी लोक किंवा सिविल डिपार्टमेंटांतील सरकारी लोक यांनीं राणी सरकार किंवा राणी सरकारचे हिंदुस्थानचे सेक्रेटरी यांजकडे अर्ज किंवा तशा जातीचे महत्वाचे कागद कसे पाठवावे अशाविषयींचे नियम तारिख १४ आगष्ट सन १८६७ इसवीचे ग्याझिट आफ इंडिया पान १२२१ यांत जाहिरात नंबर ३७४२ तारीख २३ आगष्ट सन १८६७ इसवीचें प्रसिद्ध केले होते.

२ "जो अर्ज हिंदुस्थानांतील सरकारचे योग्य द्वारे रवाना झाला नाहीं तशा अर्जा कडे होम गवरमेंट लक्ष्य देणार नाहीं व तो घेणार नाहींत" व राणी सरकार किंवा राणी सरकारचे सेक्रेटरी आफ स्टेट यांजकडे जो अर्ज पाठविला जाईल तो अर्ज लिहिणारा ज्या लोकल गवरमेंट हद्दींत रहात असेल किंवा नोकर असेल त्या लोकल गवरमेंटचे मार्फत पाठविला पाहिजे तेणेकरून अशा लोकल गवरमेंटास आपला अभिप्राय व खुलासा देण्याचा असेल तो देण्यास ठीक पडेल असें त्या नियमांत लिहिलें होतें.

३ असे नियम जरी प्रसिद्ध झाले आहेत तत्रापि हिंदुस्थानांतील लोकांकडून विलायतेस वारंवार अर्ज येतात परंतु राणी सरकार त्यांजकडे बिलकुल लक्ष्य न देतां तो अर्ज लिहिणारा मनुष्य ज्या सरकारचे हद्दींत राहतो त्याजकडे अर्जदारास परत देण्याकरितां पाठवितात व त्यांत असें सुचवितात की हिंदुस्थानांतील लोकाकडील अर्ज लोकलगव्हरमेंटचे मार्फत आल्यावाचून त्याजकडे राणीसरकार लक्ष देणार नाहींत.

४ राणी सरकारचे सेक्रटरी आफस्टेट यांणीं नुकतेच बरेच अर्ज परत केले आहेत व हिंदुस्थान सरकारास असें कळविलें कीं हिंदुस्थानांतील रहाणाराकडून राणी सरकाराकडे लोकल गव्हरमेंटचे मार्फत अर्ज न गेल्यास तिकडे ते लक्ष देणार नाहींत असें सर्वत्र लोकांस जाहिर करावें.

[ सही ] टी. जे. फ्राउडन
अ० अंडर सेक्रटरी

नंबर ५५/२१६९ खरा तरजुमा
डिपुटी कमिशनर जिल्हे अकोले

सदर्हूची हकीकत सर्व इलाख्यांतील सरकाराकडे पाठविण्यांत येऊन लिहिण्यांत येते कीं, ही जाहिरात लोकल आफिशियल ग्याझेट व स्वदेश भाषेतील वर्तमान पत्रांतून सर्वत्रांस समजण्याकरितां प्रसिद्ध करावी.

सेक्रेटरी

नंबर ९४७ सन १८७४।७५

प्रत्येक जिल्ह्यांत व प्रत्येक तालुक्यांत वर्तमानपत्रद्वारें इंग्रजींत व मराठींत सर्वत्रांस कळण्याकरितां प्रत कमिशनर यांजकडे पाठविली आहे.

सही ट्विडी साहेब

नंबर ३००४ सन १८७४
तारीख ८।८।७४

सर्व डिपुटी कमिशनर व इतर खात्याचे मुख्य यांजकडे सर्वत्रांस कळण्याकरितां तहशिलदाराकडे मराठींत तरजुमा पाठवावा. अकोला व उमरावती येथील डिपुटी कमिशनर यांणीं आपले येथील छापखान्यांचे एडिटर यांजकडे तरजुमा पाठवावा.

रिविन्यु कमिशनर.

जाहिरखबर गणुसा वल्लद नाटुसा रंगारी रहाणार कसबे मलकापूर तालुके मजकुर, यास खालीं सही करणार इजकडून; कळविण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी संसार बरोबर करीत नव्हते, सबब मी बापाचे येथें असतांनां, तुह्मी, तुमचा मामा रामजीसा व लद जाखुसा याजला घेऊन येऊन, च्यार पंचा समक्ष कबूल केलें, व करारही केला, कीं आतां पुढें गणूसा हा चांगले रीतीनें राहून संसार करील; नाहीं तर आह्मी तिजला पुन्हा पोहोचते करून देऊ, आणि तिजला दुसरें ठिकाणीं उचलून देण्याविषयीं आमची मग हरकत राहिली नाहीं, वगैरे मजकुराचा तुह्मी समक्ष असता, तुमचे मामानीं करार केला, असें असतां सुमारे चार पांच वर्षे जालीं, तुह्मी परागंदा होऊन, तुमचा मुळींच पत्ता नाहीं, पुष्कळ शोध केला, परंतु लागत नाहीं, मग एकत्र रहाणें व नीट रीतीनें वागणें, तर दूरच राहिलें, आतां तुह्मी पंचाकडे कबूल केल्या प्रमाणें, त्याचे अनुमत्ते मी पुढील आपली संसाराची, तजवीज पाहण्याकारितां आजपासून १५ दिवसाचे आत जेथें असाल तेथून येऊन पाहिले पंचासमक्ष आणखी कांहीं हरकत असल्यास सांगावी. तुमचेकडून मुळींच उत्तर आलें नाहीं अगर तुमचा पत्ताही कळविला नाहीं तर तुमचेविषयीं निराशा झाली असें समजून मी रीतीप्रमाणें दुसरा घरठाव पाहीन व तुमची क्रिया करणें अगर न करणें याविषयीं शास्त्राप्रमाणें केलें जाईल कळावें. तारिख ४ माहे सेप्तेंबर सन १८७४ इसवी.

[ सही ] झुमकी मर्द गणूसा रंगारी
हल्लीं वस्ती जयपुर इचे
हातची निशाणी बांगडी

## वर्तमानसार

बडोद्यास सुधारणा उत्तम प्रकारची होत चालली आहे. दिवाणास रविवारीं पोषाग झाला. महाराजांनीं तीन जाहिरनामे प्रसिद्ध केले आहेत. कोणी नजराणा देऊ घेऊनये. त्रिगारी धरूं नये, व टार्चर(वसुलासाठीं किंवा गुन्ह्याचे कबुलातीसाठी हाणमार ) करूं नये, हे तिन्हीही जाहिरनामे फार चांगले आहेत.

आलीकडे दिवाणी खात्यांत काम अतिशय वाढलें आहे तें कमी करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार चालला आहे. या कामाकारितां सरकार प्रत्येक इलाख्यांत एक एक कमेटी नेमणार असें वर्तमान आहे. ना. वृ.

सिन्नर येथील स. जज्ज. रावसा. वामनरावजी बकले हे सिक सबबेवरून सहा महिन्यांची रजा घेणार असें ऐकण्यांत आहे. सुधांशु.

### गोवृक्ष

या नांवाची दक्षिण अमेरिकेंत एक चमत्कारिक झाडाची जात आहे. त्याच्या सालीच्या भाकरी होतात, आणि आंतील रस असतो तो दुधासारखा असतो. भाकरी तर इतक्या नामी होतात कीं, त्यापुढें उत्कृष्ट गव्हाच्या पोळ्या काय? हे दोन्हा पदार्थ शरीरप्रकृतीस चांगले मानवतात याप्रमाणें उद्भिजसृष्टींत हा एक अद्भुत चमत्कार आहे.

धुळें. — आश्लेषा, मघा, पूर्वा या तीन नक्षत्रांचा पर्जन्य पडला नाहीं. तेणेंकरून सर्व पिकांस निंभे धक्का बसून गेला. शेतकरी लोक पराकाष्टेचे उदास आहेत. सर्वांचें लक्ष मेघराजाकडे लागलें आहे. आतां सत्वर कृपा करील तर बरें होईल, नाहीं तर सर्वंच बुडण्याची वेळ आली आहे, असा प्रकार सर्व जिल्ह्यांत आहे. बाजार भावांत चढ होत चालली आहे. खा. वै.

सातारच्या राज घराण्यावर जो प्रसंग आला आहे त्याचे निवारणार्थ योग्य प्रकारें सरकारांत काम चालवावयाचें तें कसे प्रकारें चालवावें वगैरे बद्दल सर्वानुमतें ठरवावें अशा विषयीं तेथील लोकांनीं तात्या साहेब दिवाण यांचे वाड्यांत तारीख ७ मिनहू रोजीं सभा भरविली होती त्या समयीं तेथें शहरांतील बहुत लोक जमले असोन श्रीमंत पंत प्रतिनिधी साहेब आउंध व श्रीमंत चाफळकर स्वामी यांच्याही स्वाऱ्या गेल्या होत्या. शु. सू.

मि० चिंतामणराव हरि देशमुख व मि० गोविंदराव हरि देशमुख या उभयतांस हिंदुस्थान सरकारांतून रावबाहादुरचा किताब मिळाला.

खोटें केशर:— पुण्यास हल्लीं बनावटी केशर आलें आहे. तें रुपयास ८। तोळे विकतें. हें फक्त रंगाचे उपयोगीं पडतें. त्यांत वास व दुसरे गुण खऱ्या केशराप्रमाणें नसतात. त्या संबधानें मुंबईस थोडे दिवसांमागें म्युनिसिपालिटीनें माजिस्त्रेटाकडे फिर्याद केली होती. तींत असा निकाल झाला कीं, हें खोटें केशर रंगाचें आहे असें ठरून म्यु० क० ची फिर्याद रद्द झाली.

---

### सुभाषित.

परीक्ष्य सत्कुलं विद्यां शीलं शौर्यं सुरूपताम् । विधिर्ददाति निपुणः कन्यामिव दरिद्रताम्॥

सर्वगुणसंपन्न पुरुषही कधीं कधीं दरिद्र असतात, या गोष्टीवर कोणी चतुर कवि उत्प्रेक्षा करतो.—

"उत्तम कुळ, शीळ, विद्या, शौर्य, रूप, इत्यादि सर्व गुण पाहून नवऱ्या मुलास शहाणा बाप जशी आपली मुलगी देतो, त्याप्रमाणें वरील सर्व उत्कृष्ट गुणाची परीक्षा करून ब्रह्मदेव तेथें दरिद्रतेची योजना करतो!"

दृढतरनिबद्धमुष्टेः कोशनिषण्णस्य सहजमलिनस्य कृपणस्य कृपाणस्य च केवलमाकारतो भेदः॥

कवि कृपण व कृपाण (खड्ग) यांचे सादृश्य वर्णितो.—

"दोहोंची मूठ बळकट घातलेली असते (ह्म० कृपणाच्या हातून कवडी सुटायाची नाहीं, आणि तरवारीची मूठ बळकट अर्थांतच केलेली असते), दोघे कोशांत (पैसा ठेवण्याच्या खोलींत; म्यानांत) पडून राहिलेले असतात; आणि दोघे स्वभावतःच मलीन (मळकट वस्त्रें वापरल्यामुळें; निळ्या रंगामुळें) असतात : भेद ह्मणून कायतो एका आकारांत (दिसण्यांत, कारण एक मनुष्य आणि दुसरें शस्त्र; पक्षीं, 'आ' या अक्षरांत) मात्र आहे!"

भक्ते द्वेषो जडे प्रीतिररुचिर्गुरुलंघनम्। मुखे कटुकता नित्यं धनिनां ज्वरिणामिव॥

"धनवान् आणि ज्वरी ह्मणजे तापकरी यांची स्थिति एक असते. कशी कीं, भक्त ह्मणजे निष्ठेनें चाकरी करणारे लोक, (पक्षीं) भात, यांविषयीं दोघांसही द्वेष असतो; जड ह्मणजे मूर्ख लोक, (पक्षीं) पाणी यांवर दोघांची प्रीति; दोघांसही अरुचि प्राप्त होते; दोघांसही गुरुलंघन ह्मणजे वडील माणसांची अमर्यादा करणें; (पक्षीं) अन्नाशिवाय राहणें, हें आवडतें; दोघांचीही तोंडें कडू (दोन्ही अर्थ उघडच आहेत) होतात." नि. मा.

---

### लोखंडावर तांब्याचा मुलामा चढविण्याची युक्ती.

लोखंडाच्या पदार्थांस क्रीम आफ् टार्टर या पदार्थानें चांगलें घासून आणि मग कोळशाची पूड चोळून तो पदार्थ स्वच्छ करावा नंतर म्यारिआटिक आसिड एक भाग आणि पाणी तीन भाग ह्यांचें मिश्रण करावें, तें करण्यापूर्वीं पाण्यामध्यें मोरचुताच्या पाण्याचे कांहीं थेंब घालावे. ह्या मिश्रणांत तो स्वच्छ केलेला पदार्थ पंधरा किंवा वीस मिन्युटें पर्यंत ठेवून त्यास बाहेर काढावा आणि त्यास चिरगुटांनीं घासून त्या मिश्रणांत थोडासा मोरचूत टाकावा व त्यांत पुनः तो पदार्थ ठेवावा. ह्या प्रमाणें प्रत्येक वेळीं मिश्रणांत थोडासा मोरचूत टाकून त्या पदार्थावर आपणास जितकें तांबें चढविण्याचें असेल तितकें चढेतोपर्यंत करीत जावें शेवटीं तो पदार्थ सोडा पाण्यांत विरघवून त्यांत ठेवावा. मग खडूनें पुसून स्वच्छ आणि साफ करावा अशा रीतीनें चढविलेला मुलामा पुष्कळ दिवस टिकतो. ने. ओ.

### कांच कापण्याची रीति.

टरपेनटाईन तेलांत एक दोरी भिजवून, ती आपणास ज्या रीतीनें कांच कापायाची असेल त्या रीतीनें काचेवर ठेवावी; आणि आगीची जोत लावून ती दोरी जाळून टाकावी, ह्मणजे आपोआप कांच कापली जाईल. कांच जाडी असल्यास लौकर कापली जात नाहीं ह्मणून, रेघेच्या खुणेवर हाताचा दाब दिला असतां तत्काळ तुकडे पडतील. ही रीत बोहरी लोक हिरकणी घेऊन कांच कापतात तिजपासून अगदी भिन्न असून नवी आहे. आपणास खिडकीसाठीं किंवा दुसऱ्या कांहीं कामासाठीं कांच कापणें असेल तर बोहऱ्याकरितां खोळंबून बसावें लागतें. परंतु सदरहु रीतीनें कोणीही मनुष्य बोहरी होऊं शकेल.

### सोनेरी व रुपेरी शाई करण्याची रीति.

आपणास सोनेरी अगर रुपेरी यांतून ज्या शाईची गरज असेल त्या जातीचा वर्ख आणून तो मधामध्यें घालून एका मऊ दगडावर वांटावा. त्याचा अगदी मेणाप्रमाणें चेंदा झाला ह्मणजे तो एका कांचेच्या भांड्यांत घालून त्यांतला मध निघून जाण्याकरितां पाणी घालून हातानें खूप घोटावा. जेव्हां सर्व मध पाण्याशीं मिळून निघून जाईल तेव्हां तें पाणी टाकून द्यावें, व नुस्ता वर्खाचा अंश राहील तो सुकवावा; व गोंदाचें पाणी करून त्यांत घालून तो कालवावा ह्मणजे ती शाई झाली. त्या शाईनें लिहिलेलीं अक्षरें सुकल्यानंतर तीं हस्तिदंतानें अगर कांचेसारख्या गुळगुळीत पदार्थानें घोटावीं ह्मणजे हुबेहुब सोनेरी अगर रुपेरी अक्षरें दिसण्यांत येतील. वि. वि.

---

## नोटिसा.

नोटिस— पांडुजी वल्लद लखाजी पाटील मुखत्यार निजबत मंजाबाई मर्द झांगोजी घोडे रहाणार मौजे सावरे परगणे व तालुके अकोट यासी बदु वल्लद गणाजी उन्हारे रहाणार मौजे मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मी डाक मार्गे राजिष्टर नोटिस तारीख ३० माहे आगष्टची आह्माकडे पाठविली तिचें उत्तर येणें प्रमाणें:—

तुह्मापासून कर्जाऊ रुपये ३०० दोन रुपये शेकड्याचे व्यजानें शके १७९४ कार्तिक शुद्ध १ रोजीं आह्मी घेतले व त्या विषयीं वारंवार वायदे केले पण रुपये दिले नाहींत ह्मणून तुह्मी लिहिले ती गोष्ट अगदीच खोटी आहे आह्मी रुपये मुळींच घेतले नाहींत, व्याज कबूल केलें नाहीं, व आह्मी बतावणीही केली नाहीं. उगीच बालंट घेऊनें असी खोटी नोटिस देणें बरोबर नाहीं. आह्मी तुमचें एक दमडीचेही देवाल नाहीं या उपर अशा नोटिसा कराल तर तुह्मावर कायदेशीर तजवीज केली जाईल.

आमच्या मालकिची दोन शेते तुह्माकडे वहितीस आहेत त्यांतील आमचा माल व बैल तुह्मापासून घेणें आहेत तीं तुमचे मोहबती खातर तुह्माकडे टेविलीं पण अशी तुह्मी तुफानें उठवूं लागला सबब आतां तीं तुह्मांकडे ठेवण्याचीं नाहींत सबब आमचा शेतचा माल व बैल ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आह्माकडे आणून द्यावे. या प्रमाणें तुह्मी न कराल तर तुह्मावर दिवाणींत दावा करून खर्चासुद्धा सर्व भरून घेतलें जाईक. या नोटिशीचा खर्च पाठऊन द्यावा. कळावे तारीख १६ माहे सप्तंबर सन १८७४ इसवी.

(सही) बदु वल्लद गणाजी उन्हारे रहाणार सावरे तालुके अकोट निशाणी खुद्द

---

नोटिस—रामदत किसनदयाळ मयत रामदत वारस पुत्र किसनदयाळ अज्ञान पालन करणार मातोश्री नेवजाबाई साहू दुकान अकोट यांस नोटिस देणार विश्वनाथ बाळकृष्ण लांडगे रहाणार अकोट जिल्हा अकोले याजकडून देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मास तारीख २ माहे सेप्तेंबर सन १८७४ इसवी रोजीं नोटिस दिली ती सर्वथैव खोटी आहे. तुह्मी लिहिलें कीं, तुमचे साल १२५ रुपये प्रमाणें असून २०० रुपये सालाचा जमाखर्च कां मांडला? तो मजरा मिळणार नाहीं, दुसरे असाम्यांचें देणें घेणें व जमाखर्च तुमचे हातचे आहेत ते रुजू करून देणें व वेढें १ सोन्याचें तुमचे हातांत घातलें होतें तें परत दिलें नाहीं तें आणून द्यावें, व असाम्या रुजू करून द्याव्या; नाहीं तर फिर्याद करू. ह्या सर्व गोष्टी खोटेपणानें लिहिल्या आहेत. संवत् १९२९ सालचे दिवशीं आम्ही तुह्मास ह्मटलें कीं, आह्मी २५० रुपये प्रमाणें साल घेऊं तर आपण बोलला कीं, २०० शें रुपये प्रमाणें घ्यावें नंतर ज्यष्ट शुध्ध १५ मेचे दिवशीं उकडशिंग जमादार यानें आह्मास अकोट दुकानावर बोलावून सालाचा खुलासा केला. तेव्हां पहिलें साल तर आह्मी मंजूर केलें पण दुसरे सालाविषयीं तक्रार घेतली तेव्हां त्यांणीं आह्मास सांगितले मागील साल २०० शें रुपये व पुढेंही २०० शें रुपये घेत जावे व मागील सालचा जमाखर्च करावा. दुसरे तुह्मी मुंढगाव दुकानावर कागद तयार करण्याकरितां गेले होते. नंतर दोन तीन दिवसांनीं आह्मी कागद तयार करण्याकरितां गेलों त्यावेळेस उकडशिंगजी जमादार यांचे समक्ष जमाखर्च केलेला आहे. सोन्याचें वेढें १ याविषयीं आपण लिहिलें तर आह्मी तुमचें वेढें मुळींच घतलें नाहीं, तुह्मास तर कोणाचा एका पैशाचा इतबार नाहीं. तेव्हां वेढें हातांत घालावयास आह्मास कसे द्याल? ही गोष्ट तुफानाची आहे. तर मी अशा तुफानाला कांहीं भीत नाहीं. असाम्यास पैसा देणें अगर घेणें आह्मी कांहींच केलें नाहीं; रोजगार तुह्मीच करीत होते आह्मी फक्त कोडतांतली बहिवाट करीत होतो. कोडतांतून पैसा आणित होतो तो त्याचवेळेस तुमचे हवाली करून देत होतो, आपण पोराचे हातानें कच्चे वहीवर खरें कीं खोटें मांडित होते, ते आह्मी पक्केवहीवर उतरून खतावणी करीत होतो आणि आसामीचा वसूल तुह्मी घेत होते. व वसूलही असाम्याचा जमा न करितां किसनदयाळचे नावानें जमा केले आणि घटाव बहडती कितीएक आहेत. व हे मजकुर खोटेच आहेत आणि त्या बह्या सरकारांत नेता, त्यावरून कदाचित निघाली तर, फौजदारी निघेल. तेव्हां आह्मी कांहीं जवाब देणार नाहीं तो तुमचेवरच आहे. आणखी कित्येक गोष्टी छपावणीच्या आहेत त्या सर्व उघाडकीस येतील. आमचा हिशेब दाखऊन बाकी तुमची निघाल्यास अगर आमची निघाल्यास ती बाकी १६ दिवसांत द्यावी घ्यावी. कदाचित् फिर्याद केली तर मला मंजूर नाहीं व कोडतांत अवघ्या गोष्टीचा जवाब देण्यास आपणास यावें लागेल यांत कांहीं आपण फायदा काढणार नाहीं हें खूप समजावे. कळावें तारिख १६ सेप्तेंबर १८७४ इसवी.

(सही) विश्वनाथ बाळकृष्ण लांडगे अकोट दस्तुर खुद्द.

---

हें पत्र अकोले एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

REGISTERD NO 7, 1874

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० २७ माहे सप्तंबर सन १८७४ इ० अंक ३९

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

स्वल्प, स्वल्प, स्वल्प!!

सर्व श्रीमान, देश सुधारणेच्छु आणि सद्गृहस्थ यांस कळविण्यांत येतें कीं, आ-म्ही गेल्या एप्रिल महिन्यापासून कोल्हापुरास "सुज्ञानामृत" या नावाचें उपयुक्त विषयाचें मासिक पुस्तक काढण्याची सुरुवात केली आहे. यांत रसायन शास्त्र; वैद्य शास्त्र, ज्योतिष शास्त्र, पाक शास्त्र; शेतकी संबंधी माहिती; करवीर क्षेत्राचें वर्णन, मनोरंजक कल्पित कथा, नाटक, उपयुक्त विषयावरील निबंध आणि अत्युपयोगी, अनुभवशीर आणि चमत्कारिक संग्रह असे दहा विषय प्रत्येक अंकीं येतात. शिवाय कविता, पुस्तक परीक्षा, रूपकें, कोड्या इत्यादिकांचा समावेश अवकाशानुसार होत असतो. वर्गणीदार होऊं इच्छिणार्यांनीं आम्हांकडे २।= ( सालीना अगाऊ वर्गणी ) रोकड पाठविली असतां त्याजकडे पुस्तक सुरू करूं. सुज्ञ लोकांनीं ही संधी दवडूं नये.

नारायण रघुनाथ मंत्री

व्यवस्थापक, सुज्ञानामृत कोल्हापूर

## जाहिराती.

होम डिपार्टमेंट

फोर्ट उइलीयम ता० १४ आगष्ट १८७४.

नंबर २१९९

हिंदुस्थानांतील खानगी लोक किंवा सिविल डिपार्टमेंटांतील सरकारी लोकयांनीं राणी सरकार किंवा राणी सरकारचे हिंदुस्थानचे सेक्रेटरी यांजकडे अर्ज किंवा तशा जातीचे महत्वाचे कागद कसे पाठवावे अशाविषयींचे नियम तारिख १४ आगष्ट सन १८६७ इसवीचे ग्याझिट आफ इंडिया पान १२२१ यांत जाहिरात नंबर ३७४२ तारिख २३ आगष्ट सन १८६७ इसवीचे प्रसिद्ध केले होते.

२ "जो अर्ज हिंदुस्थानांतील सरकारचे योग्य द्वारें रवाना झाला नाहीं तशा अर्जाकडे होम गवरमेंट लक्ष्य देणार नाहीं व तो घेणार नाहींत" व राणी सरकार किंवा राणी सरकारचे सेक्रेटरी आफ स्टेट यांजकडे जो अर्ज पाठविला जाईल तो अर्ज लिहिणारा ज्या लोकल गवरमेंट हद्दींत रहात असेल किंवा नोकर असेल त्या लोकल गवरमेंटचे मार्फत पाठविला पाहिजे तेणेकरून अशा लोकल गवरमेंटास आपला अभिप्राय व खुलासा देण्याचा असेल तो देण्यास ठीक पडेल असें त्या नियमांत लिहिलें होतें.

३ असे नियम जरी प्रसिद्ध झाले आहेत तथापि हिंदुस्थानांतील लोकांकडून विलायतेस वारंवार अर्ज येतात परंतु राणी सरकार त्यांजकडे बिलकुल लक्ष्य न देतां तो अर्ज लिहिणारा मनुष्य ज्या सरकारचे हद्दींत राहतो त्याजकडे अर्जदारास परत देण्याकरितां पाठवितात व त्यांत असें सुचवितात कीं, हिंदुस्थानांतील लोकाकडील अर्ज लोकलगव्हरमेंटचे मार्फत आल्यावाचून त्याजकडे राणीसरकार लक्ष देणार नाहींत.

४ राणी सरकारचे सेक्रेटरी आफस्टेट यांणीं नुकतेच बरेच अर्ज परत केले आहेत व हिंदुस्थान सरकारास असें कळविलें कीं हिंदुस्थानांतील रहाणाराकडून राणी सरकाराकडे लोकल गव्हरमेंटचे मार्फत अर्ज न गेल्यास तिकडे ते लक्ष देणार नाहींत असें सर्वत्र लोकांस जाहिर करावें.

[ सही ]टी. जे. फ्राउडन

अं० अंडर सेक्रेटरी

नंबर ५१ खरा तरजुमा

---

२१९९ डिपुटी कमिशनर जिल्हे अकोले

सदर्हूची हकीकत सर्व इलाख्यांतील सरकाराकडे पाठविण्यांत येऊन लिहिण्यांत येते कीं, ही जाहिरात लोकल आफिशियल ग्याझेट व स्वदेश भाषेतील वर्तमानपत्रांतून सर्वत्रांस समजण्याकरितां प्रसिद्ध करावी.

सेक्रेटरी

नंबर ९४७ सन १८७४।७१

प्रत्येक जिल्ह्यांत व प्रत्येक तालुक्यांत वर्तमानपत्रद्वारें इंग्रजींत व मराठींत सर्वत्रांस कळण्याकरितां प्रत कमिशनर यांजकडे पाठविली आहे.

सही ट्रिडी साहेब

नंबर ३००४ सन १८७४

तारीख ८।८।७४

सर्व डिपुटी कमिशनर व इतर खात्याचे मुख्य यांजकडे सर्वत्रांस कळण्याकरितां तहशिलदाराकडे मराठींत तरजुमा पाठवावा. अकोला व उमरावती येथील डिपुटी कमिशनर यांणीं आपले येथील छापखान्याचे एडिटर यांजकडे तरजुमा पाठवावा.

रिविन्यु कमिशनर.

## नोटिसा.

नोटिस—विठोबा वलद जानजी जवरे रहाणार लासूर तालुके खामगाव यास रामजी वलद तानाजी हरणे रहाणार वडशिंगी तालुके जळगाव याजकडून नोटिस देण्यांत येते की तुम्ही तारीख ३० माहे आगष्ट सनमजकूरचे वऱ्हाडसमाचारांत आम्हास नोटिस दिली तिचें उत्तर येणे प्रमाणें

आमची बायको आम्ही टाकून दिली नाहीं. व ती माहेरीं गेली असतां दोनवेळां तिला आम्ही आणावयास पाठविले होते व एकवेळ खुद्द आम्ही आलो होतो पण तुम्ही पाठविली नाहीं सबब तुम्ही खर्चाची रकम मागता ती गैरशिस्त आहे सबब आम्हाकडून मिळणार नाहीं आम्ही आपले माणूस पोसण्यास असमर्थ होतो असें नाहीं याजकरितां आतां तुम्हाला स्पष्ट कळवितो की ही नोटिस पोचतांच आमची बायको आमचे घरीं पाठवून द्यावी तीला ठेवून घेण्याचा तुम्हाला अधिकार नाहीं याउपर न पाठवाल तर बायको ताब्यांत घेण्याकरितां तुम्हावर सरकारांत आम्ही फिर्याद करू.

आम्ही दुसरी बायको केली म्हणून पहिली बायको आम्हाला नको आहे असें नाहीं. पुरुषाला पाहिजे तितक्या बायका करण्याची मोकळीक आहे तुम्ही कांहीं हरकत न घेतां आपले बहिणीस आम्हाकडे पाठवावें. इतक्याउपर न पाठवून तिचा दुसऱ्या कोणाशी गंधर्व वगैरे करण्याचा फंद फितूर कराल तर सरकारचे पेचांत याल हें खूप समजावें तारीख २१ माहे सेप्तंबर सन १८७४ इसवी.

(सही) रामजी वलद तानाजी हरणे

याचे हातची रेघ.

---

नोटिस — होलचंद मिसरीचंद रहाणार बाळापूर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं ता० ३ आगष्ट सन १८७४ इ०चे वऱ्हाडसमाचार पत्रांत नोटिस मजला दिली. त्याजवरून असें समजतें कीं दि० मो० नंबर ४२ सन १८७४ यांतील प्रतिवादी, बाबुला वलद दानाजी याने माझे नावचा दस्तैवज रु० २७१ चा सदरील दाव्याचे फैसलांत तुम्हास दिला आहे त्याजवरून सदरील पुरज्याबद्दल मजला तुम्ही नोटिस दिली. परंतु बाबुलाचे सदरील दस्तैवजाबदल मजला बिलकूल देणें नाहीं या कारणावरून मी तुमचा बिलकूल दस्तैवजाचे रुपयाबद्दल जबाबदार होत नाहीं. तुम्हास पाहिजे असल्यास सदर्हू बाबुला वलद दानाजी याजवर तजवीज करून घ्यावी. कळावें. तारीख २१ माहे सेप्तंबर सन १८७४ इसवी.

( सही ) उदेभान वलद चंद्रभान

पाटील दस्तुर खुद्द.

नोटिस—राजाराम वलद हिरालाल कलाल रहाणार मौजे पाथर्डी व शिवप्रसाद वलद हिरालाल कलाल रहाणार कसबे अडगाव यांस देवीदास सोभाराम कलाल व स्तीकसबे तेल्हारें याजकडून तुम्ही तारीख ५ सेप्तेंबर सन १८७४ इसवीचे वऱ्हाडसमाचारांतून आम्हासनोटिस दिली तिचें उत्तर या नोटिशीनें देण्यांत येते कीं, तेल्हारे येथील कलालीचा मक्ता जेव्हेंलेस केला तेव्हेंलेस तुमचा म्हणजे प्रत्येकाचा तिजाई हिस्सा ठेविला असोन तुम्ही प्रत्येकाकडून पेशगीबद्दलचे १७३ प्रमाणें रुपये ३४६ घेतले; परंतु तीं शराकत कायम ठेवण्यास तुमची खुशी नसोन तारीख १८ जून सन १८७३ इसवी रोजीं शराकत काढून घेतल्याबद्दल आपसांत दस्तैवज होऊन तुम्ही सदर्हू पेशगीचा भरलेला पैसा तुम्हास परत देत असतां ते वेळेस तुम्ही घेतला नाहीं, दंगा करण्यास सिद्ध झाले. त्यावरून मी पोलिसांत वर्दी दिली सबब तुम्ही दोघेही निघून गेले, तुम्ही आपला सामानहि नेला नाहीं. मजकडून कांहीं देण्यास हरकत नव्हती. ज्या तारखेस तुमचा नेम शराकत काढून घेण्याचा झाला तेव्हां तुमचा हिशाबद्दलचा हक्क राहिला नाहीं. जर तुमचा हिस्साच असता तर रावजी तेली तेल्हारेकर याज बरोबर 'आमचे पेशगीचा पैसा पाठऊन द्यावा म्हणजे आम्ही रशीद पाऊन देऊं' असा राजारामचा निरोप कसा येता ? मी त्याजला सांगून पाठविलें कीं, तुम्ही खुद्द जातीनें येऊन रसीद लिहून द्यावी व आपला पैसा घेऊन जावा. त्याप्रमाणें तुम्हाकडून झालें नाहीं ही तुमची चूक आहे.

नोटिशींत सामान १५० रुपयाचें लिहिलें ते कितीही रुपयांचें असो तुम्ही नेलें नाहीं म्हणून पडेलें आहे. केव्हां येऊन घेऊन गेल्यास मजकडून हरकत नाहीं. त्या सामानाचे भाड्याबद्दल तर हिशेबानें मी तुमचा देवाल नाहींच; परंतु ते जड जोखीमचे बाळगल्याबद्दल व देखरेखीचे खटपटीबद्दल दरमहा १० रुपये प्रमाणें तुमचेकडून भाडें घेण्याचा माझा हक्क आहे. वास्तवीक लटलें असतां त्या सामानाची किंमत तुम्ही मजला कळविण्याची गरज नव्हती; परंतु ज्याअर्थी त्याची किंमत सदरीं दाखविली त्याअर्थीं तें सर्व सामान पराकाष्ठा ४० रुपये किंमतीचे वर नाहीं.

शिवप्रसादचा हिस्सा ठेविल्याबद्दल १२५ रुपये मजकडून तुम्ही देविविले. नंतर त्यांणीं हिस्सा काढून घेतला; परंतु ते रुपये सर्व तुम्हाकडून येण्याचे, त्याजपैकीं १०४ रुपये दिले व बाकी २१ रुपये ऐनांतील राहिले. सदर्हूचे व्याज दरमहा दर शेकडा २ प्रमाणें रुपये ७ एकून रुपये २८ तुमचेकडून येणें आहेत.

येणेंप्रमाणें तुमचे हिश्शाचा हक्क नाहीं व सामान पडून असल्याबद्दलचें भाडें म-

अपासून घेण्यास तुह्मास कायदेशीर मार्ग नसून मला त्या मालाचे संरक्षणाबद्दल घेण्यास आधार आहे तें दरमहा १० रुपये प्रमाणें व शिवाय २८ रुपये ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत मला दिल्यास ठीक आहे नाहींपेक्षां योग्य कोटींत फिर्याद करून या नोटिशीचे खर्चासुद्धां सदर्हू पैसा तुमचेकडून घेतला जाईल कळावें तारीख २२ माहे सप्तेंबर सन १८७४ इसवी.

[ सही ] देवीदास सोनाराम कलाल कसबे तेल्हारे दस्तुर खुद.

---

नोटिस— कौतुकी मर्द नारायणराव देशमुख व गणपतराव देशमुखतरफ अंदुरें तालुके बाळापूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं नारायणराव केशवराव देशमुख याजकडे खाते बाकी १७८६ व शिवाय व्याज ६१४ एकूण रुपये २४००–निव्वळ आहे करितां या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं ही नोटिस पावले दिवसापासून १५ दिवसांचे आंत आमचे दुकानीं येऊन सदर्हू देण्याचा निकाल करावा जर करितां मुदतीचे आंत येऊन निकाल केला नाहीं तर सदर्हू व्याजासुद्धां व या नोटिशीचे खर्चासुद्धा रुपये भरून घेतले जातील. कळावें तारिख २५ माहे सप्तंबर सन १८७४ इसवी.

( सही ) हरदयाल गोविंदराम साह दुकान बाळापूर दस्तुर गोविंदराम

---

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० या खालीं लिहिलेल्या चार ओळी पाठविल्या आहेत त्यांस मेहेरबानगी करून जागा द्यावी.

या गावांत अशी दाट गप्प उडाली आहे कीं हल्लींचे मास्तर गंगाधर रामचंद्र यांची बदली दुसरीकडे होऊन येथें कोणी नेटिव खिस्ती साहेबाची नेमणूक होणार आहे. प्रस्तुत शाळेचें काम उत्तम प्रकारें चाललें असून, परधर्मी मनुष्याची नेमणूक सरकार कां करणार याचें अनुमान होत नाहीं. परधर्मी गृहस्याच्या नेमणुकीनें शाळा बिघडेल एवढेंच नाहीं तर शाळेत एक मुल सुद्धां राहील असें वाटत नाहीं. कारण कालरोजीं श्री बालाजीचे देवालया नजीक बराच मोठा समुदाय नित्याप्रमाणें जमला होता त्यांचे भाषणाचा ओघ असाच मला दिसून आला.

गावांतील संभावित मंडळीनें हल्लींचे मास्तरांची बदली होऊं नये ह्मणूण मेहेरबान एजुकेशनल इन्स्पेक्टर साहेबांकडे अर्ज केल्याचेंही ऐकतों. यांस येथें येऊन दोन महिनेही पुरे झाले नाहींत तोंच इतकी लौकर बदली करण्याचें सरकारानें कां मनांत आणिलें? हल्लीं अभ्यास उत्तम चालला आहे अशाबद्दल आपल्या पत्रीं एक दोन वेळ मजकूर आला होता. सरकारानें ज्या उद्देशानें येथें इंग्रजी शाळा ठेविली आहे तो उद्देश सिद्धीस जाण्याचीं सुचिन्हें दिसत असून व्यर्थ बदली करण्यांत काय अर्थ? कांहीं असो आमचें तर विद्याखात्याचे अधिकाऱ्यांस इतकेंच सुचविणें आहे कीं हल्लीची व्यवस्था उत्तम झाली आहे. त्याप्रमाणें कांहीं दिवस जाऊं देऊन नंतर बदलीची आवश्यकता दिसल्यास तसें त्यांनीं करावें परंतु परधर्मी मनुष्याचे नेमणुकीनें अशा गावांत काय फायदे होतील हे मला येथें सांगणें नकोच. एडिटरराव आपण मात्र या बद्दल आपले विचार पुढें करावेत ह्मणजे आह्मा गावकरी लोकांस फायदा झाला तर होईल. असो तूर्त या बाबतीत विशेष लिहित नाहीं. पत्रविस्तार भयास्तव दुसऱ्या किसेक गोष्टी हल्लीं न लिहितां पुढील लेखाकरितां शिल्लक ठेवितों.

येथून तीन कोसांवर मौजे सिनगांव ह्मणून एक खेडें आहे. तेथें तारिख ११ रोजीं अतिशय पाऊस पडून वीजही पडली. ९ माणसें तीनें यमसदनास पाठविलीं. हे लोक दुपारीं गावाच्या बाहेर एका पाटलाच्या मळ्यांत मकेचीं कणसें खाण्याकरितां जमले होते. पाऊस फार पडूं लागला ह्मणून पुष्कळ लोक आपआपल्या घरीं गेले परंतु ज्यांचीं नव्याणव वर्षें भरलीं होतीं त्यांस तसी बुद्धि ईश्वर कोठून देणार? मयत मनुष्यांमध्यें एक स्त्री पायाळू होती ह्मणून हा अनर्थ घडून आला असें कित्येकांचें मत आहे. पायाळूपणा आणि विजेचें पडणें यांत काय संबंध असेल तो असो परंतु कधीं कधीं अशा गोष्टी जरूर घडून येत असतात. कळावें तारीख २२ माहे सप्तंबर सन १८७४ इसवी.

एक देऊळगावकर

---

# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य २ शके १७९६

---

## पाद्री व सैतान.

पश्चिम द्विपस्थ लोक आम्ही विद्वान्, आम्ही विचारी, क्रिस्ती धर्म संस्कारानें आमचे मनांतील सर्व किंतू नष्ट झालेले आहेत असा बाणा बाळगतात, व हिंदु लोक फार अज्ञानी, आंबचारी व अतिशय देवभोळे आहेत अशी वारंवार दूषणें देतात हें आपण पहातों; परंतु दिव्याखालीं अंधेर त्याप्रमाणेंच ह्या लोकांतही कित्येक लोक इतके अविचारी व देवभोळे असतात कीं, त्यापुढें हिंदुलोक कांहींच नाहींत असें ह्मटलें तरी चालेल. युरोपांत एके गांवीं पटकीचा उपद्रव झाला त्यामुळें त्या गांवांतील लोक तेथें कांहीं चेटकी स्त्रिया होत्या त्यांजकडे गेले. व हें अरिष्ट कसें टाळावें ह्मणून त्यांस विचारूं लागले. त्या स्त्रियांनीं सांगितलें कीं, मेलेले मुडद्यांचीं प्रेतें उकरून त्यांचीं काळजें खा, ह्मणजे पटकी नाहींशी होईल. त्याप्रमाणें त्या लोकांनीं केलें; परंतु महामारी बाईची स्वारी निघून न जातां ज्या मनुष्यांनीं तीं काळजें खाल्लीं तीं मात्र बाईच्या भक्षस्थानीं पडलीं. काय हा अविचार!! असो. ही गोष्ट कदाचित् त्या लोकांतील अडाणी लोकांविषयीं असेल. परंतु अडाणी नव्हेत तर चांगले सुजाण क्रिस्ती ज्ञानप्रकाश ज्यांच्या हृदयीं [illegible] असे धर्मोपदेशकही किती भित्रे व देवभोळे असतात हें पुढील हसें येण्यासारख्या [illegible] गोष्टीवरून आमचे वाचकांचे ध्यानांत येईल.

जर्मन देशांत बव्हेरिया ह्मणून एक प्रांत आहे त्यांतील एकेगांवीं एक पाद्री धर्मोपदेशक प्राचीन काळचे क्याथलिक ( एक क्रिश्चन धर्मांतील पंथ )लोकांविषयीं व्याख्यान देत होता त्यांत त्याणें असें बोलून दाखविलें कीं प्राचीन काळीं जितके लोक क्याथालिक पंथांत होते ते फारच अनीतिमान व नीच होते व त्यां सर्वांस अखेरीस नरकलोकास जावें लागलें व मी ह्मणतो हें जर खोटें असेल तर आतांच मला सैतान येऊन धरून नेवो याप्रमाणें त्यानें दोन तीन वेळां बोलून दाखविलें व अशा आवेशांत बोलत असतां त्याचे हातांतील बायबल खालीं पडलें. पुढें श्रोते मंडळींतील एका गृहस्थानें पाद्री साहेबाचे हातांतील पुस्तक खालीं पडलेसें पाहून आपले शेजारीं एक सिद्धी बसला होता त्यास सांगितलें कीं तें पुस्तक उचलून पाद्री साहेबाचे हातांत दे, त्याजवरून तो सिद्धी उठून उपदेशकबावाचे व्यासपीठाकडे जाऊं लागला. इकडे बावांचा व्याख्यानाचा सपाटा चाललाच होता इतक्यांत त्यानें मागें वळून पाहिलें तों आपणाकडे कोणी एक काळस्वरूपमूर्ति येत आहे असें पाहिलें त्यास पहातांच पाद्रीसाहेबाची घाबरपट्टी झाली त्यास वाटलें कीं, आपण जी आतांच प्राचीन काळचे क्याथलिकलोकांची निंदा केली त्याकरितां हें सैतान येतें व माझी आतांच गचांडी धरितें; मग काय विच्यारतों पाद्री साहेबाचे खिस्ती धैर्य डगमगलें तेव्हां साहेबानें सैतानाशीं साम करण्याची युक्ति काढिली ती अशी— पाद्री बोवा कांपत कांपत आपल्या श्रोते जनास ह्मणूं लागले कीं मीं आतां जें बोलून दाखविलें कीं पूर्वींचे सर्व क्याथालिक लोक अनीतिमान होते तें तसें नव्हे तर ह्या लोकांत चांगले नीतिमान लोक कदाचित् असावेत. साहेबास वाटलें कीं असें बालल्यान तरी सैतान परत जाईल परंतु तें सैतानच तें खिस्ती दासाचें काम ह्मणून ते अधिक अधिकच पाद्री साहेबाजवळ जाऊं लागलें हें पाहून साहेबाचा अधिक थरकांप झाला सर्व अंग घामानें डवडवूं लागलें तथापि काहीं धीर धरून साहेब ह्मणाले कीं पूर्वींचे पुष्कळ लोक चांगले होते. इतकें केलें तरी तें सैतान अदृश्य होईना, तें अगदी साहेबाजवळ येऊन भिडलें मग मात्र साहेबाची पांचावर धारण बसली, आतां काय इलाज करावा हें त्यास सुचेना शेवटीं ते ह्मणाले कीं, आम्ही आतांच्या काळचे सर्व लोक पूर्वीपेक्षां फार अनीतिमान आहोत व मी ह्मणतों हें खोटें असेल तर हें सैतान मजला येऊन धरो. इतकें भीत भीत बोलून साहेबास लागलीच मुर्च्छना आली ती जाऊन त्यास शुध्धीवर येण्यास बराच वेळ लागला अरेरे!!! त्या बागुलबोवा सैतानानें बिचाऱ्या क्रिस्ती भक्त पाद्रीचा गर्व उतरावा काय?

आम्हीच काय ते नीतीमान आम्हीच काय ते ज्ञानी हा गर्व कोणींही धरूं नये.

---

## वऱ्हाड.

नांदुऱ्याचे हेड मास्तर रा० गोपाळकृष्ण याणीं मुलांची खोटी हजिरी भरल्यावरून त्यांस डायरेक्टर साहेबांनीं कामावरून अजी दूर केलें व यांचे फर्स्ट असिस्टंट मास्तर यांस याच कारणावरून ३० रुपयांवरून अकोटास १५ रुपयांवर घातले. नांदुऱ्याचे हेड मास्तरचे जागेवर बुलढाण्याचे हेड मास्तर रा० रामचंद्र यशवंत गोडबोलें यांस नेमिलें.

एथील हुजूर नाजरकडील १५ शिपायी कमी केले. व नाजरच्या हाताखालील जप्ती कारकुनांस इतके दिवस १२ रुपये पगार होता तो १५ रुपये केला.

या आठवड्यांत ह्मणण्यासारखा पाऊस पडला नाहीं. हवेंत बरीच उष्णता आहे.

मे० बुलक साहेब काल उमरावतीस गेले. व ते उदयीक परत येतील असें ऐकतों.

बडोद्याचे श्री० मल्हारराव गायकवाड यांच्या नूतन झालेल्या विवाहास आड येणारा पांडू याजविषयीं मागील पत्रीं साद्यंत मजकूर लिहिलाच आहे. आतां असें समजतें कीं हा तोतया करणारा पांडू येथून पळून गेला.

"अकोला हाय स्कुलची लायब्ररी पाहून खुष झालेला क्ष" पत्र पोंचलें. पत्रांतील मजकूर खरा आहे असें आह्मास वाटत नाहीं. हें पत्र आह्माकडे पाठविण्यापेक्षां लायब्ररीचे सेक्रेटरी यांजकडे पाठविलें असतें तर तुमचा हेतु कदाचित् सिध्धीस गेला असता.

उमरावती व बडनेरा यामधील स्टेट रेलवे पुढील महिन्याचे १ ले तारिखेपासून सरकारी हुकमानें बंद होणार याचें कारण खर्च भागण्या पुरतें उत्पन्न होत नाहीं हेंच होय. कापसाचा हंगाम बंद झाल्यापासून तेथील लोकांच्या अर्जावरून व खटपटीवरून उतारू लोकांच्या गाड्याचे वगैरे दर बरेच वाढविले होते. व गाडी सुरू होती. परंतु तेवढ्यानेंही खर्च भागेना. पहिल्यानें ही [illegible] झाली ते.

न्हां नफा होईल असें सरकारास वाटलें होतें. परंतु तसें झालें नाहीं. सरकारानें कापसाचा हंगाम बंद झाल्यापासून आज इतके दिवस जर ही रेलवे सुरू ठेविली होती तर थोडक्या दिवसाकरितां इतकें बारीक पहावयाचें नव्हतें.

कसनें मुळावें ता० पुसद येथील लोकांनीं वाशिमचे डे० कमिशनरकडे अर्ज केला आहे त्याची नक्कल त्यांनीं आह्माकडेस पाठविली आहे. त्यांत ते लिहितात कीं, रा० लक्ष्मण जनार्दन हे हेडमास्तरचे जागेवर आल्यापासून तेथील शाळेची उत्तम स्थिति झाली. शाळेंत १६ मुलें होतीं तीं ७६ झालीं. तर ह्या मास्तरास बहडती मिळावी व शाळेची ग्रेड वाढावी वगैरे. अर्जांत लिहिल्याप्रमाणें शाळेची स्थिति खरोखर सुधारली असेल तर मास्तरास बहडती देण्याची व शाळेची ग्रेड वाढविण्याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं अवश्य तजवीज करावी. ह्मणजे मास्तर लोकांस आपलें काम झटून करण्याची हुरूप येऊन शाळांचें कामही चांगल्या रीतीनें चालेल.

सुनगांव ता० जळगांव येथील बातमीदार लिहितो कीं तेथील शाळेचें देखरेख करण्याकरितां सरकार मार्फत कांहीं गांवांतील गृहस्थांची नेमणूक झाली व त्याप्रमाणें ते नुकतेच शाळा पाहण्याकरितां गेले होते त्या समयीं त्यांनीं शाळेच्या उपयोगाकरितां एक टाइमपीस दिलें.

उमरावती येथील गंभिरपूरचे मारुतीचे देवाल्यांत एक बैरागी साधू आले आहेत. ते दररोज अस्तमानीं खालीं डोकें वर पाय करून झाडास टांगून घेऊन पुष्कळ वेळ पर्यंत झोके घेतात व तोंपावेतों एकाग्रचित्त करून अगदीं श्वास सोडीत नाहींत. पूजेचा थाटही बराच आहे. यांची कसरत तर फार कठीण दिसते, पण याखेरीज आणखी काय साधुत्व असेल तें असो.

या आठवड्यांत उष्णता तर पुष्कळ भासते. काल अस्तमानीं बरीच पर्जन्यवृष्टी झाल्यामुळें बराच गारवा झाला. प्र. सिं

## वर्तमानसार

मद्रास रेलवेच्या आर्कोनम आणि जोरालपेठ या दोन स्टेशनामध्यें आगगाडी रात्रीची तूर्त चालणार नाहीं असा ह्या रेलवेच्या एजेंटानें ठराव केला आहे. कारण या दोन स्टेशनांच्या दरम्यानच्या तलावास अतिशय पाणी आलें आहे.

बंगलोर येथें एका चलाख हिंदु चोरानें तेथील साहेब लोक कचेरींत गेल्यावर कांहीं वेळानें शिपायाचें सोंग घेऊन त्यांचें घरीं मोठ्या गडबडीनें जाऊन साहेब पैसे मागतात असा बाहणा करून कित्येक साहेब लोकांच्या घरांतून पैसे उपटले आणि पळून गेला अजून त्याचा पत्ता लागला नाहीं.

आमदाबादेस बनिया जातींत एक पुनर्विवाह झाला.

दिल्ली ग्याझेटवरून समजतें कीं करमतअल्ली उर्फ तुरपखान कस्टम खात्यांतील सब डेपुटी ईन्स्पेक्टर याजवर सन १८५७ सालांत फत्तेगड येथें यूरोपियन लोकांस मारण्याचे कामीं असल्याचा गुन्हा शाबित झाल्यावरून त्यास फाशीची शिक्षा झाली.

धारवाडास या महिन्याच्या प्रारंभापासून अतिशय पाऊस पडून घरें वगैरेचा पुष्कळ नाश झाला. गदकेस याच महिन्यांत पावसानें सुमारें ४०० घरें पडलीं व अनिघरी येथें तर घरामधून मनुष्यें सापडून मेलीं.

इगतपुरीस पाऊस पुष्कळ पडत आहे आजपर्यंत सुमारें १६० इंच पाऊस झाला असावा.

आक्टोबरच्या पहिल्या तारखेपासून सैन्यांतील सर्व इंग्लिश सोलजरांस हिंदुस्थानांतील चहा देणार असें समजतें.

सुरतेस आजपर्यंत सुमारें ४० इंच पाऊस पडला.

नांदगांवास एक टामस जानसन नावचा एंजिनें फिरविणारा युरोपियन मुसलमान झाला.

ब्रह्मदेशचे राजे आपल्या नोटी करून चालू करणार आहेत.

येत्या हिवाळ्यांत सर सालरजंग यांची स्वारी कलकत्त्यास गवरनर जनरल साहेबांस भेटावयास जाणार आहे.

डेन्मार्क सरकारास प्रिन्स बिसमार्क यांणीं विचारलें होतें कीं, तुमचें राज्य जर्मन संस्थानांत सामील करा परंतु ती गोष्ट त्यांनीं कबूल केली नाहीं.

भावनगर येथें एका कारागिरानें एक घड्याळ तयार केलें आहे त्यांत विलायती सामान अगदीं नाहीं.

बंगाल्यांतील दुष्काळानिमित्त आजपर्यंत विलायतेस एकंदर १२८०००० रुपये जमा झाले.

येत्या आक्टोबरांत हैदराबादेपर्यंत आगगाडी सुरू होणार.

मुंबईस आजपर्यंत एकंदर ८९ इंच पाऊस पडला.

श्री० मल्हारराव महाराज आपले आवडते पत्नीस एक रुप्याचा चौफळा करून देणार आहेत त्यास फक्त कड्यांस ४००० रुपये लागत आहेत.

गेल्या दोन तीन दिवसांपासून पावसानें एक सारखी झड लावली आहे. दिवसभर बारीक बारीक पडत असतो. शेतें चांगल्या स्थितींत असून हवाही बरी आहे. अ. द.

लंडन पोलिस— लंडनच्या शहरांत एकंदर वस्ती सरासरी साडिबत्तीस लक्ष आहे व तेथें त्याच्या बंदोबस्ताकरितां पोलिस आहे तें येणेंप्रमाणें:— २६ सुपरिन्टेंडेंट, २६८ इन्स्पेक्टर, ९९२ सार्जंट, आणि ८,५७५ कान्स्टेबल, मिळून एकंदर ९,८६१ मनुष्यें पोलिसमध्यें आहेत. यांचा सन १८७३ सालीं ८५,९६,१६० रु० खर्च होता असें समजतें. यांत लोकवस्तीच्या मानानें पाहिलें तर ३३० मनुष्यांस एक पोलिसचा मनुष्य आहे.

सरकारच्या एतद्देशीय राजेरजवाड्यांशीं राजकीय संबंधामुळें खंडण्या वगैरे मिळून वर्षास ७२,६०,००० रु० उत्पन्न होतें आणि त्यांजकरितां रेसिडेंट, पोलिटिकल एजेंट वगैरे ठेवून खर्च करावा लागतो तो ४४,५०,००० रु० तेव्हां एकंदरींत सरकारास २८,१०,००० रु० नफा होतो. आतां विलायतचे सरकार, सर्व पृथ्वींतील देशांच्या सरकारांशीं संबंध ठेवण्यानिमित्त एकंदर २४,४३,३९० रु० खर्च करतें ह्मणजे पृथ्वींतील देशांशीं संबंधाचा खर्च एका हिंदुस्थानांतील खर्चाच्या सरासरी निमे आहे. याजवरून येथील खर्चांत काटकसर करण्यास पुष्कळ जागा आहे. असें हिं. पे. कर्त्यांनीं सरकारास सुचविलें आहे. ई. प्र.

विलक्षणसृष्टि —ता. १७ मिनहू रोजीं संस्थान दतवाड येथें एक म्हैस व्याली. तिला एक रेडकूं झालें. त्यास दोन तोंडें चार कान, चार डोळे, आणि दोन जिव्हा! परंतु उपजतांच तें मरण पावलें.

उष्मा अतिशय होतो. अकाश ढगांनीं व्याप्त असतें. पर्जन्य काल रोजीं थोडासाझाला. ज्ञा. सा.

या आठवड्यांत पर्जन्य मुळींच लागला नाहीं व सध्या त्याची गरजही नाहीं. बे. स.

धार—पर्जन्य तेतीस इंचावर झाला. हा गेल्या वर्षेपेक्षां दोन इंच जास्त झाला आहे. पिकें चांगल्या स्थितींत आहेत. दहापंधरा दिवसांनीं आणखी एकदा थोडी वृष्टि झाल्यास चांगलेंच होईल. कदाचित आणखी पर्जन्य न पडला असताही या प्रांतीं पिकास अडचण पडण्याची आतां भीति राहिली नाहीं. वृ. धा.

आह्मास लिहिण्यास अनंद वाटतो कीं प्रयागजी भिमजी हे विलायतेहून तारीख १० मिनहू रोजीं काठेवाडास परत आले. हे गृहस्थ सन १८६६ सालीं विलायतेस कांहीं व्यापार संबंधी कामाकरीता गेले होते.

काश्मिरचे महाराजांनीं कांहीं इंग्लिश लोकांच्या अर्जीवरून लाहोर येथें एक नवें भजनालय बांधण्याकरितां १०००० रुपये देण्याचें कबूल केलें.

ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवेची कलकत्त्याकडे जाणारी गाडी रात्रीं निघावी असा कलकत्त्यास विचार होत आहे.

कर्नल हाईड हे हिंदुस्थानांतील सर्व प्राचिन नाण्यांचे फोटोग्राफ काढणार असून त्यांणीं त्याकामाकरितां हिंदुस्थानांतील बरींच नाणीं पैदा केलीं आहेत असें समजतें.

सरकारी पाद्री लोकांस पुढें लिहिले नियमाप्रमाणें पेनशनें मिळतात:—

सात वर्षानंतर अजारपिणाचें सरटिफिकेट हजर केल्यास दर वर्षास १२७० रुपये.

दहा वर्षानंतर अजारपिणाचें सार्टीफिकेट हजर केल्यास दर वर्षास १७३० रुपये.

सतरा वर्षानंतर अजारीपणाचें सर्टिफिकेट हजर केल्यास दर वर्षास ३६५० रुपये.

याप्रमाणें पेनशनें देण्याचा शिरस्ता असून पाद्र्यांनीं सात वर्षांपूर्वींच पेनशनें मिळावित अशाबद्दल अर्ज केल्यावरून सात वर्षांचे मुदतीपेक्षां कमी मुदतीपर्यंत नौकरी झाल्यास त्यांस दर वर्षास ६०० रुपये पर्यंत पेनशनें द्यावें असें ठरलें आहे हिंदुस्थानांत येऊन आठ दिवसांची नोकरी झाली असली तरी पाद्र्यांस ६०० रुपयांचें पेनशन मिळण्यास मोकळीक मिळाली आहे त्यावरून या प्रकारचीं पेनशनें मिळण्याविषयीं इतर खात्यांतील साहेब लोकांनीही प्रयत्न चालविला आहे! 'गोठणीच्या गाई आणि माभळभट दान देई'.

रत्नागिरी. — या आठवड्यांत पर्जन्य जरा जास्त पडला इतक्याची आतां गरज नाहीं. कांहीं दिवस उघाडी देईल तर हळवे भाताची कापणी करण्यास बरें पडेल. ल. शो.

ठक — मद्रासचे पत्रांत एक चमत्कारिक हकीकत लिहिली आहे ती अशी:— दक्षिण आर्कोट यथील एका ब्राह्मणानें रेव्हिन्यु सर्व्हेचे डेप्युटि इन्स्पेक्टराचें सोंग घेऊन व शिपाई व कारकून घेऊन जिल्ह्यानिहाय पाहणीस जात असे. त्याणें कांहीं हद्दीचे तंट्यांचा निकालही केला व तो सदरहू कामदाराचा शिक्का पाडीच शीस तयार करणार होता इतक्यांत त्यास पकडलें. ने. ओ.

धुळें— या आडवड्यांत ता० १२ पासून उत्तरा नक्षत्रानें बारीक पर्जन्य पाडण्याची सुरुवात केली. सर्व जिल्हाभर कोठें कमी कोठें जास्ती पडल्याची खबर आली आहे. खा. दे.

नाशीक —— काल दोन प्रहरा पर्यंत पर्जन्य नवता असें ह्मटलें तरी चालेल; पण दोन प्रहरा नंतर एक वाजण्याचे सुमारास एका एकी ढगांची आकाशांत गर्दी होऊन मोठ्या जोरानें पर्जन्य सुमारें तीन तास पर्यंत सारखा पडला व जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें. हवा सर्द आहे. सुधांशु.

### नम्रता

मनुष्यास थोडेंसें ऐश्वर्य, थोडेंसें ज्ञान, थोडेंसें सामर्थ्य हीं प्राप्त झालीं ह्मणजे माझ्या सारिखा मोठा, ज्ञानी, समर्थ कोणी नाहीं असें त्यास वाटून त्याच्या अंतःकरणामध्यें अभिमान उत्पन्न होतो. कधी हा अभिमान अतिशय प्रवृद्ध होऊन तो मनुष्य, इतरांशी उन्मत्त रीतीनें वागतो, मनुष्यांशीं जो अशा रीतीनें वागतो, त्याची परमेश्वराच्या ठायींही तशीच वृत्ति व्हावयाची. आपला वास्तविक अधमपणा, आपली दुर्बलता, आपले अनेक दोष हे ज्याच्या लक्षांत येत नाहींत, तो मनुष्य परमेश्वरापाशीं विनम्र कधीं होणार नाहीं; आणि जगदीश्वरापाशीं ज्याचा भाव विनम्र नाहीं, त्याची त्याच्या ठायीं अर्धी भक्ति जडणार नाहीं ह्मणूनच तुकोबानें ह्मटले आहे कीं, —

“नम्र झाला भूतां, तेणें कोंडिलें अनंता.” जो सर्व भूतांच्या ठायीं नम्र तोच अनंतास ह्मणजे अंत ज्याला नाहीं अशास कोंडण्यास समर्थ होतो. अनादि अनंत, परमेश्वर, आह्मां दीन, दुर्बल मतिमंद मानवांस कसा साध्य होईल? पण असा जरी तो आहे असे जरी आह्मी आहों, तथापि एका उपायानें त्यास आपल्या हारीं आणण्यास आह्मी समर्थ होतो. तो उपाय कोणता? तर सर्व भूतांच्या ठायीं नम्रता धरणें.

कधीं कधीं आपलें अंतःकरण अभिमानानें भरलें असून आपणास, आह्मी निरभिमान आहों असें वाटतें; परंतु आपल्या कृति, आपलें भाषण, आपले विचार यांचें सूक्ष्म रीतीनें अवलोकन केलें असतां, त्या सर्वांत अभिमानाचा अंश पुष्कळ आहे असें आपल्या आढळण्यांत येईल. तर विवेकाच्या योगें अभिमानाचें निरसन करून आपल्या वृत्तिमध्यें नम्रता आणिली पाहिजे. आपला अभिमान मिथ्या व निराधार आहे हें थोडासा विचार केला असतां, सहज लक्षांत येईल. मी हा एक मनुष्य आहे, माझ्यासारिखे दुसरे अगण्य मनुष्यें आहेत. एखाद्या विस्तीर्ण प्रदेशावर पृथ्वींतील सर्व मनुष्यें एकत्र केलीं असतां आपली नजर टिकणार नाहीं, इतका मोठा पुष्कळ कोश लांब रुंद असा समाज होईल. एवढ्या मोठ्या समाजांत मजसारिख्या एका मनुष्याची काय गणना आहे? मी नष्ट झालों, तर हा नष्ट झाला हें लक्षांत सुद्धां यावयाचें नाहीं. आणि मज सारिखे लक्षावधि मनुष्य प्रत्यही जन्मास येतात व मृत्युपंथें जातात. ही विशाल पृथ्वी, हिजवरील अति उच्च पर्वत, नानाविध देश, हा विस्तीर्ण गंभीर महासागर हजारो योजनें पडला आहे, ह्या सर्वांपुढें मी क्षुद्र अणुरेणूप्रमाणें नाहीं काय? आकाशाकडे दृष्टि लाविली असतां, ही विस्तीर्ण आमची पृथ्वीसुद्धां अणुरेणूप्रमाणें आहे असें भासेल. सूर्य व बृहस्पतींसारिखे ग्रह, यांचीं मंडलें पृथ्वीपेक्षां काहीं सहस्रपट, काहीं लक्षपट मोठीं व पृथ्वीपासून कोट्यावधि योजनें लांब अशीं आहेत; परंतु हीं सर्व मिळून केवळ एका अचळ ताऱ्याच्या योग्यतेस येतात, तर असे खरोखर असंख्य अचळ तारे, ज्या ह्या विश्वामध्यें आहेत, त्या विश्वामध्यें ह्या पृथ्वीची काय गणना? मग ह्या साडेतीन हात देहाची योग्यता कांहींच नाहीं हें उघड आहे. तर अशा विशाल विश्वाच्या कर्त्यापाशीं आपण किती नम्र असलें पाहिजे? आणि आपलें ज्ञान तरी किती? मी एका खोलीमध्यें असलों तर शेजारच्या खोलीमध्यें काय होत आहे हें मजला कळत नाहीं; कदाचित त्या खोलीमध्यें त्याक्षणीं माझा प्राण घेण्याकरितां कोणी शत्रु टपत बसला असेल, परंतु तें समजून त्याचें निवारण करण्याचें मजमध्यें सामर्थ्य नाहीं. माझ्या ह्या शरिराचे व्यापार कसे चाललें आहेत, मजमध्यें जीव आहे तो कशावर अवलंबून आहे ह्याचें मजला ज्ञान नाहीं. कदाचित ह्या क्षणीं माझ्या शरीरामध्यें कांहीं दिवसांनीं माझा प्राण घात करणारें असे एकाद्या मोठ्या रोगाचें बीज उत्पन्न झालें असेल, परंतु तें समजतें कोणास? आणि समजलें तरी त्याचें निराकरण करण्याचें ज्ञान कोणास? कदाचित मी ज्या वाड्यांत बसलो आहे तो कोसळण्याच्या बेतांत असेल, आणि कोसळून माझ्या देहाचा पुढील क्षणीं नाश होणार आहे असें असेल, परंतु दुर्बळ मानवास तें कळतें कसें? साधारण गोष्टींविषयीं जर आमचें इतकें अज्ञान, तर ह्या विश्वाची रचना कशी आहे, कोणत्या प्रकारें तें चाललें आहे, इतके जीव, हे नानाप्रकारचे पशु, पक्षी, कीट, मानव, कसे उत्पन्न होतात, कसे नष्ट होतात, अशा प्रकारची जीं जगदीश्वराची अनेक गुह्यें आहेत तीं मंद बुद्धी आह्मा मानवास कशीं कळतील? आणि सामर्थ्य तरी आमचें किती? साधारण रोग झालेला बरा करवत नाहीं, मोठ्या महायत्नानें आगबोटी किल्ल्याप्रमाणें बांधिल्या परंतु यत्किंचित् वायुचा व समुद्राचा क्षोभ होऊन सर्वांचा विध्वंस होऊन आपण प्राणास मुकतों. मोठमोठाले वाडे बांधले भूकंपानें कोसळले. आगगाडीचा रस्ता बांधला परंतु थोडासा पाऊस पडून लोखंडाची एक कांब सैल झाली, पडल्या आमच्या गाड्या कोसळून, आणि अनेक मनुष्य मृत्युवश्य झाले. असा प्रकार आहे, आणि आह्मा सारिखे आह्मा पेक्षां मोठे श्रीमंत, पृथ्वीचे पराक्रमी राजे असे फार प्राचीन काळांपासून किती झाले असतील? परंतु त्यांचें तें वैभव, ते मोठमोठाले सुंदर वाडे आतां कोठें आहेत? त्यांचे नाव तरी राहिलें आहे काय नाहीं. तसेंच कामक्रोधादिकांस वश्य होऊन पशूंसारिखी आपली अवस्था करून घेणें हें आपणास अतिशय वाईट वाटतें; परंतु अंतःकरणाचा मळ सर्वथा घालवून इन्द्रियांचा निग्रह करणें विवेकाचें प्राधान्य सदोदित आपल्या आचरणांत ठेवणें ह्या गोष्टी किती कठिण आहेत? तोंडानें हजार गोष्टी बोलतो, आपली वृत्ति शांत करावी असें ह्मणतो. परंतु इन्द्रियांचा विषय आपणापुढें प्राप्त झाला ह्मणजे तें सर्व एकिकडे रहातें. आजपासून वाईट गोष्ट करणार नाहीं, मनोवृत्ती क्षुब्ध होऊं देणार नाहीं, असा कितीही निश्चय केला तरी तो कामक्रोधाच्या लहरीनें नष्ट होतो. तर वास्तविक पाहिलें असतां आपला सर्व अभिमान किती मिथ्या आहे? ह्मणून सदा सर्वदा आपण दुर्बल, अधम, पापी असें आहों हें स्मरून नम्रभाव अंतःकरणांत बाळगून सर्व समर्थ प्रभूस अनन्यभावें शरण जाणें हेंच श्रेयस्कर व उचित होय या मध्यें संशय नाहीं. सु. प.

## नोटिसा.

नोटिस—पुंजाजी गावंडे वस्ती देऊळगाव तालुके अकोट यास नोटिस देणार नारायण वल्लद कल्यानजी पाटील वस्ती मौजे जउळके तालुके अकोट यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचा चिरंजी व नामे हनवती यास तुमची मुलगी नामे भागिरथी इच्याशी लग्न होण्यास सुमारे २० वर्षें झालेलीं असोन भागिरथी इजला ऋतुप्राप्त होण्यासही सहा सात वर्षें झालीं लग्न झाले दिवसापासून ऋतुप्राप्त झाल्यावरही दोन तीन वर्षें आमचे घरीं राहून राजीखुशीनें चांगला संसार केला नंतर तुमचेकडून तिचा चुलता नामे परशराम गावंडे हा आमचे येथें येऊन तिजला काहीं लग्नाचे वाहाण्यानीं घेऊन गेला त्याजला सुमार तीन वर्षें झालां मध्येंतरीं आह्मी आमचेकडून आमचा भाऊ नामे बाळाराम याजला तुमचे मुलीस आणण्याकरितां पाठविलें असतां तुह्मी त्याजबराबर पाठविलें नाहीं तुह्मी तिजला आपले घरीं ठेऊन घेऊन तिचे खावटीबद्दल अडगाव कोर्टांत दिवाणींत फिर्याद करून आह्माजवळून रुपये ८३ तिऱ्याशी घ्यावे व भागिरथीनें आमचे घरीं येऊन राहावें असा ठराव केला आहे त्यास तुह्मास या नोटिशीनें असें कळविण्यांत येते की ज्यापेक्षां तुह्मी तीन वर्षांचे खावटीचा हुकूमनांमा मिळविलाच आहे त्यापक्षीं आह्मी देण्यास कबूल आहो परंतु ठरावाप्रमाणें तुमचे लेकीनें आमचे घरीं येऊन रहावें आणि आपले नवऱ्याचा संसार करावा याप्राणें तुह्मी तुमचे लेकीच्या बंदोबस्त नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत केला असतां बरें आहे आह्मी नोटिशींत लिहून कळविल्याप्रमाणें तुमचेकडून न होईल तर तुह्मी पुढें खावटीबद्दल आसाच दावा कराल तर ह्या नोटिशीचे आधारोंन चालणार नाहीं व कोणी तिंचे नवऱ्याचे परवानगीशिवाय गंधर्व करण्यास परवानगी देणार नाहीं जो कोणी करील अगर तुह्मी आपले मुखत्यारीने तिचें गंधर्व करून द्याल तर रीतीप्रमाणें फौजदारींत तजवीज केली जाईल व लग्नाचा वगैरे सर्व खर्च भरून घेतला जाईल कळवे तारीख २१ माहे सेप्तेंबर सन १८७४ इसवी

(सही) नारायण वल्लद कल्याणजी पाटील निशाणी खुद्द.

---

नोटिस—किसन मनुराम श्रावगी दुकान खामगाव यांस खालीं सहीं करणार याजकडून देण्यांत येते की आह्मास तुमचे देणें बरहुकूम रोखे २ रुपये २०० शाचें असून त्याबदल खालीं लिहिल्याप्रमाणें वसूल तुह्मास दिला तो तपशील.

१५० दिडशे रुपये नगदी

९७॥ ज्वारी खंडी ३ दर ३२॥ प्रमाणें खामगावीं पोंचून दिली.

---

२४७॥

येणेप्रमाणें रुपये तुह्मास पोंचले असून सुमारे दोन महिने झाले आह्मी तुमचे दुकानावर हिशेब करण्याकरितां च्यार लोकांचे समक्ष आलो असतां तुह्मी हिशेब केला नसून उलट सांगितलें कीं रुपये ८० निंबा पाटील पिंपराळेकर याचे नाव सांगून नेले ते द्या याप्रमाणें तुह्मी बोलला परंतु निंबा पाटील याचे नावावर आह्मी तुमचे येथून ऐंशी रुपये कधींच नेले नसून विणाकारण सबब दाखवून हिशेब न करितां फिरून लाविलें सबब ह्या नोटिसीनें तुह्मास असें सुचवितो की ही नोटिस पोंचल्यापासून आठ दिवसाचे आंत तुह्मी आमचा हिशेब करावा आणि तुमचे आह्माकडे किंवा आमचे तुह्माकडे काही घेणें देणें निघाल्यास घ्यावे द्यावे याप्रमाणें जर न कराल तर पुढें आह्मी तुमचे कोणत्याही गोष्टीचें जबाबदार नाहीं आणि विनाकारण भलत्याच रकमा नेल्याची सबब दाखवून आमचे पुर्जे आह्मास न देतां अटकावून ठेवाल तर हंही तुमचे सावकारी रितीस योग्य नाहीं. इतकेही करून तुह्मी फिर्याद वगैरे कराल तर आह्मी त्याबद्दल खर्चाबद्दलचे जबाबदार नाहीं सदरहू पुर्जे २ व ह्या पुर्वींचे पुर्जे २ दोनशे रुपयांचा एक आणि सोळारुपयांचा एक येकून च्यार पुर्जे तुह्मी आमचे विनाकारण अटकावून ठेविले आहित तेही सदरहू मुदतींत परत द्यावे कळवि तारीख ९ माहे सप्तंबर सन १८७४ इसवी.

(सही) रंभु वल्लद माधोबा पाटील टें भूरणी निशाणी मोहोर.

---

नोटिस—नथू वल्लद बळराम पाटील होळे रहाणार मौजे कुऱ्हे परगणे येदलाबाद तालुके भुसावल जिल्हा खानदेश यास नोटिस देणार सजन मर्द नथू पाटील वस्ती मौजे सारगाव चउल तालुके मलकापुर इजकडून अशी नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न होण्यास सुमारे १२।१३ वर्षें झालीं व मजला वयांत येऊनही चार वर्षें झालीं. मी अज्ञान होते तोंवर तुझे घरीं येणें जाणें होतें. पुढें, मला ऋतुप्राप्त झाला नंतर सहा महिने मी तुझे घरीं होते. त्या सहा महिन्यांत तुझा माझा जमरीतीप्रमाणें कधीं ही व्यवहार झाला नाहीं. त्यावरून मला पक्कें समजून आलें कीं, तूं पुरुषांत नाहींस ह्मणून तेव्हांपासून मी आपले बापाचे घरीं येऊन राहिले त्यालाही आज चार वर्षें गुजरून गेलीं. सदर्हू मुदतींत मी कर्ज काढून उदरनिर्वाहाचा वगैरे खर्च केला. असें कर्ज काढून मी एकटीनें किती दिवस काढावें व आपला संसार व्यर्थ दवडावा? याजकरितां या नोटिशीनें तुला कळविण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्या दिवसापासून आठ दिवसांत पुरुषत्वाबद्दल डाक्टरचें सार्टिफिकिट पंचांत आणून दाखल करावें आणि पंचाचे अनुमतानें पुरुषांत असल्यास मला घेऊन जाऊन संसार करावा.

मी आपले बापाचे घरीं चार वर्षें गुजरण केली त्याजला पोटखर्च दरसाल ३६ रुपये प्रमाणें १४४ रुपये द्यावे. व सदरीं लिहिल्याप्रमाणें सर्टिफिकीट आणून मला घेऊन जावें. हा बंदोबस्त सदर्हू मुदतींत न केल्यास तुमचा लग्नाचा हक्क रद्द करण्याची तजवीज योग्य कोडतांतून करून दुसरा घरठाव करीन व खर्चाबद्दलचा पैसा वसुलात आणला जाईल. कळावे तारीख २२ माहे सेप्तेंबर सन १८७४ इसवी.

(सही) सजन मर्द नथू पाटील निशाणी खुद्द

---

हें पत्र अकोले एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.